मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास


राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी अंक-१९६६, १९६७, १९६८, १९६९, १९७२

अनुक्रमणिका



विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

दिवाळी अंक नोव्हेंबर १९६८

वर्ष २३ अंक सातव

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) नोव्हेंबर १९६८ दीपावली विशेषांक (अंक ७

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

अनुक्रमणिका

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना श्रद्धांजली

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या निधनाने विदर्भाची वा महाराष्ट्राचीच नव्हे तर सबंध राष्ट्राची अपरिमित हानी झालेली आहे. राष्ट्रसंतांचे सामाजिक कार्य सर्वश्रुत आहे. त्याचबरोबर त्यांची वाणी व लेखणी यांचीही महती फार थोर आहे. सर्वसामान्य अर्थाने ज्याला साहित्य म्हणतात ते त्यांचे क्षेत्र नव्हते. परंतु त्यांची मराठी व हिंदी भजने व गीते हे साहित्याचे अनमोल लेणे आहे. त्या गीतांनी असंख्य लोकांना समाजसुधारणेच्या कार्याची व सेवेची प्रेरणा दिलेली आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या कार्याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सदैव आशीर्वाद होता. महाराजांच्या मोझरी येथील आश्रमात त्यांच्याच प्रेरणेने विदर्भ साहित्य संमेलनाचे अधिवेशन झालें हे आजही अनेकांच्या स्मरणात आहे. संमेलनाच्या तुमसर अधिवेशनाचे उद्घाटनही महाराजांच्या हस्ते झाले होते.

आता महाराजांचे दर्शन पुन्हा होणार नाही, त्यांची धीरगंभीर व स्फूर्तिदायक भाषणे, भजने यांचा प्रत्यक्ष लाभ मिळणार नाही ही कल्पनाच अत्यंत दुःखदायक आहे. परंतु महाराजांच्या आश्रमाच्या रुपाने ठिकठिकाणी कार्य करणाऱ्या गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखांच्या रुपाने व असंख्य लोकांच्या अन्तःकरणात कायमचे घर करून राहिलेल्या त्यांच्या गीतांच्या रुपाने, त्यांची स्मृती चिरकालीन होईल व सतत जनतेला प्रेरणा देत राहील यात शंका नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मृतीला 'युगवाणी' अत्यंत आदरपूर्वक श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

अनुक्रमणिका

मराठीतील आद्य महाकाव्य

डॉ. द. भि. कुळकर्ण

'महाकाव्य या वाङ्मयप्रकाराचा तंत्रदृष्ट्या व ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास; आणि मराठीतील प्राचीन व अर्वाचीन पद्य व गद्य महाकाव्यांचा सर्वांगीण विकास' या विषया-वर डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी सुमारे एक हजार टंकलिखित पृष्ठांचा प्रबंध लिहिलेला आहे. सदर प्रबंधात लेखकाने (१)वाङ्मय आणि वाङ्मयप्रकार (२)महाकाव्य म्हणजे काय? (३) महाकाव्याचे प्रकार (४) पाश्चात्य महाकाव्य (५) संस्कृत महाकाव्य (६) प्राकृत महाकाव्य (७) मध्ययुगीन मराठी महाकाव्य (८) अर्वाचीन मराठी महाकाव्य (९) महाकाव्याचे वर्तमान व भवितव्य, इत्यादी विषयावर संशोधनात्मक व समीक्षात्मक प्रकरणे लिहिली असून 'ऐतिहासिक कादंबरी व महाकाव्य' 'चित्रबंध,' 'महाकाव्यांच्या भाषावार कालानुक्रमी सूची' इत्यादी परिशिष्टे जोडलेली आहेत. प्रबंध-लेखकाने प्रस्तुत प्रबंध १९६६ मध्ये पीएच्. डी. पदवीसाठी नागपूर विद्यापीठास सादर केला व १९६७ मध्ये नागपूर विद्यापीठाने प्रबंध-लेखकास सदर प्रबंधावर पीएच्. डी. पदवी प्रदान केली. 'महाकाव्य' या विषयावर मराठीत अनेक लेख व प्रस्तावना आहेत. परंतु ग्रंथ मात्र एकही नाही. या संदर्भात, सदर प्रबंधातील काही अंश अभ्यासकांना उपलब्ध करून देणें औचित्यपूर्ण ठरेल असे वाटून प्रबंध-लेखक व नागपूर विद्यापीठ यांच्या पूर्वसंमतीने खाली 'मराठीतील आद्य महाकाव्य' हा लेख उद्धृत करीत आहोत. प्रस्तुत लेख म्हणजे 'मध्ययुगीन मराठी महाकाव्य' या प्रकरणातील एक लहानसा भाग होय. (या लेखाचा उत्तरार्ध पुढील अंकी प्रसिद्ध होईल.) —संपादक

नरींद्राचे 'रुक्मिणी-स्वयंवर' (शके १२१४) हे मध्ययुगीन मराठीतील आद्य महाकाव्य होय. कालानुक्रमानेच नव्हे तर गुणानुक्रमेही सदर महाकाव्य मराठीत आद्य ठरावे.

नरींद्र हा यादवकालीन मराठी कवी. नरींद्र, साल व नृसिंह हे तिघे बंधू रामदेवराव यादवाचे सभाकवी होते. यापैकी सालाने 'रामायण' व नृसिंहाने 'नलोपाख्यान' नावाचे काव्य रचले होते.

या दोन काव्यांच्या निमित्तानेच 'रुक्मिणी-स्वयंवरा'च्या लेखनाची घटना घडून आली. 'रामायण' व 'नलोपाख्यान' या काव्यांचे राजदरबारी वाचन झाल्यावर रामदेवरायाच्या देखतच, नरींद्र उद्गारला, 'यैस
केचा रामहाटु वर्णितेति तरि तुमचेया पापा पुर
होते:' —'रामकथा व नलकथा गाण्याऐवजी
जर कृष्णकथा आळविली असती तर तुमची पा
नाहीशी झाली असती.' नरींद्राचे कृष्णकथेवरी
पाहून रामदेवराय यादवाने त्याला कृष्ण कथेवर
करण्यास सुचविले. या निमित्ताने, इतरांच्या क
बोल लावणाऱ्या, नरींद्राची 'शक्ती पाहो' मिळे
रामदेवरायाची समजूत होती. राजाज्ञेप्रमाणे (१८०० ओव्यांचे) 'रुक्मिणी स्वयंवर' हे भक्तिपर काव्य रचले. इतर काव्यांप्रमाणे याही

वाचन राजमंदिरी सुरू झाले. नरेंद्रासारखा अभिजात कवी आणि रामदेवरायासारखा अभिजात रसिक यांचा समसमासंयोग घडून आला.

कवी वाचीत वाचीत ओवी क्रमांक ३१२ पाशी आला. श्रीकृष्णाची थोरवी हा वर्ण्यविषय होता ज्या विषयाच्या निमित्ताने राजा व कवी यांच्यात मूक पैज लागली होती तो विषय होता. नरेंद्रापाशी अस्सल प्रतिभाशक्ती होती. त्याच्या प्रतिभालतेला आता बहर आला होता. नरेंद्र वाचीत होता--

देवाचेया दादुलेपणाचा उबारा :
न साहे चि सातांही सागरां
मेणें वोसरीनि राजभरा : दीधली द्वारावती ३१२

श्रीकृष्णाच्या पराक्रमाची आच सहन न होऊन सातही सागर मिळून मागे सरले व त्यांनी राजभर म्हणजे खंडणी म्हणून श्रीकृष्णाला आपली द्वारका बहाल केली. एका यादवराजाचे कौतुक एका दुसऱ्या यादव राजाने ऐकले व त्याचे मन मोहून गेले. रामदेवराय यादव काव्यवाचन मध्येच थांबवून एकदम म्हणाला

'या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा.'

पूर्ण काव्य ऐकून घेण्याचेही भान त्याला राहिले नाही; इतका तो या स्थळी मोहित झाला. काव्यात जितक्या ओव्या असतील तितके 'सोनटके' व त्याच्या चौपट 'आसु' इतके द्रव्य देण्यास तो तयार झाला. पण कवीने रामदेवरायाला नम्रपणे सांगितले, 'ना राजे हो आमचेया कवीकुळा वोलु लागेल.' हा कवी काव्य आपल्या नावे करीत नाही असे पाहून निदान सदर ग्रंथ तरी आपल्या दप्तरी असावा असे राजाला वाटले व त्याने तसा पर्याय कवीला सुचविला. परंतु आता नरेंद्राला विश्वास वाटेना. 'सध्या काव्य अशुद्ध आहे. ते शुद्ध केल्यावर आपण दप्तरी ठेवावे' असे सांगून नरेंद्राने काव्य घरी नेले. तिघा बंधूंनी रातोरात काव्याची दुसरी प्रत करावयास घेतली. प्रत्येकाने सुमारे तीनतीनशे ओव्या उतरवून काढल्या. पहाटे राजदूत आले तेव्हा १८०० पैकी ८७९ ओव्याच उतरवून झाल्या होत्या. तेवढ्याच घेऊन नरेंद्र महानुभाव पंथाला जाऊन मिळाला.

--मराठीतील आद्य महाकाव्यनिर्मितीची कथा अशी भक्तीची आणि नेकीची कथा आहे...

नरेंद्राच्या 'रुक्मिणी स्वयंवरा'स महानुभाव-पंथाच्या साती ग्रंथात आद्य स्थान मिळाले आहे. तरीही प्रस्तुत महाकाव्यात महानुभाव तत्त्वज्ञान आहे काय, असा वाद आहे. अधिकांश महानुभावीय काव्याच्या प्रारंभी पंचकृष्ण आणि नागदेवाचार्य यांना अभिवंदन असते, परंतु नरेंद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'त तसे ते नाही याचे कारण सदर महाकाव्य मुळात महानुभावीय काव्य नाही; नरेंद्राने गणेश आणि शारदा यांनाच वंदन केले आहे; परंतु महानुभाव पंथातील टीपकार मात्र आपल्या पंथाच्या तत्त्वज्ञानाला अनुकूल असा अर्थ त्यातून काढतात--असा पूर्वपक्ष डॉ. वि. भि. कोलते यांनी केला आहे[1]. टीपकार सुचवितात तसा महानुभाव-तत्त्वज्ञानसापेक्ष अर्थ कवीस अभिप्रेत नाही व तसा कोणी अट्टाहास धरल्यास शब्दार्थाची ओढाताण करावी लागते,[2] असे डॉ. कोलते याचे मत आहे. उलट, 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्याची बैठक महानुभावीय नसली तरी त्यावर महानुभावीय कल्पनाविचारांचा प्रभाव आहे असे श्री. रा. चिं. ढेरे यांनी म्हटले आहे.[3] नरेंद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'वरील महानुभावीय प्रभाव स्पष्ट करताना श्री. ढेरे यांनी चार मुद्दे मांडले आहेत.[4]

१. नरेंद्राने गणेश आणि शारदा यांचा उल्लेख केला असला तरी त्यांना वंदन केलेले नाही. (१८)

२. श्रीकृष्णापुढे अन्य देवतांना हीन ठरविले आहे. (१९-२०)

३. श्रीचक्रधर, श्रीचक्रपाणि श्रीप्रभु या शब्दांनी कवीने श्रीकृष्णाचा निर्देश केला आहे. या शब्दांना महानुभाव पंथात विशेष अर्थ आहे. (१८-१९)

४. परब्रह्म वेध, वेधवंती, अनुसरण, लीलामृत इत्यादी शब्द कवीने वापरले आहेत. या शब्दांनाही महानुभाव पंथात विशेष अर्थ आहे. (२०)

---

[1] वि. भि. कोलते, १९४०, नरेंद्र-कवि-कृत रुक्मिणी-स्वयंवर, पृ. क्र. १७८.

[2]. कित्ता, पृ. क्र. १७८.

[3]. रा. चिं. ढेरे, १९६५, नरेंद्रविरचित रुक्मिणी-स्वयंवर, (महाकवि नरेंद्र-व्यक्ति आणि वाङ्मय), पृ. क्र. १४

[4]. कित्ता, पृ. क्र. १७-२०

श्री. ढेरे यांची विचाराची दिशा बरोबर आहे. परंतु नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा' वरील महानुभावीय प्रभावाचा शोध घेताना तपशिलास इतके महत्त्व देण्याऐवजी काव्यलेखनामागील महानुभावीय प्रेरणेस अधिक महत्त्व द्यावयास हवे होते असे वाटते.

स्मृतिस्थळातील 'नरींद्रवासां भेटि : अनुसरण' या ११३ व्या स्मृतीमध्ये 'तेथ नरेंद्र कवि बैसले होते : तयासि भटोवांपासौनि श्रवण होतें' असा महत्त्वाचा उल्लेख आला आहे. 'रुक्मिणी-स्वयंवराची रचना करण्यापूर्वीच नरींद्र व नागदेवाचार्य यांची भेट झाली होती व नागदेवाचार्यांच्या तोंडून नरींद्राने महानुभाव तत्त्वज्ञान ऐकले होते; असा त्याचा अर्थ होतो. प्रत्यक्ष हे तत्त्वज्ञान किंवा त्यातील काही पारिभाषिक शब्द 'रुक्मिणी-स्वयंवरा'त किती उतरले हा तपशिलाचा भाग आहे. महत्त्वाचा मुद्दा हा की नरींद्राने कृष्णकथेवर महाकाव्य लिहावयास घेतले तेच मुळी महानुभावीय प्रेरणेने. महानुभाव हा 'जयकृष्णी' पंथ आहे एवढे नागदेवाचार्यांच्या सहवासाने नरींद्राच्या खचित ध्यानात आले असणार. नव्हे नल आणि राम यांच्यावरील काव्यही सहन होऊ नये, काव्य लिहावे तर ते श्रीकृष्णावरच - एवढी श्रीकृष्णाची भक्ती नरींद्राच्या अंतःकरणात उचंबळून यावी यावरून काव्यलेखनपूर्व काळातच कवी महानुभावीय निष्ठेने किती भारावला होता त्याची अटकळ बांधता येते. एरवी प्रत्यक्ष आपल्या बंधूंनाच व तेही साक्षात राजदरबारी, सम्राटादेखत 'यैसा द्वारकेचा रामहाटु वर्णितेति तरि, तुमचेया पापा पुरश्चरण होते' असे 'निमीषण्याचे' (निर्भर्त्सिण्याचे) धैर्य तो करता ना; आणि रामदेवरायाचे 'मां तुमची युक्ति पाहों' हे आव्हान स्वीकारून तो अठरा सते ओवीयाही रचता ना.

महानुभाव पंथात प्रवेश करण्यापूर्वी 'रुक्मिणी-स्वयंवरा' ची रचना झाली असली, टीपकारांनी पंथीय अभिनिवेशाने भाषेला परिभाषेचे रूप देण्याचा प्रयत्न केला असला आणि काव्यनायकाची प्रशंसा व विशिष्ट शब्दांवर श्लेष यातून महानुभाव तत्त्वज्ञानाचा तपशील निघत असला-नसला तरीही नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'ची प्रेरणा ही पूर्णपणे महानुभावपंथानुकूल —नव्हे महानुभावपंथनिष्ठ—आहे असे वाटते.

भक्तिभावनेने प्रेरित होऊन नरींद्राने काव्यरचना केली. परंतु भक्तिप्रेरणेपेक्षा कवित्वप्रेरणा वरचढ ठरली व त्यामुळे त्याच्या काव्याला ज्ञानेश्वराच्या काव्याप्रमाणे परतत्त्वस्पर्श लाभलेला नाही असा युक्तिवाद श्री. रा. चिं. ढेरे यांनी केला आहे.[५] परंतु नरींद्राची तुलना ज्ञानेश्वरांशी करणे उचित नव्हे. एकतर, ज्ञानेश्वरांनी महाकाव्य-आख्यानककाव्य असे वाङ्मयप्रकार हाताळलेले नाहीत आणि त्यांची प्रधान भूमिका, डॉ. रा. शं. वाळिंबे यांचा अपवाद वगळता,[६] उघडच साक्षात्कारी संताची, योग्याची होती हे मत सर्वमान्य आहे. नरींद्र हा साक्षात्कारी संत वा योगी नव्हता. परंतु तेवढ्यावरूनच 'सकल जीवनव्यापार व्यापून टाकण्याइतकी दृढता आणि गहनता त्या निष्ठेत अजून तरी आलेली जाणवत नाही' (३२) असे कसे म्हणता येईल ? आपले सख्खे बंधू व सम्राट यांच्यासमोर कवीने काढलेले प्रांजळ उद्गार, सम्राटांच्या आव्हानास त्याने दिलेला काव्यकृतीचा जबाब, काव्य विकण्याचा त्याने केलेला इन्कार आणि राजदरबारीचे सुख सोडून त्याने तातडीने जवळ केलेला महानुभाव मठ--हे सारे कशाचे निदर्शक आहे ? या साऱ्यात 'रसिकांना मंत्रमुग्ध करण्याची कविसुलभ ईर्ष्याच प्रभावी' (३२) आहे काय ? तसे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. कवीचे वर्तन व त्याचे काव्य यावरून वस्तुस्थिती तर अशी दिसते की कवीच्या व्यक्तित्वात विदग्धता व कृष्णभक्ती यांचे एकजीव रसायन झाले होते. या दृष्टीने नरींद्राच्या 'रुक्मिणी-स्वयंवर' या महाकाव्याकडे पाहिले तर त्याचा एक मोठाच विशेष नजरेत भरणार आहे :

१) वरवर पाहता सदर महाकाव्य शृंगारिक आहे असा भास होतो. रुक्मिणीचे वर्णन (ओवी क्रमांक ६७-७४; ८६-१०१), रुक्मिणीच्या सख्यांचे व सेविकांचे वर्णन (७८-८५; १०२-१०७), रुक्मिणीचा सभाप्रवेश (१०८-११४), रुक्मिणीचे रूप पाहून भाटास वाटलेले आश्चर्य (१३८-१४७), किन्नरकृत रुक्मिणी-सौंदर्यवर्णन (१९१-१९६),

५. कित्ता, पृ. क्र. ३०-३३.

६. रा. शं. वाळिंबे, १९५३, ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती, पृ. क्र. १० (प्रस्तावना); ३, १० इत्यादी.

रुक्मिणीची विरहावस्था, त्यावरील उपचार आणि सूर्यास्त-चंद्रोदय आदी वर्णने (३७८-६८५) हा सारा कथाभाग शृंगाररसास पूर्णपणे अनुकूल आहे नायिकेच्या रूपाचे आणि विरहाचे वर्णन करताना संस्कृत महाकवींनी निश्चयाने शृंगाररसाचा उठाव साधलेला आहे. नरींद्राने तसे केले आहे काय ? नरींद्राने तसे केलेले नाही; नरींद्राने संस्कृत महाकवींच्या अनुकरणाने शृंगाररसाची निष्पत्ती केलेली नाही, तर महानुभाव-निष्ठेच्या स्वीकाराने भक्तिरसाची निर्मिती केली आहे. रुक्मिणी म्हणजे जीवात्मा व श्रीकृष्ण म्हणजे परमात्मा ही जाणीव कवीपाशी निश्चित आहे; मात्र त्यपायी काव्यहानिकारक बटबटीत रूपके कवीने वापरली नाहीत; उत्कट कृष्णभक्ती अंतःकरणात असूनही काव्याच्या विदग्ध सौंदर्यास त्याने त्यापायी बाध येऊ दिलेला नाही. कवीने म्हटलेच आहे की ' श्रीकृष्णामुळे आपण जिवंत आहोत, त्याच्यात आपला जीव रंगलेला आहे आणि आपली कविता म्हणजे अंतःकरणातील कृष्णानंद ओसंडणे होय. विरहिणीला आपल्या मनातील भाव शब्दात नीट सांगता येत नाही, मर्मज्ञाने तो ताडावयाचा असतो. एखाद्याने स्वप्नात काही असंबद्ध बरळावे तसा मी परमेश्वराच्या चिंतनाने धुंद होऊन वेडेवाकडे काव्य लिहीत आहे, रसिकांनी माझी त्या मागची भावना लक्षात घ्यावी. [७]

रुक्मीणिप्रमाणे कवीही श्रीकृष्ण विरहाने व्याकूळ झाला आहे. किन्नराकरवी श्रीकृष्णाची थोरवी सांगतानाही कवीने आपली भक्तिरसनिष्ठ भूमिका स्पष्ट केली आहे. कवी म्हणतो, 'भक्त परमेश्वराचे-श्रीकृष्णाचे- गुणगान का करतात ? तर परमेश्वराने अवतार घेऊन जे सहज-पराक्रम केले त्यांचे कीर्तन केल्याने भक्तांना परब्रम्हाची प्राप्ती होते म्हणून.'[८]

नरींद्राची महानुभावीय प्रेरणा, त्याच्या महाकाव्यामागील भक्तिप्रेरणा व त्याच्या काव्यातील भक्तिरस याबाबत खात्री पटविणारा आणखी एक मोलाचा पुरावा आहे आणि तो म्हणजे कल्याणकीर्ती व किन्नर यांचे उपाख्यान. "एकनाथ, सामराज, विठ्ठल, श्रीधर, मोरोपंत इत्यादी कवींनी निरनिराळ्या थाटात या (रुक्मिणी-स्वयंवर) कथेचे संकीर्तन केले आहे. पण त्यांच्यापैकी कोणीसुद्धा कल्याणकीर्ती व किन्नर यांचा उल्लेख केलेला आढळत नाही."[९] परंतु १५ व्या शतकातील महानुभाव कवी संतोषमुनी कृष्णदास याने मात्र सदर उपाख्यान आपल्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'त आणले आहे. ते त्याने नरींद्रापासूनच घेतले असे म्हणता आले असते परंतु आता या उपाख्यानाचे मूळ चक्रधरस्वामीनिरूपित 'श्रीकृष्णचरित्रा'त आहे असे लक्षात आले आहे.

> ऐसा समयी किन्नरा वेदघोषासहितु कल्याणकीर्ति
> बंदीजन द्वारकेसि आला : मग श्रीकृष्णचक्रवर्ती
> उध्दवदेवाते साउमे पाठऊनि आदरेंसी आणिला :
> मग तो समेसि आला : मग कल्याणकीर्ती श्रीकृष्ण-
> चक्रवर्तीतें वाणिले : किन्नरे गायन केले :
> मग श्रीकृष्णचक्रवर्ती मानवौनि तेआंसि बहुत
> त्यागु दिन्हला:.[१०]

असा 'श्रीकृष्णचरित्रा'त कल्याणकीर्ती यांचा निर्देश आहे. अर्थात महानुभावीय कथास्त्ररूप स्वीकारताना महाकवी नरींद्राने उचित विवेक दाखविला आहे. जसे, विवाहप्रसंगी रुक्मिणी अडतीस वर्षांची होती; [११]

---

७. श्रीकृष्णाचा गुणीं जीविनला माझा जिउ श्रीचक्रधरा विनटला
तो आंतुल आनंदु वोसंडला कवितेची मिसे ३५
जे विरहिणींचां मनीं वसे ते बोलता होए अनारिसें
जे वाचिता ये रस-डोळसें भाव-लिखित ३६
तैसे देवाचां गुणीं विसावतां मी बोलें उसणतां
भावो वोळखावा श्रोतां : प्रेम-गर्भ ३७

८. प्रभू अवतरौनि कोडे : जे जे केले पवाडे ते वोलतां परब्रम्ह जोडे म्हणौनि भक्त वानिती ३१६

९. वि. भि. कोलते, १९४०, नरेंद्र-कवि-कृत रुक्मिणी-स्वयंवर (प्रस्तावना), पृ. क्र. २१

१० रा. चिं. ढेरे, १९६५, नरेंद्रविरचित रुक्मिणी-स्वयंवर, पृ. क्र. ९०-९१.

११ साता वर्षांपासौनि तीस वर्षेपर्यंत विद्याभ्यासु केला कित्ता, पृ. क्र. ८९.

समेमध्ये नारदाचे आगमन व त्यानें सुचविलेले श्रीकृष्णाचे स्थळ; [१२] नारद, रुक्मिणीची सखी मदनमुद्रा व कल्याणकीर्ती किन्नर यांची श्रीकृष्णाच्या समेमधील उपस्थिती[१३] इत्यादी तपशील नरींद्राने स्वीकारला नाही. वास्तविक हा सर्वच तपशील काव्याच्या नाटचगुणामध्ये भर घालणारा होता; परंतु त्यामुळे काव्यास उघडच महानुभावपंथप्रचाराचा वास येईल किंवा या अपरिचित प्रसंगचित्रणामुळे सर्वसाधारण श्रोता बुजेल व रसहानी होईल या भावनेने कवीनें सदर तपशील वगळला असावा. ते काहीही असो. कल्याणकीर्ती-किन्नर या उपाख्यानाच्या निमित्ताने नरींद्राची महानुभावपंथानुगामी वृत्ती व त्याच्या महाकाव्याची (मधुरा) भक्तिरसपूर्ण बैठक चांगली स्पष्ट होते. स्वत: श्री चक्रधरस्वामींनी रुक्मिणी-स्वयंवराची कथा सांगितली ती जीव–शिवाचे रूपक गृहीत धरूनच त्याचा एक मार्मिक पुरावा प्रत्यक्ष कथेत आढळतो. श्रीकृष्ण कौंडिण्यपुरास येतो. रुक्मिणी सौधावरून त्याचे दर्शन घेते आणि इतकीं मोहून जातें की माडीवरून झेप घ्यावी असे तिला वाटते. तेव्हा सुदेव तिला सावरतो. चक्रधरस्वामींनी एवढे कथानिरूपण केल्यावर,

> 'महदंबे पुसीले : जी जी
> रुक्मिणीदेवी माडावरौनि झेप घालिती
> तरि काईहोते जी
> सर्वज्ञे भणितले : जरि उडी घालिती
> तरि तेव्हळिसीकि रथावरि पडती
> तेव्हळीसीचि देवा भक्ता भेटी होती : [१४]
> सुदेवें करीं धरिले भणऔनि
> तेतुके अंतर पडिलें : तेतुका वियोगु पडिला :
> न रहावितें तरि तात्काळीं
> देवा भक्ता भेटि होती [१४]

रुक्मिणी–स्वयंवर कथा म्हणजे चक्रधरस्वामींच्या दृष्टीने देवा–भक्तामेटीची कथा होती हे यावरून स्पष्ट होते. अर्थात नरींद्राचीं भूमिकाही अशीच आहे.

२) जे महाकवी विद्वान आहेत परंतु ज्यांच्यापाशी ईश्वरभक्ती नाही अशांबद्दल कवीच्या मनात आदर नाही. जे विद्वान असून वर ईश्वराचे भक्त आहेत अशा महाकवींबद्दलच कवीस आदर आहे.[१५] स्वत: नरींद्रही असा विद्वान आणि ईश्वरभक्त होता. यातूनच या आद्य मराठी महाकाव्यास महाकाव्याचे एक मोलाचे लक्षण प्राप्त झाले. ते म्हणजे पौराणिक कथेस स्वकालानुरूप नवे परिमाण देणे. कालिदासादिकांच्या लिखित महाकाव्यावरून हे स्पष्ट होईल: कार्तिकेय जन्माच्या पौराणिक कथेस कालिदासाने 'राष्ट्राकरिता स्वार्थत्याग' असा अर्थ दिला. तारकासुराचा वध करण्याचे सामर्थ्य सुखलोलुप देवामध्ये नव्हते. त्यासाठी पार्वतीस खडतर तपश्चर्या करावी लागली. शंकरास निवृत्तीधर्माचा त्याग करावा लागला व अग्नीस कुष्टाच्या, भागीरथीस दाहाच्या आणि कृत्तिकांना लोकापवादाच्या यातना सोसाव्या लागल्या (कुमारसंभव). दिलीपाने राजसंस्थेच्या प्रतिष्ठेसाठी, रघूने यज्ञासाठी, अजाने पत्नीप्रेमासाठी, दशरथाने अपराधाचे प्रायश्चित्त घेण्यासाठी, रामाने लोकानुरंजनासाठी व कुशाने देवासाठी जो त्याग केला त्यातून कालिदासाने भारतीय संस्कृतीचे त्यागप्रधान रूप पौराणिक कथांतून सूचित केले (रघुवंश). सहाव्या शतकात अवैदिक पंथांच्या प्रचारामुळे समाज निवृत्तिप्रधान झाला होता. अशा समाजासमोर, किरात आणि अर्जुन यांच्या पौराणिक युद्धकथेच्या द्वारे प्रवृत्ती आणि पराक्रम यांचे चित्र रेखाटले (किरातार्जुनीय). कृष्ण–शिशुपाल यांच्या पौराणिक कथेतून माघाने 'राजनीती आणि मुत्सद्देगिरी यांचा विजय' असा अर्थ काढला.[१६] संस्कृत महाकाव्यातून काढण्यात आलेला हा कविकालसापेक्ष प्रतीकात्मक अर्थ कदाचित

---

[१२] तंव तेथ नारदु आला ... भीमकाते नारदें भणतले : राआ तुझिअे कुमरीचे अनुपम लावण्य : हे श्रीकृष्णा योग्य' किता पृ. क्र. ९०.

[१३] 'रुक्मिणीदेवी मदनमुद्रेते भणतले तुवां द्वारकेसि जाऊनि श्रीकृष्णचक्रवर्तीचे चातुर्य सौंदर्य लावण्य पहावे : तव नारदु आधिचि द्वारकेसि गेले...ऐसा समयीं किन्नरा वेदघोषासहितु कल्याणकीर्ती बंदोजन द्वारकेसि आला' किता, पृ. क्र. ९०.

[१४] किता, पृ. क्र. ९४—९५.

[१५] जे महाकवी मानिलें जे जाणौनि देवा वालभेले
तेथ येरां काई बोलें जे नेणौनि जाणते –२८

[१६] ग. त्र्यं. देशपांडे, १९६५, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान, पृ. क्र. ३९–४३.

अतिशयोक्त वाटण्याचा संभव आहे. परंतु 'कॉमेडिआ' (डांटे) आणि 'पॅराडाइज लॉस्ट' (मिल्टन) या महाकाव्यांत कवींनी पौराणिक कथेस जो नवा अन्वय दिला आहे त्याबाबत समीक्षकांत बिलकुल मतभेद नाही. पाताळ, वैतरणा व स्वर्ग या पौराणिक कल्पनांना डांटेने व परमेश्वर, सैतान, अॅडम आणि ईव्ह या बायबलमधील पात्रांना मिल्टनने स्वकालोचित असा विलक्षण अन्वय दिला आहे. पौराणिक कथावस्तू निवडणे व तिला स्वकालोचित नवा आशय देऊन सांस्कृतिक संचितास उजाळा देणे, गतकाळ व वर्तमानकाळ यांची सांधेजोड करणे हे महाकवीचे कार्य नरींद्राला साधले आहे. कृष्ण–रुक्मिणी यांचे स्वयंवर म्हणजे एक पौराणिक रम्याद्भुत कथा. तिचे खुलवून खुलवून वर्णन केले म्हणजे झाले अशी एखाद्या आख्यान कवीची भूमिका नरींद्राने स्वीकारली नाही. त्याच्या काळात महानुभाव पंथ नुकताच उदयास आला होता. हा एक अत्यंत पुरोगामी व नवी दृष्टी देणारा धार्मिक पंथ होता. जीव व शिव यांच्यात द्वैत आहे, जीवाने शिवाच्या मीलनासाठी तळमळावे तेव्हा परमेश्वराची भेट होते, इत्यादी या पंथाची विचारसरणी होती. या द्वैतप्रधान मताला जसे आध्यात्मिक प्रयोजन होते तसेच सामाजिक प्रयोजनही होते. यादवकालीन समाज विविध वर्ण, जाती व उपासना यामुळे विस्कळित झालेला होता. सर्वच जीव बद्धमुक्त आहेत, वर्ण–जाती हा भेद व्यर्थ आहे, श्रीकृष्ण हाच एकमेव परमेश्वर आहे, इतर पौराणिक देवदेवता व गावोगावच्या मंदिरातील मूर्ती या क्षुद्र देवता आहेत, इत्यादी विचारसरणीमुळे समाजात एकेश्वरवाद व सामाजिक एकोपा वाढून समाज एकसंध आणि बलशाली होण्यास मदत होणार होती. या विचारसरणीने मोहीत होऊन नरींद्राने रुक्मिणी–स्वयंवर महाकाव्य लिहिले असावे व त्यात शृंगाररसाऐवजी मधुराभक्तीचा उत्कट आविष्कार साधला असावा असे वाटते. रामायण या मूलत वीररसप्रधान मौखिक महाकाव्यास जैन महाराष्ट्रातील कवी विमलसूरी याने 'पउमचरिय' मध्ये शांतरसप्रधान स्वरूप दिले; नरींद्रानेही एका पौराणिक विवाहकथेला आध्यात्मिक आणि सामाजिक प्रयोजन असलेल्या द्वैती, भक्तीचे परिमाण दिले.

"We see him (epic poet) accepting, and with his genius transfiguring, the general circumstance of his time; we see him symbolizing, in some appropriate form, whatever sense of the significance of life he feels acting as the accepted uncon scious metaphysics of his age

असे लेस्ली अॅबरक्रॉम्बीने महाकवींसंबंधी उद्गार काढले आहेत.[१७] स्वकालीन समाजाच्या नेणिवेत असणाऱ्या आध्यात्मिक आशयाचा स्वीकार करून व आपल्या प्रतिभेने त्यावर उचित संस्कार करून महाकवी जीवनार्थाचे प्रतीकात्मक चित्रण करीत असतो असा अॅबरक्रॉम्बीच्या विधानाचा भावार्थ आहे. महाकवीकडून करण्यात येणारी ही अपेक्षा नरींद्राने पूर्ण केली आहे.

३. 'रुक्मिणी–स्वयंवर' लिहिताना नरींद्राच्या दृष्टीपुढे संस्कृतातील लिखित महाकाव्यांचा आदर्श होता अशा अर्थाचे उद्गार डॉ. वि. भि. कोलते[१८], प्रॉ. के. ना. वाटवे[१९], श्री. रा. चिं. ढेरे[२०] आदी विद्वानांनी काढले आहेत. मध्ययुगातील इतर अधिकांश मराठी कवींनी आख्यानक काव्ये लिहिली; नरींद्राला मात्र संस्कृतातील लिखित महाकाव्य–प्रकाराचे भान होते–– या अर्थाने वरील उद्गार सार्थच आहेत. परंतु महाकाव्य या वाङ्मयप्रकाराकडे ऐतिहासिक व तांत्रिक दृष्टीने पाहताना मात्र वरील विधान थोडे बदलवून घ्यावे लागते. वस्तुतः नरींद्राने केवळ संस्कृतातील लिखित महाकाव्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवलेला नसून संस्कृतातील व प्राकृतातील लिखित महाकाव्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवलेला आहे.

---

[१७] Lascelles Abercrombic, 1922, The Epic–an Essay, P. 48

[१८] वि. भि. कोलते, १९४२, नरेंद्र-कवि-कृत-रुक्मिणी–स्वयंवर (प्रस्तावना), पृ. क्र. ३५

[१९]. के. ना. वाटवे, १९६४, प्राचीन मराठी पंडिती काव्य, पृ. क्र. १२५.

[२०]. रा. चिं. ढेरे, १९६५, नरेंद्रविरचित रुक्मिणी-स्वयंवर, (महाकवि नरेंद्र–व्यक्ति आणि वाङ्मय) पृ. क्र. १२५.

पालीमध्ये 'जिनालंकार' (बुद्धरक्खित) व 'जिनचरित' (वररतन मेधंकर) ही दोनच संस्कृतानुवर्ती महाकाव्ये आहेत; अधिकांश महाकाव्ये संस्कृतातील महाकाव्यलक्षणांकडे दुर्लक्ष करणारीच आहेत. महाबोधिवंस, थूपवंस ही ऐतिहासिक महाकाव्ये तर पूर्णपणे गद्यात आहेत. तसेच पालीतील महाकाव्यांनी पर्व, अध्याय, कांड, सर्ग इत्यादी संस्कृत महाव्यातील परिभाषेऐवजी परिच्छेद व अध्याय ही परिभाषा वापरली आहे. संस्कृतातील अक्षरगणवृत्ताचे बंधनही या महाकाव्यांनी पाळले नाही. प्रवरसेनकृत 'सेतुबंध' (इ. स. ५ वे शतक), वाक्पतिराजकृत गौडवहो' (इ. स. ८ वे शतक), कोऊहलकृत लीलावई' (इ. स. ८ वे शतक) ही महाराष्ट्रीतील महत्त्वाची महाकाव्ये होत. सर्गबद्धता आणि अक्षरगणवृत्तात्मकता ही संस्कृतातील लिखित महाकाव्याची वैशिष्ट्ये या महाकाव्यांनी स्वीकारली नाहीत. सेतुबंध हे महाकाव्य आश्वासबद्ध असून त्यात कवीने मुख्यतः 'आर्या आणि अधूनमधून स्कंधक, गलितक, अनुष्टुभ' इत्यादी छंद वापरले आहेत. यापैकी एकही अक्षरगणात्मक वृत्त नाही. संस्कृतातील लिखित महाकाव्यात सर्गान्ती वृत्तबदल असतो. तसा आश्वासकाच्या अखेरीस कवीने वृत्तबदल केलेला नाही. 'गौडवहो' मध्ये सर्गाऐवजी 'कुलक' व अक्षरगणवृत्ताऐवजी गाथा छंद वापरला आहे. 'लीलावई' हे महाकाव्य तर अखंड असून त्यात अनुष्टुप छंदाबरोबर गद्यही आले आहे. अपभ्रंशात तर संस्कृतानुगामी लिखित-महाकाव्य एकही नाही. स्वयंभू व त्रिभुवन स्वयंभू यांची 'पउमचरिअ' आणि 'रिठ्ठणेमिचरिउ' ऊर्फ 'हरिवंसपुराण' ही पुराणशैलीतील महाकाव्ये होत. पुष्पदंताचे 'महापुराण' व धनपालाचे 'पंचमीकहा' ही महाकाव्येही पुराणशैलीतील होत. संस्कृतातील लिखित महाकाव्यसंकेताकडे अपभ्रंशातील महाकवींनी असे जास्तीत जास्त दुर्लक्ष केले आहे.

पाली, माहाराष्ट्री, अपभ्रंश या भाषांतील महाकाव्यप्रकारांचा हा इतिहास लक्षात घेतला म्हणजे नरेंद्राने माहाराष्ट्री प्राकृतातील प्रवरसेन—वाक्पतिराज यांच्याप्रमाणेच संस्कृतातील लिखित महाकाव्यप्रकाराचे अंधानुकरण न करता त्या प्रकाराला आत्मसात केले, त्यातील कृत्रिमता दूर करून त्याला नूतन सामर्थ्य दिले असे दिसेल. सर्गबद्धता, श्लोकबद्धता, सर्गान्ती वृत्तबदल, शृंगार किंवा वीररस यांना प्राधान्य हा संस्कृत लिखित महाकाव्याचा साचा मोडून नरेंद्राने सर्गरहित ओवीबद्ध व मधुराभक्तिरसप्रधान महाकाव्य लिहिले.

★★★

अनुक्रमणिका

कविवर्य ना. घ. देशपांडेकृत "कधीतरी" – एक विचार

माधव गोपाळ देशमुख

कधीतरी

नको उसासा, नकोत अश्रू, नको उमाळा;
पडेल जाणे कधी तरी मी भिऊ कशाला ?

अजाणतेने नको नवाजू, नको निखंदू :
कडू असो गोड की, जिवा, घे पिऊन प्याला !

सरेल आता सरेल ही उब दो दिसांची;
नको तरी राहिला सदाचा पुढे हिवाळा.

जरी इथे वाटते मिळावी उशी परांची
मिळेल केव्हा तरी पुढे गोवरी उशाला.

तुला, जिवा रे, फिकीर आहे जरी दुजांची
तुझी पुढेही जरूर वाटेल का कुणाला ?

पुनःपुन्हा आसवे गळाली जरी कुणाची
स्मृती पुढे विसरून जातील या जिवाला.

अनंत आशा फुलोत वा ना फुलोत काही;
असेल जो तो पटेल, देवा, तुझा हवाला !

कवि ना. घ. देशपांडे यांचे 'कधीतरी' हे एक नितांतसुंदर भाव–गीत आहे. मराठी काव्य–समीक्षेच्या क्षेत्रात जे अनेक शब्द बदनाम झालेले आहेत त्यांपैकी दुर्दैवाने 'भावगीत' हाही एक आहे. खरोखर भावगीतात भाव हा काव्यात्म हवा, तद्वत गीत हे देखील त्याच्या काव्यात्मतेशी एकरूप झालेले असावे. पण भावगीत या नावाने संबोधल्या जाणाऱ्या फारच थोड्या कवितांना भाव आणि गीत यांच्या एकरूपतेची आणि एकात्मतेची कसोटी लावता येते. "कधीतरी" हे एक या कसोटीला उतरणारे 'भावगीत' आहे.

वस्तुतः संपूर्ण काव्याच्या मुळाशी असलेले एकमेव तत्त्व कोणते, असा जर प्रश्न विचारला तर ते तत्त्व म्हणजे 'भावगीत' हेच म्हणावे लागते. All poetry, good and great, is essentially lyrical हे जसे आधुनिक मत; तसेच 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' या प्राचीन मतातील 'रसतत्त्व' हेही अखेरीस भावाधिष्ठितच नाही काय ? काव्यामधील विचार हा प्रतिमांच्या साहाय्याने केलेला विचार हे तर खरेच, पण प्रतिमांच्या साहाय्याने केलेला विचार हा संगीतगर्भ विचार असतो व अशाच विचारांना काव्य हे नाव मिळते.

काव्यामध्ये शब्दांकित झालेला विचारच असतो, तो संगीतगर्भ असतो, तो कविगत भावानुभवावर अधिष्ठित असतो; पण या भावानुभवाची गाढता ही त्या विचारातील आशयघनतेवर अवलंबून असते प्रेष्ठ आणि श्रेष्ठ काव्याची ही सर्व लक्षणे ना. घ. देशपांडे यांच्या कवितांत ओतप्रोत भरून राहिलेली दिसतात. 'शीळ' हा त्यांचा काव्यसंग्रह त्यातील नाद,

चित्र, भाव आणि अर्थ यांच्या सौंदर्यामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. पण त्यांच्या 'कधीतरी' या कवितेचे आणखी काही वेगळेच वैशिष्ट्य आहे. ही कविता केवळ भावगीत नाही तर ती लौकिक प्रेमादि भावभावनांच्या पलीकडे असलेल्या परतत्त्वाचा स्पर्श घडविणारी श्रेष्ठ कविता आहे.

सर्व प्रकारच्या काव्याच्या मुळाशी असलेले तत्त्व हे जसे 'भावगीतात्मक' आहे तसे श्रेष्ठ काव्याचे व्यवच्छेदक लक्षण परतत्त्वस्पर्श आहे. दैवी संपत्तीचा सर्वप्रथम सात्त्विक गुण म्हणजे निर्भयता हा होय. अलीकडील मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रवेत्ते आधुनिक काळातील सर्व दुःखाचे आणि मानसिक अस्वास्थाचे मूळ सर्व प्रकारच्या भीतीमध्ये आहे असे मानतात. ईश्वरावर हवाला ठेवून या भीतीचे निर्मूलन करावे, असा संदेश या नितांतमधुर भावगीतातून कवीने दिला आहे.

> नको उसासा, नकोत अश्रू, नको उमाळा
> पडेल जाणे कधीतरी: मी भिऊ कशाला ?

सर्व दुःखांचे मूळ भीती आहे. माणसाला सर्वात जास्त भीती कशाची असणार ? अर्थात् मृत्यूची ! पण मला आज ना उद्या कधीतरी मरायचेच आहे, मरण हे जर जन्माइतकेच अटळ आहे तर मी मृत्यूला का बरे भिऊ ? आणि मृत्यूचीच भीती जिंकली तर भिण्याचा त्याहून मोठा विषय उरलाच कोणता ? विनोबांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे ज्याने भीतीचा भाव जिंकला आहे त्याला मरण हे तरी काय मोठे मरण वाटणार आहे ? आणि ज्याला भीतीच उरली नाही, त्याला भीतीची तरी काय भीती वाटणार आहे? मग पाहिजेत कशाला ते उसासे, ते अश्रू आणि ते दुःखाचे उमाळे ?

अखेरीस आयुष्य म्हणजे हळूहळू पिऊन टाकण्याचे एक पेय आहे. ते कडू असो की गोड असो. त्याच्या गोडीचा गोडवा गाणे किंवा कटुतेचा कंटाळा करणे निरर्थक आहे. सामराज कवीने म्हटल्याप्रमाणे :–

> आयुः पयाचा अतिगोड प्याला।
> हळूहळू काळबिडाल प्याला !

आयुष्यरूपी दूध हे कितीही गोड वाटले तरी काळरूपी मांजर ते हळूहळू पिऊन नाहीसे करणारच आहे. मग जीवनातल्या सुखांची स्तुती करणे व दुःखांची निंदा करणे हे सर्वस्वी अज्ञानमूलकच नाही काय ?

सुखाची ऊब घेताना हे कधी विसरता नये की ही ऊब दोन दिवसांची आहे; आज आहे पण उद्या नसणार ! इतकेच काय पण उद्यापासून आपल्या नशिबात दुःखाचा हिवाळा आणि अश्रूंचा पावसाळा कायमचा लागून राहण्याचा संभव आहे.

अशा परिस्थितीत आज जरी "सुखं च मे शयनं च मे" या वृत्तीने अंगाखाली मऊ गादी व डोक्याखाली परांची उशी मिळावी असे वाटले तरी हे विसरता येत नाही की पुढे कधीतरी मृत्युशय्येवर झोपायचे आहे आणि त्यावेळी डोक्याखाली गोवरीची उशीच ठेवली जाणार आहे !

हा माझा, तो माझा अशी दुसऱ्याची कितीही काळजी वाहिली तरी त्याला माझी कधी जरूर भासेल काय, हा विचार केला पाहिजे. आपल्यासाठी आज कोणी पुनः पुनः अश्रू ढाळणारा दिसला तरी कालान्तराने त्याला आपले स्मरणही राहणार नाही !

मानवी जीवन हे आशा-आकांक्षांनी भरलेले आहे. पण आशांना काही अंत आहे काय ? काही आशा सुफलित होतील काही होणारही नाहीत. पण मनुष्य जगत असतो तो या आशांच्याच जिवावर ! असा जो कोणी असेल त्याला हे पटेल. पण परमेश्वरा, केवळ तुझ्यावर हवाला ठेवून जगणे एवढेच माणसाच्या स्वाधीन आहे.

सुखदुःखाच्या द्वंद्वात गुरफटलेल्या माणसाला ईश्वरार्पण बुद्धीने काम करीत राहिल्यास ब्रह्मास्वादसहोदर अशा एका निर्द्वंद्व आनंदाचा आस्वाद घेता येतो, असा दिलासा 'कधीतरी' या काव्यातून मिळतो. ही कविता साध्या विषयामधून मोठा आशय दाखवीत आहे. यातील साध्यासुध्या प्रतिमांतून कवीच्या संतवाङ्मयाच्या व्यासंगाची आणि लोकगीतांतील रसरशीतपणाची साक्ष मिळते. यातील प्रत्येक प्रतिमा ही गाढ अशा भावानुभावाशी बिलगली असून यात भाव आणि गीत, विचार आणि भावना, अलंकार आणि रस, तसेच आशय आणि अभिव्यक्ती यांचे रसायन एकरूप झाले आहे.

मनाला चटका लावून टाकणाऱ्या या कवितेचे एकवार जरी श्रवण केले तरी तिचा परिणाम मनावर खोलवर होतो व तिच्यातील गाढ आशयाच्या संस्कारामुळे आपले मन उजळून निघते.

★★★

मराठी रंगभूमीवरील नाट्यसंगीताचा विकास

समालोचक कै. नाना जोग

[बारा वर्षांपूर्वी, १९५१ साली, बिदर्भ साहित्य संघात एक नाट्यसंगीतविषयक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुप्रसिद्ध नाटककार कै. नाना जोग आणि विख्यात गायक कै. रामभाऊ गुळवणी यांनी त्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. निवेदन नाना जोगांचे व संगीत रामभाऊंचे, असा हा कार्यक्रम फार यशस्वी ठरला. मध्यंतरी कै. रामभाऊ गुळवणी यांचे चिरंजीव श्री. मधुकर गुळवणी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पुनः सादर करण्यात आला. आता त्यांच्याच सहकार्याने कै. नाना जोग यांचे चिरंजीव श्री. आनंद जोग यांनी विदर्भात काही ठिकाणी हा कार्यक्रम सादर करण्याची योजना आखली आहे. या कार्यक्रमातील कै. नाना जोग यांनी लिहिलेले व अजून मराठीत प्रसिद्ध न झालेले निवेदन येथे देत आहो. --संपादक]

प्रथम आजचे आपले गायक श्री. रामभाऊ गुळवणी यांचा थोडक्यात परिचय करून देतो.

कोल्हापूरजवळच्या गगनबावडे जहागिरीतल्या श्री. बाळूबुवा राशिवडेकरांचे रामभाऊ हे चिरंजीव. बाळूबुवा राशिवड्यातल्या विठोबाचे पुजारी होते. त्यांना कै. बाळकृष्णबुवा अिचलकरंजीकरांकडून संगीताचे शिक्षण मिळाले होते. आणि त्याच संगीताचे रामभाऊंनाही लहानपणी बाळकडू प्राप्त झाले. रामभाऊंच्या वयाच्या अकराव्या वर्षी, म्हणजे १९११ साली, त्यांच्या गावात गावकऱ्यांनी एक उत्सव केला होता. त्या उत्सवात शारदा नाटकात रामभाऊंनी शारदेची भूमिका केली होती. त्यांची ही भूमिका लौकरच त्यांच्या अंगाशी आली. कारण दुसऱ्या वर्षी कोल्हापुरास कै. केशवराव भोसल्यांच्या ललितकलादर्श नाटक मंडळीचा मुक्काम असतांना केशवरावांनी रामभाऊंचे गाणे ऐकले नि त्यांना आपल्या नाटक मंडळीत ठेवून घेतले आणि १९१२ साली रामभाऊंनी सौभद्रातील नारदाच्या भूमिकेत रंगभूमीच्या व्यवसायात पदार्पण केले.

नंतर हळूहळू शारदा, वसंतसेना, चंद्रसेना, सुभद्रा, इत्यादी भूमिका त्यांनी वठवल्या. रामभाऊंना त्या काळात अब्दुल करीमखां साहेबांचे शिष्य कै. दशरथबुवा मुळे यांची जवळजवळ दोन वर्षे संगीताची शिकवण प्राप्त झाली आणि केशवराव भोसल्यांकडूनही जवळजवळ पांच वर्षे गाण्याची व अभिनयाची तालीम प्राप्त झाली.

पुढे १९२१-२२ साली रामभाऊ गंधर्व नाटक मंडळीत होते. त्यानंतर त्यांनी स्वतःची केशव संगीत मंडळी स्थापन केली व चालवली. ही मंडळी बहुधा प्रत्येक भागीदारीची जी अखेर होते तशीच तिची अखेर होऊन म्हणजे विसर्जित होऊन बंद झाली आणि इंदूरचे सुप्रसिद्ध रसिक आणि संगीतज्ञ श्री. रामभाऊ-साहेब दाते यांच्या आग्रहामुळे आणि जवळजवळ त्यांच्याच आश्रयाच्या आधारावर रामभाऊंनी गायकाचा व्यवसाय पत्करला. नागपूरचे श्रीमंत बाबुराव देशमुख यांचाही आज त्यांना मक्कम आश्रय आहे. आज जवळजवळ २५ वर्षे झाली आहेत, रामभाऊ याच व्यवसायावर आपला चरितार्थ चालवीत आहेत.

ग्वाल्हेर दरबारचे गायक म्हणून ते १९३६ ते १९४४ ग्वाल्हेरातही होते.

आता आजच्या कार्यक्रमाची कल्पना थोडक्यात ऐका.

* * *

प्रत्येक व्यक्तीला, वस्तूला, संस्थेला जसा इतिहास असतोच असतो, तसाच मराठी रंगभूमीवरील संगीतालाही फार मोठा इतिहास आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीचे रंगभूमी हे फार मोठे प्रभावी अंग होते-- आजही आहे. तिला आज गंडांतर आल्यासारखे दिसत असले तरी तिला वाचवण्यासाठी आज चाललेला सार्वत्रिक प्रयत्नही त्याच सांस्कृतिक चळवळीचा एक भाग आहे. या रंगभूमीवरील संगीतासंबंधी त्या विषयावरील अधिकारी लेखक वरचेवर नियतकालिकांतून लेख लिहीत असतात, ग्रंथ लिहीत असतात. आपण ते वाचतोही. परंतु जी कला श्राव्य कला आहे, तिच्या इतिहासाची कल्पना प्रत्यक्ष श्रवणाशिवाय येऊच शकत नाही. म्हणूनच मराठी रंगभूमीवरील संगीताचा गेल्या साठ-सत्तर वर्षात कसा विकास झाला, त्याची अगदी मर्यादित अशी कल्पना देण्यासाठी म्हणून हा कार्यक्रम आखला आहे. वस्तुतः संगीताचें शास्त्र आणि कला इतकी गहन आणि अपार आहेत की त्यांची सांगोपांग कल्पना तर राहोच, पण साधी तोंडओळखही सखोल अभ्यासाशिवाय होणे शक्य नसते. तरीसुद्धा ह्या कलेपासून सर्वसाधारण माणसालाही आनंद हा होतोच. आणि गेल्या कित्येक वर्षांतील--जवळजवळ तीन पिढ्यातील--आबालवृद्धांनी हा जो आनंद अनुभवला त्याच आनंदाचा थोडासा अनुभव आपल्यालाही यावा म्हणून मराठी रंगभूमीवरील संगीताच्या विकासाची-- इतिहासाची--अगदी ओझरती अशी रूपरेखा आजच्या कार्यक्रमात मांडण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

मराठी रंगभूमीवरील संगीताचा विकास ढोबळ मानाने तीन अवस्थांतून झाला.

पहिली अवस्था, महाराष्ट्रात पेशवाईच्या अखेरीस लोकप्रिय झालेल्या लावणीच्या आणि कथेकऱ्यांनी लोकप्रिय केलेल्या साकी-दिंडी इत्यादी छंदांच्या प्रकारची होती. महाराष्ट्राचे पहिले नाटककार विष्णुदास भावे यांनी या प्रथेला सुरुवात केली. परन्तु त्यांचे लिखाण आज उपलब्ध नाही असे म्हणतात. त्यानंतरचे नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर. आणि त्यांचे पहिले नाटक 'शाकुंतल'. नंतर 'सौभद्र', 'रामराज्यावियोग' ही सुप्रसिद्ध नाटके, आणि फारसे प्रसिद्ध नसलेले 'शंकरदिग्विजय'. किर्लोस्करांनी आपल्या नाटकात लावणी, साकी, दिंडी, इत्यादी संगीत-प्रकारांबरोबरच कर्नाटकी संगीत पद्धतीलाही रंगभूमीवर स्थान दिले. अण्णासाहेब बेळगावजवळ कर्नाटकांतल्या गुर्लहोसूरचे रहाणारे होते. साहजिकच त्यांच्या मनावर कर्नाटकी संगीतपद्धतीची थोडी छाप होती.

किर्लोस्करांच्या पद्यांची शब्दरचना साधी, सोपी आणि प्रासादिक असे. अलिकडच्या संगीत नाटकात पूर्वीचीं मंगलाचरणांची आणि नाट्यविषयाचा प्रास्ताविक परिचय करून देण्याची पद्धत गाळण्यात आली असली तरी आजच्या चित्रपटातून लेखकाचा, दिग्दर्शकाचा, विषयाचा, सुरवातीस प्रेक्षकांना परिचय करून देण्यात येतो. हीच पद्धत पूर्वीच्या नाटकातहि पाळण्यात येत असे. प्रथम मंगलाचरण. आपणही सौभद्रातल्या मंगलाचरणापासून सुरवात करू.

आता भूप रागातील 'नमुनि ईशचरणा' ऐकू या.

नमुनि ईशचरणा।
करिन मग गजाननाच्या पास्मरणा ॥ ध्रु. ॥
सुकविरत्नमाला।
अतिशोभा दे यदीय सुंदर वृक्षाला ॥
जिच्यामध्ये महामणि प्रकाश पाडित सुवर्णपदका
बसोनिया।
कालिदास राणा ॥ नमुनि ॥

यानंतर प्रत्यक्ष नाटकात प्रवेश करण्यापूर्वी सूत्रधार आणि नटी यांच्यात नाटकातल्या कथावस्तूला धरून थोडा विनोदी संवाद होत असे.

सूत्रधार नटीच्या जवळ जाऊन म्हणतो- प्रिये, कन्येच्या लग्नाविषयी इतकी अधीर कशाला होतेस ? पहा.'

ऐका ही साकी.

कन्येपूर्वी तिच्या पतिते विधि निपविजतो माये ॥
ईशाज्ञेविण कांही न होती सृष्टीतील ती कार्ये ॥
म्हणुनी स्वस्थ रहा ॥ विधिघटनेची वाट पहा ॥

त्यानंतर नटी म्हणते– पुरे बाई, नेहमी असा वेदांत सांगायचा, अशानं काय होणार आहे ? मुलगी वाढत चालली, तिच्याकरिता एखादं चांगलसं स्थळ आपण नाही ना पहात ?'

सूत्रधार म्हणतो– 'काय वेडी आहे पहा ! अग आम्हाला कांहीच का काळजी नाही असं समजतेस तूं ? ऐक तर––'

ह्यानंतर पुढची दिंडी––

तुझी चिंता दूर करायाते
करुनी आलो सखि लग्न निश्चयाते
विभव सद्‌गुण कुल रूपयुक्त ऐसा
असे जामात रतिस मदन जैसा ॥

यानंतर नटी म्हणते, 'वरं झालं बाई अेकदाचं.'

असो. आपल्या हे लक्षात आले असेल की पात्रे आपले संवाद गद्याबरोबर पद्यातहि करीत आहेत. वस्तुतः मघा मी सांगितलेल्या नाट्यसंगीताच्या या पहिल्या अवस्थेत संगीताने कथानकाचा धागा तोडण्याचा प्रमाद केला नाही. इतकेच नव्हे तर कथानक पुढे सरकविण्याच्याहि कामी पद्यांचा उपयोग केला जात असे. मोठेमोठे तानसपाटे, आस्ताई अंतरा, असे बैठकी थाटाचें संगीत त्या काळी रंगभूमीवर गाइले जातच नसे. मघाच्या दिंडीत रामभाऊंनी टप्प्याटप्प्यांच्या लहानलहान मुरक्या घेतल्या. त्यांच्याच मर्यादेत संगीताची सौंदर्यसाधना होत असे ही गोष्ट ध्यानात ठेवण्याजोगी आहे.

आता सूत्रधार–नटीच्या प्रास्ताविक संवादात नाटकाची व लेखकाची ओळख गद्य–पद्यातून कशी करून देण्यात आली आहे ती ऐका.

सूत्रधार म्हणतो– 'प्रिये आमच्या कन्येच्या विवाहाच्या गोष्टीच का या सभासदांनी अेकायच्या ? हे माझं नाटक पहाण्याकरिता आले आहेत.

नटी म्हणते– 'महाराज आज कोणतं नाटक करणार आपण ?'

सूत्रधार म्हणतो– 'ऐक !'

कालिदासमुख कविकृतिपक्वान्नाते सेवुनि विटले ॥
रसिक तयांना पुनर्बुभुक्षाकरणीं तिखटचि केले ॥
बलवत कविवर्य आपुल्या परिमित चातुर्ये ॥

तर अशा उद्देशाने त्या कवीने रचलेले जे संगीत सौभद्र नाटक ते मी आज करून दाखवणार आहे.

नाट्यसंगीताच्या या पहिल्या अवस्थेत रंगभूमीवर रागदारीचाहि क्वचित् उपयोग केला गेला, नाही असे नाही. परंतु या काळात पात्र आपले हृद्‌गत प्रेक्षकांना आणि शेजारच्या पात्राला वळवण्यासाठीच गद्याप्रमाणे पद्याचा उपयोग करीत असल्यामुळे त्या रागांचा धांगडधिंगा रंगभूमीवर चालत नसे. पद्यांचा अर्थ स्पष्ट समजेल असेच प्रसंगाच्या औचित्याला धरूनच ते गाइले जात असे. नटांची प्रसिद्धि त्यांच्या शुद्ध वाणीवर, स्पष्ट व खणखणीत उच्चारावर अवलंबून असे.

हा प्रसंग पहा.

कृष्ण रुक्मिणीला म्हणतो– 'वरं तिकडेच चला. या उकाड्याच्या दिवसात ही जागा अगदी उपयोगी नाही. तशातून या वेळेस––'

पुढचं मल्हार रागातील पद्य आहे–

नभ मेघांनी आक्रमिले ।। तारांगण सर्वही झांकुनि गेले ।।
कड कड कड कड शब्द करोनी ।।
लखलखता हे सौदामिनी ॥
जातात हे नेत्र दिपोनी ।।
अति विरहि जन, व्याकुळ झाले ॥

मघाशी मी म्हटले होते की, अण्णासाहेबांनी कर्नाटकी चालींना आपल्या नाटकात बरेचसे स्थान दिले होते. 'पांडु नृपति जनक जया' हे त्यांचं सुप्रसिद्ध पद 'क्षीरसागर नम्मनी' या कर्नाटकी चालीवर आहे. तसेच त्यांचे दुसरे प्रसिद्ध पद्य 'नच सुंदरी करूं कोपा' हे 'विडोरंगा हचरळूं' या कर्नाटकी चालीवर आहे.

आता 'नच सुंदरी करू कोपा मजवरि धरी' हे गीत ऐकू या.

नच सुंदरि करूं कोपा ।। मजवरि धरि अनुकंपा ॥
रागाने तव तनुहि पावत कशि कंपा ।।
नारी मज बहु असती ।। प्रीती परि तुजवरती ।।
जाणसि हे तूं चित्ती ।।
मग कां ही अशि रीती ।।

करि मी कोठें वसती ॥
तरि तव मूर्ती दिसती ॥
प्रेमा तो मजवरिचा ॥
नेमूं नको लोपा ॥ नच सुंदरि ॥

याच काळात लावणीच्या प्रकारांचा अुपयोग होत असे असे मी मघा म्हणालो होतो. 'वद जाऊं कुणाला' 'प्रियकर माझे', 'माझ्या मनिचे', ही सौभद्रातली किंवा शाकुंतलांतलं 'मना तळमळसी', ही प्रसिद्ध आणि त्या काळी सर्वतोमुखी झालेली पदे चटचट अुल्लेखता येतात.

मना तळमळसि । अुगिच कां असा हळहळसी ।
प्रथम फसलेसि । अैन सुखाच्या समयीं मीति ।
घरुनि कसें वसलेंसि । मना० ॥
लता मंडपा सुख सेवाया । येअीन पुन्हां तुजपाशीं ॥

हे पद पिलू रागातील आहे. शास्त्रकारांनी पिलू रागाची प्रकृति संथ आहे असे सांगितले आहे. 'वद जाऊ कुणाला' हे आजही सर्वतोमुखी असलेलं पद असंच संथपणें गायला हवं. ते पूर्वीच्या काळांत कसं गात असत आणि आता कसं गातात हे पाहू या--

वद जाऊं कुणाला शरण करील जो हरण संकटाचें ।
मी धरिन चरण त्याचें ॥ अग सखये ॥
बहु आप्त बंधुबांधवां प्रार्थिले कथुनि दुःख मनिचें ।
ते हाय विफल साचे ॥ अग सखये ॥
मम तात जननि मात्र ती ।
बघुनि कष्टती हाल ईचें ॥
न चलेंच काहि त्यांचे ॥ अग सखये ॥
जे कर जोडूनि मजपुढे नाचलें थवे यादवांचे ॥
प्रतिकूल होति साचे ॥ अग सखये ॥

आता अगदी थोडक्यात आजची चाल बघा.

हा शेवटचा प्रकार वगळला तर मराठी रंगभूमीवरील संगीताची पहिली अवस्था कशी होती याची थोडीशी कल्पना आपल्याला आतापर्यंत आलीच असेल.

आता आपण थोडेसे दुसऱ्या अवस्थेकडे वळू. या काळातले नाटककार म्हणजे देवल आणि श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. या नाटककारांनी दिंडी, साकी वगैरे साध्या पद्यप्रकारांना हळूहळू फाटा दिला. त्यांनी नव्या रागरागिण्या, त्यांच्या काळी पारशी थियेट्रिकल कंपन्यांनी लोकप्रिय केलेल्या काही ढंगदार चाली आणि ठुमऱ्या रंगभूमीवर आणिल्या. पण नव्याने पदार्पण करणाऱ्या या रागरागिण्यांनी नाटकाचे कथानक आणि रसपरिपोष पायाखाली न तुडविण्याची काळजीही घेतली. या नाटकारांच्या पद्यांची शब्दरचना रसाळ, प्रसंगाला आणि गाणाऱ्या पात्राच्या मनस्थितीला मानवेल, भूमिकेला घातक न होईल, अशीच असे. भीमपलासीतलं--मला वाटतं हा राग ज्या पद्यामुळं प्रथम लोकप्रिय झाला ते-- देवलांच्या शारदेतले पद "मूर्तिमंत भीति उभी", तसेच कोल्हटकरांच्या मूकनायकातले तिलक कामोदातले सरोजिनीच्या तोंडी घातलेले "अवचित गेले किंकरकरि" हे पद त्या काळीं आबालवृद्धांना तोंडपाठ असे. याचे कारण त्या पद्यांच्या चाली सुंदर होत्या हे तर खरेच, पण त्यांची शब्दरचना मनातल्या भावना अुचंबळवीत असेल हेही होतं. आता देवलांचं शारदेतील हे पद ऐकू या.

मूर्तिमंत भीति उभी मजसमोर राहिली
वाटते दुजा सुदाम मज दिसेल त्या स्थळीं
दाखवावयासि मला तात नेत त्याकडे
राक्षसां रुचेल काय पहावया जसा बळी

तसेच 'मूकनायका' तील कोल्हटकरांचे तिलक कामोदातले पद "अवचित गेले किंकरकरि" हेंहि ऐकण्यासारखे आणि सहज समजण्यासारखे आहे.

अवचित गेलें किंकरकरिं
हृदयीं शिरुनि सिंहासनि बैसुनि
शासन मज करि ॥ अवचित ॥
वाटे आशा त्या नच करितां
त्याची आज्ञा मान्य करावी ॥
कृत्रिम अंतर दूर करूनि
निकटची बसवुनि करिं ॥ अवचित ॥

मराठी रंगभूमीवरील संगीताच्या दुसऱ्या अवस्थेतील आणखी अेक अुदाहरण घेवू आणि शेवटी तिसऱ्या अवस्थेचे निरूपण करू.

पहिल्या अवस्थेचे निरूपण करताना मी आपणास सांगितले होते की त्या काळी पात्रे आपले हृद्गत अेकमेकांना गद्याप्रमाणे पद्यातून कळवीत असत आणि त्यामुळे कथानकाचा धागा तुटत नसे. मूकनायकातला सरोजिनी-विक्रांताचा पुढला गद्य पद्यातला संवाद थोडा अेका. प्रथम मी तो गद्यातच

अनुक्रमणिका

वाचून दाखवितो. नंतर त्यातली पद्ये रामभाऊ गाऊन दाखवतील. त्या पद्यांच्या मूळ चाली हिंदुस्तानी –म्हणजेच हिंदी–उर्दु मिश्रित भाषेत दिल्या आहेत– अेका पद्याची चाल आहे. "ओ मेरी जान दुलन तय्यार' नि दुसऱ्याची आहे "अे जी हो तुम आये जो चारो जवान". या पद्यांची गायकी अशीच रहात असे की जिच्यामुळे संवादाचा प्रवाह तानांच्या भोंवऱ्यांत गुरफटू नये आणि अगोदरचे पात्र पद्यापूर्वी गद्यात कांय बोलले होते याचा दुस-या पात्राला तसाच प्रेक्षकालाहि विसर पडू नये.

पुढचा संवाद प्रथम गद्यात अैका. सबंध संवाद वाचूनच दाखवतो.

विक्रांत म्हणतो –– प्रेमांध होअूनी येई इथें प्रेमार्थी; अव्हेर करी नच घेई मनी दीनार्तो.

सरोजिनी म्हणते — तुमच्या प्रेमांधपणाने नेमकं हें अंत:पुर दाखवलं त्याअर्थी तें डोळसपणा-पेक्षांहि डोळस म्हंटलं पाहिजे.

विक्रांत म्हणतो –– तेव्हां आतां माझं रक्षण करणं तुझ्याकडे आहे.

सरोजिनी म्हणते– आंधळेपणामुळें जसे तुम्हीं नेमके अंत:पुरात शिरलांत त्याचप्रमाणे नेमके त्याच्या वाहेर निघून जा पाहू. किंवा ज्याअर्थी तुम्ही रक्षण करण्याचं काम मजकडे सोपवलं आहे त्याअर्थी मीच तुमच्या वरोवर रक्षक देअून वाहेर पोंचविण्याची तजवीज करते पाहिजे तर.

विक्रांत म्हणतो– वाहेर जाऊन करूं काय ?

तुजविणे गमे वृथा संसार ।।
संसारसौख्य कुठचे ।।
ध्वनि जिथें न तव चरणिचें ।।
तुजविणे जगी, कुठे आराम ।।
आरामहीन सृष्टि ।।
तव जिथे न शीतल दृष्टि ।।
तुजविण नसे कुठे आलोक ।।
आलोक शून्य जगतीं ।।
तव हास्य जिथे नच सुदति ।।
तुजविण नको नको आनंद ।।
आनंद तरिच होओी ।।
अनुभवा तुझ्यासह येओी ।।

—छे छे ! शरणांगताला असं लाथेनं तुडवणं चांगलं का ?

सरोजिनी म्हणते– मीहि तुम्हाला विचारते; असा लहान तोंडी मोठा घास घेणं चांगलं कां ? या मागीत तुम्हाला कशा कशा अडचणी येतील याची तुम्हाला कल्पना नाहीं वाटतं ?

सुलभ मनि गणा न भूपसुता
करूं वघतां कशि ती वनिता ?
पडले धरणीपालहि चरणीं
प्रयत्न जाति वृथा सकलहि
वीरहि आले परतुनि गेले
मुळीं न यश मिळतां तयांप्रति
राजकुमारी उभी सामोरी
त्यजा न किंकरता विसरूनी

मी जिला तिसरी अवस्था म्हणतो ती गाण्याच्या वैठकीचीच अवस्था होती ! फरक अेवढाच की गायक रंगभूमीवर ऊभा होऊन वैठकीचा रंग मारू लागला !! त्याचे साथीदार, इथं रामभाअूच्या वाजूला नि मागे वसले आहेत तसे न वसता त्याच्या समोर वसत असत. आणि रंगमंचावरचे त्याचे साथी-दार–त्यांची गत ? नाटकातल्या प्रसंगापेक्षा शतपटीनं करुणाजनक असा प्रसंग त्यांच्यावर ओढवत असे ! अशा वेळी ते काय करायचे ? अेकच प्याल्यातल्या सिंधूनं पद्माकराला निक्षून सांगायचं, "वेड्या, हे पाय जिथं असतील तिथंच माझा स्वर्ग, तिथंच माझा वैकुंठ, आणि तिथंच माझाच कैलास ! आणि तिनं सुधा-कराचे पाय खाली गुडघे टेकून धरायचे, आणि 'कशि या त्यजुं पदाला' हे पहाडी गज्जलांतलं पद सुरू करून हळूच गाता गाता अुभं व्हायचं नि समोर यायचं, नि तब्बल अेक तास घोळून ते गायचं. पण त्या स्वर्गीय स्वरांचा आस्वाद घेत प्रेक्षक धुंद झाले असता रंगमंचावरच्या अुरलेल्या सहा पात्रांनी काय करायचं ? सुधाकर आणि तळिरामला निदान दारूच्या धुंदीत सुस्त पडल्याचा 'अभिनय' करण्याची तरी सोय असे ! पण विचारे वाव्रासाहेव, भगीरथ, रामलाल, पद्माकर आणि शरद–त्यांना दारू पिण्याची सोय नसल्यामुळे अेकानं दुसऱ्याशी पहिल्या रांगेतल्या प्रेक्षकांच्या साड्यांवर चर्चा करण्याशिवाय, किंवा तिसऱ्यानं सहज आत गेल्याचा 'अभिनय' करून विड्याचे दोन झुरके मारण्याचा 'बिझिनेस' करण्याशिवाय गत्यंतरच नसे ! 'द्रौपदी' नाटकात तर अेकदा नारायणरावांचे पद चालू असतांना, हौदात पडलेले कौरव जणू काय

गाण्यात पडल्या पडल्या कुडकुडू लागल्यामुळे तिथेच रंगभूमीवर विडचा प्यायले म्हणतात ! पाण्यातून धूर निघू लागल्याचा आभास--रंगभूमीवरची मयसभा झाली, म्हणून काय झालं ?-- तो आभास प्रेक्षकाला कसा पचवता येणार !–

आपल्याला खोटे वाटेल, पण मानापमान नाटकातल्या रागरागिण्यांच्या चिजांत गुरफटल्यामुळे त्या नाटकाचे कथानक धुंडाळण्याचे काम, मला ते नाटक कित्येकदा पाहून साधले नाहीं. शेवटी ते मी वाचून काढलं, तेव्हा कुठं ते कथानक अेकदाचं मला अुलगडलं ! गडकऱ्यांच्या अेकच प्याल्यातली पदांची शव्दरचना सुत्रोध आणि रसाळ तरी होती. पण मानापमानातल्या पदांची ? त्यांचा अर्थ लावण्याची 'शिक्षा' खुद्द गडकऱ्यांनीच आपल्या अेका लेखात सदर्न मराठा रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाचे प्रवास करण्याइतकी कडक असल्याचा निर्वाळा दिला.

रंगभूमीवरील संगीताच्या या तिसऱ्या अवस्थेत गाण्याचे षोकी प्रेक्षक खरं म्हणजे प्रेक्षकांऐवजीं—त्यांना 'श्रोते' म्हणणं जास्त संयुक्तिक होईल--हे श्रोते ललितकलादर्श आणि गंधर्व या दोन्ही मंडळींच्या एकमेकाशेजारी एकाच वेळी प्रयोग होत असलेल्या दोन्हीं नाटकांचीं अेकदम तिकिटं विकत घेत, आणि केशवराव आणि नारायणराव या दोघाही गायकांची पदं वेळेचं सधान साधून ऐकत. मला वाटतं या षोकीन रसिकांची त्रिस्थळी यात्रेची गैरसोय दूर करण्यासाठीच की काय १९२१ साली या दोन संगीत महारथींनी मानापमान आणि सौभद्र या नाटकांचे संयुक्त प्रयोग केले. या प्रयोगांचा अखिल भारतातल्या महाराष्ट्रीय लोकांतच नव्हे तर इतर भाषिकांतहि बोलबाला झाला. परन्तु हा बोलबाला त्या नाटकातल्या नाट्यगुणांविषयी नव्हता; तो नटांच्या अभिनयकौशल्याबाबतही नव्हता. नारायणराव आणि केशवराव या दोघात श्रेष्ठ गायक कोण ? हा चर्चेचा, हिरीरीनं भांडण्याचा, एकेकाच्या चहात्यांचा वादाचा प्रश्न झाला होता ! मी मानतो त्या या तिसऱ्या अवस्थेत रंगभूमीवरील गायकीला आणि गायकांना इतकं प्राधान्य प्राप्त झालं की रंगभूमी ही एक प्रकारचा पहिलवानांचा आखाडा बनली ! ज्याप्रमाणे एखाद्या पहिलवानाच्या सामर्थ्याचं लक्षण सांगताना, तो ज्या जागी अेक हजार दंड पेलतो तिथं त्याच्या शरीराची आकृती त्याच्या शरीरातून निथळणाऱ्या घामानं अुमटते, अशा आख्यायिका लोक सहज जोशांत बोलतात, त्याचप्रमाणे केशवराव भोसल्यांचे चहाते असं म्हणायचे की केशवरावांनी 'दे हाता' हें पद अितके जोरकस म्हटलें की त्यांच्या हाताच्या बोटांवरून ओघळणारा घाम त्यांच्या हाताखाली रंगभूमीवर ठिबकतांना दिसायचा! तसेच त्या काळचे मास्टर दीनानाथ, मास्टर कृष्णराव हेहि 'मास्टर्स ऑफ म्युझिकच' होते. नट म्हणून ते प्रसिद्धीस आले नाहीत.

सारांश, संगीताने रंगभूमीवर त्या काळी आपला अेवढा जबरदस्त पगडा बसवला की गद्य नाटकांवर जगणाऱ्या मंडळ्या धडाधड मोडकळीस आल्या.

नारायणराव, केशवराव, कृष्णराव, दीनानाथ—हे श्रेष्ठ दर्जाचे गायक होते याविषयी वादच नाही. नारायणरावांबद्दल तर ही ख्याती आहे की त्यांनी भीमपलासात लावलेला कोमल धैवत किंवा मालकंसात लावलेला तीव्र निषाद अल्लादियाखां किंवा अब्दुलकरीमखां सारख्या संगीतशास्त्रज्ञांनीहि माना डोलावून मान्य करावा. दीनानाथांच्या गायकीचं अनुकरण तर चांगल्या चांगल्या अच्छेखांनाहि जमले नाही हे सारं खरंहि आहे–महाराष्ट्राला भूषणास्पद होईल अितकं बरंहि आहे.

--पण--पण महाराष्ट्राचं हे भूषण रंगभूमीला मात्र फार जड झालं. महाराष्ट्रात अभिजात संगीताची रुचि, आवड आणि चोखंदळपणा अुत्पन्न करण्याचं फार मोठं कार्य या गायकांनी केलं हे निर्विवाद आहे. भास्करबुवा बखले किंवा रामकृष्णबुवा वझे यांच्यासारख्या गुरूंना जे करता आलं नसतं ते त्यांच्या या शिष्यांनी केलं याविषयी प्रश्नच नाहीं. पण गायकीचे हे मौल्यवान अलंकार रंगभूमीवर चढवले गेले हा मात्र माझ्या मते अयोग झाला. खूप भारी किंमतीचे आणि भारी वजनाचे दागिने बायकोला घालण्यात पूर्वीच्या पुरुषांचे दोन हेतु होते म्हणतात अेक तिच्या सौंदर्यात भर घालायचा हेतु आणि दुसरा तिला त्या वजनात मंदगति करण्याचा. दोन्ही हेतूंचा परिणाम मात्र हा व्हायचा की ती पुरुषांची बंदिवान व्हायची. मराठी रंगभूमी अशीच संगीताची बंदिवान झाली. तिच्यावरचे पूर्वीचे अलंकार गळून पडल्यानंतरही आज तिच्यात चैतन्य निर्माण होअू शकत नाही. अितकी तिला त्या दागिन्यांची संवय लागली. पण हा आजचा विषय नाहीं. हा अिथंच सोडणं बरं.

पारितोषिके मिळालेल्या पांच कविता

दंगा

काळोखाचा कराल आकार
उजळून दाखवित आहे लाल जिव्हा
उत्तर शहरात पूर्व रात्री !
"चिमणी चिमणी दार उघड"
थांब माझ्या बाळाला न्हाऊ घालू दे."
भोसकलेल्या चिमण्या जीवांच्या
किंकाळ्या
काळ्या कोळपलेल्या फासळ्या
तृषार्त रस्त्यांना हवे आहे रक्तपेय
त्यांचे हाल अन् आमचे कौतुक अहवाल

"भूख भूख चिल्लाता मानव
बढ जा आगे खडग् चलाव"
अंतरात जळणारी आग
काढी ओढून जगास दाव !
पुरुषार्थाची तुझ्या सांगता
शेजी कोणी बाईल असता.
(उगाच योनिशुचिता जपता)
जा आण ओढुनी नार
करा रे करा बलात्कार ! !

झोपड्यातून नहाणाऱ्या.
रक्ताला फुटतात डोळे रक्ताळलेले. . .
उत्तर शहरी.
तेव्हाच
गादीत गुंडाळलेले ससे
वाट बघत असतात नांदीची . दक्षिण शहरी.
(ह्या नाटकाला नांदी आहे का?)
बुद्ध, निर्बुद्ध. . महम्मद अकलमंद
सांगितले ते सारे असत्य
पात्याची धार हेच अबाधित सत्य !
पिसाटांचीच धर्मभावना जागरुक असावी ?
ज्योति विझूनच ज्योत जागत रहावी?
काळोखाचा कराल आकार
उजळून दाखवित आहेत लाल जिव्हा
उत्तर शहरात पूर्व रात्री !

- शरद शंगरपवार

अतूट नाते

कुठेतरी इवलंसं पान हलतं
मनातली आशा उगाच पालवते
पिंपरणीच्या झाडावरच्या
दोन भोरड्या भांडतच असतात
तसं काहीच घडत नसतं
अुगाचच मनाचा खेळ.
माथ्यावरचं उन्ह उतरतं
तरी मी उभीच असते
निश्चल – निस्तब्ध
समोरची ती वाट आहे ना ?
अगदी सरळ जाणारी वाट
अर्ध्यावरच थकते
तीही माझ्यासारखीच आहे का ?
अतूट नाते—
असत्याचा स्पर्श
जाणवणारे काहीतरी
खूप विचार मनात दाटतात
आणि मुक्या भावना
तशाच बसतात
ओठाला गवसणी घालून.
भांडणाऱ्या भोरड्या
उडून गेलेल्या असतात;
दूरवर——.

——मंदा पाटील

सांज

उतरावे ऊन
संपावा दिवस
सांजाळल्या प्रकाशात
शांततेचा वास ०

सावल्यांची लांबी
लांब लांब व्हावी
धुळीच्या पायांनी
चाहूल ती यावी ०

क्षितिजाची कूस
रंगांनी भरावी
जलाच्या गर्भात
माया उतरावी ०

अंतरात काही
उजळून यावे
लाज पांघरूनी
शब्दाने फुलावे ०

दिवा जळू द्यावा
तुळशीच्या पाशी
उभा ठाकावा तू
हृदय-द्वाराशी ०

–सौ. अनुराधा वि. देव

कालपासून पाऊस...

कालपासून पाऊस कोसळतो आहे सारखा. अखंड.
पण नेहमी संपतात सारे. तसाच हा पावसाळा. हाही संपेल

बरसतील मुक्त आषाढ श्रावण-- वसंत ग्रीष्मही येऊन जाणारच.
मात्र कोणास ठाऊक कधी या मातीतून अंगभर अंकुर उठेल ?

आभाळाचे दूरत्व तेवढेच राहील. झाडे ही अशीच फुलत राहणार
आपली सुखदुःखे आपलीच. कोण त्यांचे व्यर्थ ओझे करून घेणार ?

आता आपणच आपले असायचे नि आपणच आपल्याला परके
सोबत लाभणार होती कुणी तेव्हाच काळाचेच चुकले होते ठोके.

नसातून जडलेला जीव उपटून घ्यायला हवा मुळापासून
दुखावलेल्या रोपट्यासारखा जळून जाईल हा देह मूकपणे.

कालपासून पाऊस कोसळतो आहे सारखा. अखंड कोसळो.
उठायचेच नाही मातीतून तर सारखेच या धारांचे असणे आणि नसणे.

--प्रभा गणोरकर

शिल्प

वेळ अंधुकं.. क्षितिजावर चंद्रचाहुल थबकलेली
दीठ उघडणाऱ्या फुलात अर्धस्वप्ने अडकलेली

पावलांमधे बांधून आलीस अप्सरेचे घुंगुरगाणे
लय घेऊन फिरू लागे एक वादळ संगीतवाणे

आणि कवळचा अंगाभवती अंधार फिका मंतरलेला
थर्थरणाऱ्या जांभूळबनात भान आपले विसरलेला

जीव भुलून जाईल अशा तळयाकाठी देखणा प्रहर
उरात हल्की लाट उठून ढळेल जरा उनाड पदर

नक्षत्रांच्या पांढऱ्या दवात भिजू नकोस विरून जाशील
मावळतीला देऊ नकोस किरणे वेचून आकाशातील...

--ललित सोनोने

इतर कविता

मी फिरते आहे वणवण काळोखातून

मी फिरते आहे वणवण काळोखातून
रस्त्यावरचा एकाकी दिवा
साथ करतो आहे धीराची.
एकाएकी,
सर्चलाईटचे झोतावर झोत
पळू तरी कुठे ?
झाडाझुडपांशी संबंध केव्हाच तोडून टाकला
मातीमुरमाची किटणं अंगावर.

आला, आला, निघाले मी भाजून त्यात
सगळीकडे प्रखर झळाळी.
तो दिवा मात्र तेथेच.
गार अंधार स्वतःत साठवून घेत.

मी फिरते आहे वणवण, आत्ता, अजून, नेहमी.
दिवा होता नव्हता, आहे नाही, असेल नसेल,
आता पर्वा नाही.
एक पाय गोरा आणि एक पाय काळा घेऊन
मी शोधते आहे माझे उरलेले रंग
पक्के, सतेज, टिकाऊ.

मी भटकते आहे दुरातन अश्वत्थाम्यासारखी
(सवय झाली आहे म्हणा मला त्याची.)
      मी झाड खरवडून पाहिलं,
      मी पाणी निपटून पाहिलं,
      मी सूर्य पिळून पाहिला,
अहो, मी झपाट्याने काळी पांढरी होते आहे हो
मला वाचवा.

—इला पारसनीस

स्वप्ननशा

स्वप्नेच ती
वेडी खुळी
डोळे उघडल्यावर
पळून जाणारी.
केशरीसर धुक्यातली
उमलती पहाट
टेकडीच्या टोकावरचे
मोहाचे झाड —
त्यावर गाणारा
गोंडस बुलबुल
हळूच येतो
स्वप्नांत; —
गिटारची तार छेडीत.
मावळतीच्या पश्चिमेला
चांदण्या उमलतात
धुंदफुंद रातराणी
रोमरोम फुलवते.
पण नशाच अशी की
स्वप्नेच ती
वेडी खुळी
डोळे उघडल्यावर
पळून जाणारी.

— मंदा पाटील

अनुक्रमणिका

जळत्या उन्हात

जळत्या उन्हात, जळत्या जमिनीवर
तापू द्या मला, पेटू द्या मला
थोडे चटके हवेत
थोडे फटके हवेत
थोडे कडु दु:खाचे घुटकेही हवेत
जमीन तापेल तर काही रुजेल, फुलेल
पेटत्या पाण्यातून आकाशात मेघ हसेल
फटके बसले तर मन चौखुर धावेल
कडु घोटातून थोडे शुचित्व लाभेल
ते विलासी भवन
ते मखमली आसन
ते बाजारी चुंबन
नकोत मला, नकोत मला
माझा मार्ग वेगळा
माझा छंद आगळा
एकटा दुकटा चालु द्या मला
नको दया, नको माया
नको सुगंधी शीतल छाया

वाढु द्या मजभोवती गर्द काळा अंधार
होऊ द्या मला दु:खानी बेजार
पायात काटा मोडू दे
अंधारात वाट चुकू दे
या चुकण्यातून, या वेदनातून, या अंधारातून
या काटधाकुटद्यातून
समजेल मला जीवनाचा अर्थ
दु:खाचा अर्थ
यातूनच काही सुविचार फुलेल
काही सत्कर्म घडेल
मातीच्या पणतीत ज्योत हसेल
जळता जळता उजळणे हा ज्योतीचा धर्म
या ज्योतीची शलाका होऊ द्या मला
याचसाठी अट्टाहास
जळत्या उन्हात, जळत्या जमिनीवर
तापू द्या मला, पेटू द्या मला

—राम गोसावी

आदीकवींची समाधी

खेडले बुरुज
छाटी रंगाच्या आभाळा तळवटी
तुझी समाधी
गोंडबावाजीने वाहिलेल्या
चारदोन फुलांसहित
जैत्रपालाच्या मुक्तिस्थानावरील शेंदरी झाक :
मुनी मुकुंदांनी उठविलेल्या वळांच्या
संलग्न स्मृती
वा ब्रह्मदर्शनानंतरचे तेजोवलयअवशेष
झाडांचे काहूर
भाविकपणे गर्दी करून
कुण्या रानपाखराचे
गवतजडित सांडते कमण्डलू, अदृश्यपणे :
पार्थिवातून अपार्थिव ओतण्याची जणू यादगार
या स्थलीची . .
कडेला चवुतरा किल्ल्यावर :
मलयगंधर्वांच्या अश्वरूपामागील कथा सैरभैर.
'हस्त लागेल देवा मुकुंदाचा ।
पावसी तीर्थक्षेत्रासी'
वगैरे ओव्यांचा आठव . . .
आणि तुझी रोप लावणी
नव्या क्षितिजावरची.
धन्यवाद !
तू उभविलेला प्रकाशाचा आदी सुळका
अनागतांच्या अंधारमार्गावरील.
म्हणून धन्यवाद ! . . .
बाकी ही मौनी झाडे हे असंग वातावरण.
भस्म लावलेली इथली रहस्ये.
म्हणतात की तुझ्या खडावांचे
क्वचित्‌ध्वनीही ऐकू येतात कधीमधी.
माझ्या मार्गस्थ पावलांना हाकारणाऱ्या
ह्या साऱ्या परमार्थखुणा
आणि तमांवर तरंगणारे
दीपटिंबांचे काफले
दूर . . . दूर . . .

—श्रीधर शनवारे

आगाऊ अभंग

सत्तेची अडणी
विनवूड शंख
डिंक जसा काही
चिकटला १
स्वराज्याच्या पूर्वी
इमानी चाकरी
देई गे भाकरी
महाराणी. २
माझी होती तेव्हा
चोख सावकारी
दारी अडलेले
भिकारडे. ३
आज उपटली
सेवेचीच गंगा
अंगोपांगा खादी
डकवली. ४
असा अवधूत
मी गा देशभक्त
सूक्त माझे एक
तिकिटाचे. ५
विदर्भ येवो गा
अगा द्विभाषिक
महाराष्ट्र देश
तोही माझा. ६
प्रश्नासाठी माझा
नसे गा हा देह
भाव माझा देव
तर्जनीचा. ७
कुणी जळो मरो
उरो हे तिकिट
माझी खटपट
इनटॅक्ट. ८

— वामन इंगळे

स्पर्श

शरीर स्पर्शातीत व्हावे –
      असे वाटायला लावणारे...
            ... असंख्य स्पर्श.
तप्त विशाल रात्रीच्या असह्य दीर्घ प्रहरातले
खोल आतल्या आत जळणाऱ्या मनाचे हुंदके
क्षणभर उमटून पुन्हा तसेच आतल्या आत विरलेले.
वैशाखाच्या होरपळणाऱ्या तीक्ष्ण धारदार उन्हाप्रमाणे
क्षणाक्षणाला अंगावर पसरत जाणारे उष्ण श्वास.
श्वास... या श्वासांच्या अदृश्य भयाण सावल्या सुद्धा
देह राख होईतो रेंगाळत राहतील आसपास.
स्पर्श. .वासनेत लिडबिडलेलें अस्वच्छ. अधिकारी.
खोल निर्घृण व्रणांसारखे चरत जाणारे अंगभर
कडू विषच जणु भिनत जाते आहे सर्व रक्तात
तरी अजूनही स्पर्शातीत. बधीर कसे होत नाही शरीर ?

४

–प्रभा गणोरकर

बाई गे

तुझ्या मुखावरून दहिभातासारखे ओवाळून टाकलेले तिचे आयुष्य
कधी काळी सुगंधित होते.
आता पडले आहे रस्त्याच्या कडेला शिते विखरून
कृतार्थतेच्या क्षणपुण्याईवर मरणाची वाट पहात.
      येणारे जाणारे प्राणी, किडे हुंगतात
      कोणी फरपटत नेतात स्वतःसाठी काही कण
      कोणी चिरडतात पायाखाली आपसुख
      किंवा तिरस्कृत नजरांनी–
                        जाऊ दे पण हे
संपणारच ही केविलवाणी कहाणी कधीतरी
वाऱ्याच्या प्रचंड झोतात; वादळाच्या तडाख्यात वाताहात.
होईल उरली सुरली अकस्मात
बाई गे – तू तरी सुखी आहेस ना ?

–कु. स्वाती समुद्र

प्रतीक्षा –

प्रतीक्षा करतो आहे मी भूकंपाची
कधी होणार तो ?

प्रतिक्षा ज्वालामुखीच्यां विस्फोटाची
कधी होणार तो ?

आम्ही अजून शांत ?
दुःशासन फेडतो सतीचे वस्त्र
तरी भीमार्जुन माना घालून शांत ?

पहा– पेटली उकिरडयाची माती
ढेकळांचे बनले सुरुंग
असे काय झाले आम्हाला की आम्ही पेटतच नाही ?
अजून शांत शांत
सगळे शांत . . . सगळीकडे शांत !
हंत ! हताश शांत

कुठे रुदन आहे . कुठेच रुद्र नाही
करुण क्रंदन आहे . रणकंदन नाही

कावळयाला लागली तहान कळसाची
बदलून बेशरम रंग धावतात सरडे खुंट पकडण्यासाठी
"ती ती पदे नित्य फिरूनि घेती
त्या त्याच स्वार्थाप्रति धावताती
कौशल्य सारे घटनेत राहे––"

आकाशही झुकतेच कुठे, कारण
गटारांचे गेले बडे वशिले गंगौघापर्यंत
दुर्गम पर्वत सुगम बनतो बोगद्याच्या खादाड खिशात
इथे कडक शासन छोटया पापाला
मोठ्या गपापाला स्थिर आसन
(तेथे अधिष्ठान पाहिजे धनवंताचे !)

हे महावृक्ष देतात सावली फक्त गणगोताला
नवनीरद करतात मुलांजावयांवर कृपेचा वर्षाव
अरे ! सूर्याच्या मनात आप–पर–भाव ?

अनुक्रमणिका

विषाक्त आहे क्षीरसिंधू
विशाल बंधुत्वाच्या संकुचित सांधीत
सापडतील साप जातीजातीचे . . .
जहरजंतू जमातीचे

अरेरे ! सबंध स्वर्ग गेला आहे सडून किडून
तो उखडून टाकलाच पाहिजे !

हे गलिच्छ हात धुतले जाणार नाहीत पुष्कळ पुळचट अश्रूंनी
ते धुतले जातील - - - रक्ताने, — रक्तानेच !
आमच्या बुभुक्षित भुका बुभुत्कारतील भूवरि भूकंप . .

आमच्या उदरांमधील व्हिसूव्हिअस ओकेल——
ज्वाळा आणि लाव्हा! . . . त्याचीच करतो आहे मी प्रतीक्षा !

--रा. अ. काळेले

शापबद्ध

पैल तटावर
कुणी सावली
लहरत जाते वेळीमधुनी
कधी खेळते झिम्मा फुगडी
खुणावते अन् पर्णफुलांनी
"ये, ये, नाचू गाऊ", पण मी
शापबद्ध जणु
खिळुनी बसतो, व्यथा उगळितो
उठण्या बघतो –
परंतु पडता
जाणिव होते दुर्बलतेची
अगतिक ऐशा व्यक्तित्वाची
घटात दडल्या असीमतेची –
लंघुनि जाण्या शब्दशैलजा
तीच सावली
स्पर्श न करता
पुन्हा उठविते

– रमेश लग्गूणकर

मी आंधळी

मी आंधळी,
सार्‍या विश्वाच्या सौंदर्याला मुकले
पण— पण चुकणारे पाऊल टाकण्यापूर्वीच थांबले
जणु पुन्हा विचार करण्यासाठी ।।

मी आंधळी,
सुखी विश्वाचे दर्शन नाही माझ्या फुटक्या बाहुलीला
पण जगाची दुःखे तरी तिला दिसत नाहीत
हेही काही थोडे नाही ।।

मी आंधळी,
मला जाणवते माझी असहाय्यता पावलोपावली
पण तिनेच माझ्या आसूंना वाट करून दिली
पावनतेची चिन्मयतेची ।।

मी आंधळी,
हे वेडे शल्य बोचते माझ्या हळुवारतेला
पण पावलोपावली अडखळणार्‍या
धडपडणार्‍या जीवांची असहाय्यता
दिसते माझ्या दिव्य चक्षूंना

तेव्हा वाटते,
मी आंधळी नव्हे
या काठीचा आधार मला डोळस करतो
पण जगात
वात्सल्य, प्रेम, दया, क्षमा, शांती
पैसा, शौर्य, क्रौर्य, असूया
किती प्रकारच्या काठ्यांच्या आधाराने
लोक चाचपडताहेत
फरफटताहेत
भविष्याच्या अंधारात
अंधाराचाच शोध घेत
आंधळेपणाने
असहाय्य होऊन

—सौ. उषा लिमये

अनुक्रमणिका

नियती

नशिबाच्या नावावर नकारांचे नवरात्र मांडून
मी बसते एकटी अशी असहाय्य होऊन
मनाच्या मेण्यात दुःख वाहता वाहता
तेच नदी होऊन वाहू लागते
आषाढाच्या आगोटाने
भयभीत होऊन
उघडया आभाळाखाली
वाटतं
मी एकटी आहे
पण तिथेही ते असते
आभाळाएवढे होऊन
केकात विरुन जातो मनमृदंगाचा आवाज
बावरून जाते वावटळीतल्या पानासाठी मी
आणि अंधाऱ्या एकान्तात
हासत असते
निर्घृण नियती

—सौ. उषा लिमये

तळहातावरल्या रेषांनी गोंदलेली सायंकाळ

तळहातावरल्या रेषांनी गोंदलेली सायंकाळ
दूरवर पसरलेलें अस्ताव्यस्त आभाळ

पाण्याखाली बुडून गेलेला पलिकडचा काठ
पायाजवळ निखळून पडलेली लाट..

पापणीत प्रतिबिंबित झालेला समोरचा क्षण
भोवताली मिणमिणारे हे एकटेपण !

--गोविंद कुळकर्णी

कविता

पाहता पाहता
गडद रस्ते, घरे लंघून
पहावी दूरची झाडी
दाट भुऱ्या जावळांची,
पुढचे डोंगरांचे बाळठिपके
ढगांचे अंगठे चोखणारे
तुडुंब निरागस वात्सल्यात तरंगणारे !
पाहता पाहता
अलगद् जमिनीला विलगून
क्षितिज कित्ती जवळ येते
वाटते हाताशी हे या इथे :

डोओवर लोंबणारे
फार फार अुंच हताश आकाश
हलता हलत नाही,
थोराड पायांची निगरगट्ट नागरमिठी
सुटता सुटत नाही !

चंद्रदशा !

घामाघूम दिवस कसा
वणवण अन्नान्नबंब !
प्राक्तनात क्षणोक्षणी
रक्तव्रणी अर्धचंद्र !
अंगांगा शीणदाह
तगमगतो रात्रकाळ
छिद्रगृही छिद्रांतून
अुरस्फुटतो चंद्रजाळ !
घेई पेट चारुदत्त
चिंध्यातही शेजधुंद
समागमी समभागी
मुग्धकळा . . . पूर्णचंद्र . . .
सहज फुटे देठातून
अेक नवे प्राणबिंब ! . . .
जळजळत्या प्राक्तनात
रक्तखुळी चंद्रदशा ! !

—लक्ष्मीकान्त प्रामाणिक

अनंत आकार निराकारातून भिडतात येऊन !

जेव्हा अनंत आकार निराकारातून
भिडतात येऊन,

प्राकाराच्या पारदर्शक
डोळ्यांना साक्ष ठेवून,
भिजून ओले चिंब झालेले चांदणेहि,
फिके पडते मनांतल्या ओल्या चिंब चांदण्यापुढे !

घुटमळणारा पारवा, पीत गारवा–
निरवतेच्या चंदेरी स्वप्नात–
सारखा तळपतो रात्रंदिन, जेव्हा अनंत
आकार निराकारातून भिडतात येऊन !

मदमत्त पायांतील–
मेंदीच्या गंधाने पुलकित झालेली वाळू
जिथे भाळी लावण्याची तपश्चर्या–
निष्फळ ठरते विश्वामित्राची,
तडे जातात बादशहा बेगमच्या
प्रति वारस–ताज महालाला !

जेव्हा अवकाशाच्या पोकळीचा–
वेध घेत दोन ध्रुव–
सांधले जातात एका अनामिक रेषेने
आणि अस्पर्शीय चुंबनाच्या–

गुलाबी खुणा उमटतात गोड गुलाबी
रसील्या गालावर !
जेव्हा अनंत आकार
निराकारातून भिडतात येऊन !

–गो. ना. मुनघाटे

युगवाणी : दीपावली विशेषांक १९६८

कविता

दु:ख दिले तू
परंतु न दिले डोळे बघण्या,
आकाशातील तुझे कृपामय
निळेनिळेपण

गारव्यातही ठिणगी जाळीत अंगांगाला
उदासीनता साद घालते आर्त नभाला
अवकाशातून...
गळती तारे
कधी अचानक
अधांतरावर..

दु:ख दिले तू,
परंतु न दिले डोळे बघण्या
आकाशातील तुझे कृपामय
निळेनिळेपण.

का असला अंगार फुलविसी तू प्राणातून?
का दिलेस तू दु:ख दिवाणे सर्वांगातून ?
कोळजलेल्या राखेतून का तेज उधळले !
स्मशानातहि पुनः कसे हे गीत बहरलें !

पाहावयाचे.
राहावयाचे......
वाहावयाचे......
साहावयाचे......
डोळे मिटुनि गिळावयाचे. . .पचवायाचे..
असंख्य आणिक प्रचंड पर्वत
तनामनातून. . . .

दु:ख दिले तू
परंतु न दिले डोळे बघण्या,
आकाशातील तुझे कृपामय
निळेनिळेपण.

उदास तन मन, उदास कमळण,
उदास वारे
उदासीनता येई घेउनि थंड शहारे
शहाऱ्यातली मूक बधिरता भिने अचानक
नसानसातून

दु:ख दिले तू,
परंतु न दिले डोळे बघण्या
आकाशातील तुझे कृपामय
निळेनिळेपण...

-कृष्णा चौधरी

अनुक्रमणिका

जे होते....जसे होते

जे होते. जसे होते. मागचे होते.
जिथे होते. तिथे होते. तसेच होते.
कसे होते ? कुठे होते ? मनात वेडे प्रश्न होते.
कधीतरी. . .कुठेतरी
हरवलेल्या आठवणीचे मळभ होते.
चंद्र होता. आकाश होतें. वादळवेडे क्षितिज होते.
जे होते. जसे होते. तेथल्या तिथे तसेच होते.
आपले होते. वेगळे होते. आभाळभर रडू होते.
जसे होते. तसे होते. आयुष्यभर पराभवाचे फासे होते.
कुणी होते. कुणी नव्हते. कठीण असे दिवस होते.
जे होते. जसे होते. मागचे होते.
कसे होते. .?
कुणी सांगावे...आयुष्यभराचे हसे होते !

आपणच आपल्यातून

आपणच आपल्यातून वेगळं व्हायचं.
पांगलेल्या नजरेत क्षितिज धुंडाळायचं.
मनातल्या सैरभर पसरलेल्या रानात
आग लावायची.
आपणच आपलं जळून जायचं.
वादळवेड्या स्वप्नांना आपण जपायचं.
आपणचं आपलं सारं नाकारायचं.
दिशांना बांधून काळीज करपवायचं.
हरवायचं.
सारे पाश तोडून आपण
नाकारायचं, आपण आपलं अस्तित्व.
आपणच आपलं प्रेत बांधायचं.
आपण थांबायचं आपल्यापुरतं.
आपणच आपलं निघून जायचं.

– प्रकाश कामतीकर

विश्वास ठेव माझ्यावर

त्या तथाकथित ईश्वराची शपथ नकोय् मला
त्याला आता पोचवून आले मी एकटीच
या अशक्त खांद्यावर घालून
बाबागाडीतून मुलाला बागेत न्यावं तसं मजेत जाऊन !
तुझ्या रक्तानें जरी कबुली जबाब लिहून दिलास
तरी खात्रीने सांगते
माघ्यान्हीच्या सूर्यालाही शक्य नाही ती अक्षरं वाळवणं
त्याच्या किरणांच्या शुष्क वेली वनून
लक्तरांसारख्या लोंबल्या नाहीत आकाशभर
तर प्रेताशी संग करीन मी बिनदिक्कत सारं सोडून !
          नोटांचा मांडव घातला
की खुर्चीचं टेबलाशी लग्न लावतात ते प्रतिष्ठित, शहाणे
          हे बिनचेहऱ्याचं सत्य माझ्या मुठीत आहे
          आणि शपथ न घेता सांगते
          आजूबाजूला हसू दडवून बोलणारे हे
          स्नो लावल्यामुळे तोंडावरून तरतरीत वाटले
          तरी खरं सांगायचं तर
          एकजात ढोंगी आहेत
पाऊलवाटेवर तरी काय कमी दिसतात
सार्त्र-कामू वाचून श्रद्धाहीन म्हणून मिरवणारे ?
          त्याच गटातले हेही
          डोळे बांधून आघाडीवर लढणारे
          विश्वास ठेव माझ्यावर
प्राणांचे वेत काढून विणलेल्या चटया विकल्याएत मी दारोदार
          म्हणून माझ्या बोलण्याला अर्थ आहे !
शहाळचासारखं कचाकच छिलून घेतलंय् मी स्वत:ला
     म्हणून माझ्या बोलण्याला अर्थ आहे ! !

—रजनी परुळेकर

अशी एक रात्र येते

अशी एक रात्र येते
ती काजव्यांच्या थव्यांत
स्वप्न पुनवेचे न्हाते
विरघळत्या दवात

अशी एक रात्र येते
रेखित सोनकळधा छटा
तिच्या रंगात भिजती
नव्या चांदण्याच्या वाटा.

अशी एक रात्र येते
तिला किरमानी साज
गंध पिते केतकीचा
नवी पांघरते लाज.

वाट

वाट तुझ्यासाठीच रचली होतो
तुझी पादपुष्पे पडावीत म्हणून.
वाळदलेला वारा
पिऊन टाकला होता
तुझे निःश्वास नीट व्हावेत म्हणून.
आणि तुझा प्रकाश सांडावा म्हणून
कुरकुरणारं आकाश
घट्ट मिठीत आवळलं होतं
अग्नीदेही वीज
डोळचात बंदिस्त करून.
वाट एवढयासाठीच रचली होती
तुझी पदपुष्पे पडावीत म्हणून.
पण आज
आवळलेलं आकाश
वीज प्यालं. वादळलं.
अन् वाटेवरच अश्रू झालं !

– वजरंग सरोदे

डहाळी

झुकलेल्या डहाळीला झुलणारी चिंच
देठापाशी रुतलेली पोपटाची चोच
पानापानातून गळे चांदणा पाऊस
उजेडाने व्यापलेली अवसेची कूस
अधांतरी काजव्याचें जळू लागे मन
उबेसाठी पंखामधे झोपलेले क्षण
हलकेच शहारतो रेशमाचा काटा
वेदनेच्या उगमाशी अनावर लाटा
डोळियांना लागलेला आकाशाचा रंग
हवातसा सावलीशी खेळणारा संग
जपावया उराकाठी हिरवी नव्हाळी
उभी ऐन यौवनात न्हालेली डहाळी !

—ललित सोनोने

दीप

घराघरातील मनामनातुनी
दीप जळावे.
असें जळावे, असे जळावे
की जळताना
येथून तेथून वावरणाऱ्या
दिशादिशातून धडपडणाऱ्या
आज उद्याची खंत लागल्या
सर्व जिवांना
हसण्याचे नि हसविण्याचे
भाग्य मिळावे.
या दीपांच्या ज्योतीमधुनी
अंधाराचे
अवसेलाहि लाजविणाऱ्या रक्तपिपासु
नैराश्याचे
होम कराया
सामर्थ्य मिळावे, सामर्थ्य मिळावे.

–अंबादास देवळे

युगवाणी कथा-कविता स्पर्धेचा निकाल

'युगवाणी'च्या दिवाळी अंकासाठी कथा-कवितांची स्पर्धा जाहीर करण्यात आली होती, तिला महाराष्ट्राच्या सर्वच भागातून उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. दि. २५ सप्टेंबर ही स्पर्धेसाठी साहित्य पाठविण्याची अखेरची मुदत होती, तरी त्याच काळात टपालखात्याचा संप व नंतर 'नियमाप्रमाणे कामाची चळवळ झाल्यामुळे दि. २७ पर्यंत हाती आलेल्या सर्व साहित्याचा स्पर्धेसाठी विचार करण्यात आला. त्यानंतरही ८-१० दिवसपर्यंत कथा-कविता येत राहिल्या, पण त्या विचारात घेणे शक्य नव्हते. एकूण ९१ कथा व ४०० हून थोड्या अधिक कविता इतके साहित्य परीक्षकांनी वाचले व त्यातून प्रथम १५-२० कथा व २५-३० कवितांची निवड केली. ही निवड करणे एका अर्थाने सोपे व दुसऱ्या दृष्टीने काहीसे कठीण काम होते. सोपे यासाठी की स्पर्धेसाठी आलेल्या साहित्यापैकी अर्ध्याहून थोड्या अधिक कथा व कविता सहज वगळल्या गेल्या. विषय, मांडणी, भाषा, शैली, कल्पनाशक्ती, प्रतिभेची चमक, सर्वच बाबतीत हे साहित्य अगदी सुमार होते. पण पहिल्या फेरीत बाजूला काढलेल्या २५-३० कथा व कविता मात्र निश्चितपणे विचारार्ह होत्या. अत्युत्कृष्ट, असामान्य म्हणण्याजोगे साहित्य त्यात आढळले नाही. तरी चांगल्यापैकी कथाकार व कवी यांच्या गुणांची साक्ष त्यात निश्चितपणे आढळली. मात्र काहींच्या कथावस्तू उत्तम तर भाषा फारच सामान्य, भाषा चांगली तर मांडणी ढिसूळ, शैली बऱ्यापैकी तर पाल्हाळ फार, असा अनेक कथांचा प्रकार होता. कवितांमध्येही अस्सल थोडे, नक्कल फार, असे पुष्कळ होते. तरीसुद्धा परीक्षकांनी बराच विचार करून पाच कथांची व पाच कवितांची पारितोषिकांसाठी निवड केली. परंतु या पाचात मात्र क्रमवारी लावू नये व या सर्वच कथा व कवितांना पारितोषिकांच्या रकमा समप्रमाणात विभागून द्याव्या असे ठरविण्यात आले.

या निर्णयाप्रमाणे कथांसाठी ठेवलेली ३०० रुपयांची पारितोषिकाची रकम पाच कथांना प्रत्येकी ६० रुपयेप्रमाणें व कवितांसाठी ठेवलेली दोनशे रुपयांची रकम पाच कवितांना प्रत्येकी ४० रुपयेप्रमाणे विभागून देण्यात येत आहे.

या पारितोषिकप्राप्त पाच कथा व पाच कविता पुढीलप्रमाणे.

पाच कथा पारितोषिक प्रत्येकी रुपये साठ

१. इमॅनिजेशन
लेखक श्रीकांत दत्तात्रय मुजुमदार, अमरावती.

२. सुख
लेखक वसंत गिरटकर, यवतमाळ.

३. वेड्या राजपुत्राची गोष्ट
लेखक प्रल्हाद पांढारकर, चंद्रपूर.

४. शोषिता
लेखक म. के. देशपांडे, मुंबई.

५. वनवासवाडी -
लेखक मधू पवार, अनेवाडी (जि. सातारा).

पाच कविता पारितोषिक प्रत्येकी रुपये चाळीस

१. दंगा
कवी शरद शंगरपवार, नागपूर.

२. अतूट नाटे
कवयित्री : मंदा पाटील, पुणे.

३. कालपासून पाऊस . . .
कवयित्री प्रभा गणोरकर, अमरावती.

४. सांज
कवियित्री सौ. अनुराधा देव, नागपूर,

५. शिल्प
कवी : ललित सोनोने, गुंजी (जि. अमरावती.)

या सर्व पारितोषिक विजेत्या कथाकारांचे व कवींचे मन:पूर्वक अभिनंदन !

उल्लेखनीय कथा

या पारितोषिकप्राप्त कथा–कवितांखेरीज पुढील दहा कथा उल्लेखनीय म्हणून त्यांचा निर्देश करण्यात यावा अशीही परीक्षकांनी सूचना केली. त्या उल्लेखनीय कथा पुढीलप्रमाणे:

१. कथेचे नाव दिलेले नाही. (ले. प्र. मो. जोशी, मुंबई).
२. एका शेळीचा जन्म (ले. सौ. प्रभा पार्डीकर, अमरावती)
३. धडा (ले. सौ. शकुंतला खोत, नागपूर)
४. गुलशन (ले. सौ. मालती नरसिंह दामले, नागपूर)
५. प्रतीक्षा (ले. सुधाकर शंकर वाघ, पुणे)
६. इस्त्रीचे कपडे घालणारा माणूस (ले. डॉ. सुभाष वानखेडे नागपूर)
७. सेक्रेटरी (ले. विजय देशमुख, नागपूर)
८. पथ (ले. वसंत गिरडकर, यवतमाळ)
९. रखेली (ले. रमेश ललगुणकर, गोंदिया)
१०. दिवा फडफडतो आहे (ले. कमलाकर दिघे, नासिक).

कवितांच्या बाबतीत ज्या उल्लेखनीय वाटल्या त्या या अंकात प्रकाशित करण्यात येत असल्यामुळे त्यांचा या ठिकाणी निराळा निर्देश करण्याची आवश्यकता नाही. मात्र काव्यविभाग प्रकाशित करण्यात येत असलेल्या सर्वच कविता स्पर्धेसाठी आलेल्या नव्हत्या, दिवाळी अंकासाठी म्हणून आलेल्या बऱ्याच कवितांचाही त्यात समावेश आहे.

स्पर्धेतील कथांची निवड करण्याचे कामी प्रा. के. ज. पुरोहित ('शांताराम'), प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व श्री. मा. नी. गलगलीकर यांनी व कवितांची निवड करण्यासाठी डॉ. द. भि. कुळकर्णी व प्रा. माणिक गोडघाटे ('ग्रेस') यांनी 'युगवाणी' ला सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

या स्पर्धेत जवळ जवळ तीनशेहून अधिक लेखकांनी व कवींनी भाग घेतला, त्या सर्वांचे 'युगवाणी' तर्फे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो. 'युगवाणी' ला सर्व लेखकांचे यापुढेही असेच सहकार्य लाभेल असा विश्वास आहे.

—संपादक

इमॅजिनेशन

श्रीकांत दत्तात्रय मुजुमदार

अेक बेसावध क्षण......अेकाअेकी त्या तरल गंधाचा समुद्र त्याला गिळायला धावला. अंगावर येणाऱ्या प्रत्येक लाटेबरोबर त्या समुद्रात दडलेल्या विश्वाचे भास त्याला होअू लागले. तेव्हा त्यानं त्या लाटांवर स्वतःला झोकून दिलं. बेगुमानपणानं प्रकाशाची किरणं खालून वर आली अन् तळाशी असलेल्या नगरीचा घुमट चमचमला. शतयोजने दूर असलेल्या त्या रुपेरी चंदेरी नगरीतून मंद संगीताचा प्रवाह सातत्यानं येत होता. खोल दरीतून वर येणाऱ्या विरल धुराच्या वेडयावाकडया रेषेसारखा......टिम् झिल् टिम्झिल् ......त्याच्या सर्व संवेदना बधिर होत होत्या की त्यांना हळूहळू जाग येत होती हे त्याचं त्यालाच कळत नव्हतं. पण अेका अतिमानवी आणि अपौरुषेय सृष्टीचं ओठंगून असलेलं अस्तित्व त्याला सुखावत होतं. मंदतरल सुगंधाची लाटेवर लाट फुटत होती. अेका अुंच लाटेनं त्याला कवटाळलं अन् बुडणाऱ्या माणसा-सारखा तो समुद्राच्या तळाशी जाअू लागला. पण त्याची शुद्ध हरपली नाही. जणू सूर्याचा प्रकाश क्षितिजावर रेंगाळत होता अन् रजनीचा मोरपंखी स्पर्शही अंगावर शहारे आणत होता. किंवा अुत्तर-रात्रीच्या काळोखाला मदोष्ण किरणांची फुंकर घातली जात होती......

नुकताच वर्ग सुरू झाला होता. त्याच्या समोरच्या बाकावर ती बसली होती. तिच्या केसात दोन लाल गुलाबाची फुलं होती. त्या मंद सुवासानं त्याचं डोकं बधिर झालं. त्याला वाटलं, त्या गुलाबाच्या सुवासात तिनं नेसलेल्या कोऱ्या साडीचा वास आणि त्यात लपेटलेल्या तिच्या कोऱ्या देहाचा गंध मिसळून गेला आहे. वर्गात पानांची फडफड मधूनच होत होती. अेक आवाज सारखा घुमत होता आणि त्या संमिश्र सुगंधाच्या समुद्रात तो हळूहळू तळाकडे खेचला जात होता.

तो दहा बारा वर्षाचा होता. सणाचा दिवस. त्याच्या मैत्रिणीनं साजशृंगार केला होता......'आज छान दिसतेस. परीसारखी······ 'तू नवीन कपडयांचा वास घेतलायस कधी ? किती छान येतो. नाही ?'...... तिच्या छातीजवळ आपलं तोंड नेअून त्यानं तिच्या नवीन कपडयांचा मनसोक्त वास घेतला. अेक अनोखी लहर त्याच्या आयुष्याच्या पहिल्यावहिल्या मुग्ध क्षणांना विचलित करून गेली होती. त्याला वाटलं, त्या लहरी पुन्हा आपल्या शरिराभोवती फेर धरताहेत, आपल्या अंगावर आदळताहेत. अन् पुन्हा मागे जात आहेत. प्रवाहातल्या दगडांप्रमाणे त्याचे विचार गुळगु-ळीत व्हायला लागले. त्याला दोनच गोष्टींचं अस्तित्व जाणवत होतं -- तो तरल सुगंध आणि ती अनोखी लहर...... सुगंध आणि लहर ......

किनाऱ्याकडे येणाऱ्या लहरी चुळुक् बुळुक् आवाज करून परत जात होत्या. तो नदीच्या किनाऱ्यावर अुभा होता. प्रवाहाच्या मधोमध रुपेरीचंदेरी घुमटांची अेक वास्तू अुभी होती. रात्र होती. चंद्र होता. तारे होते. अन् रात्रीच्या त्या अपुऱ्या तेजात त्या वास्तूचं नदीतील प्रतिबिंब हेलकावत होतं. आकाशातला चंद्र वितळला अन् रजताची झळकणारी तार सरंकन खाली धावली. ......त्या वास्तूसमोरच्या बागेत आता अेक युवती अुभी होती. -- नग्न रुपेरी, नेत्रात प्रतिक्षेचं काजळ घालून, तिचं प्रतिबिंब पाण्यावर चकाकात होतं. तो वास्तूकडे जायला निघाला......त्यानं तिचे हात हातात घेतले. बागेत तिनं त्याला कांही फळं

खायला दिली. त्याचं भान हरपू लागलं. कशामुळे ते त्याला कळलं नाही. पण धुंद होअुन त्यानं तिच्या ओठांवर आपले ओठ ठेवले अन् आपल्या बाहूंचा विळखा तिच्याभोवती आवळला. तेव्हा तिच्या नग्न देहाच्या सुगंधानं त्याच्या सर्व जाणीवांना बोथट केलं. अन् त्याच्या अंगोपंगात रंध्रारंध्रात तो सुगंधच भरून राहिला. ......

सुगंधाची अेक फिकट जांभळी लड फुटली अन् तिनं मागे फेकलेल्या वेणीतील जांभळी रिबन त्याच्यासमोर दिमाखानं मिरवत आली. तिच्या नितळ गुलाबी मानेवर अेक लहानसा तीळ होता. त्याचा नाजुक स्पर्श ओठांना होत होता. त्याला वाटलं आपण त्याची लक्षलक्ष चुंबनं घेत आहोत, तिच्या देहातून फुटणाऱ्या सुगंधाच्या लाटांवर आपण तरंगत आहोत ...... वर्गात अेका विशिष्ट आवाजात कांही शब्द घुमत होते. अन् प्रत्येक गंधलाट थरथरत होती. ......

Still eyes look coldly upon me.
Cold voices whisper and say –
He is crazed with the spell of
far Arabia,
They have stolen his wits away.

या शब्दांचं जड रूप गळून पडलं अन् त्यातला मुक्त अर्थ त्याच्याभोवती झिम्मा घालू लागला. त्या अर्थाला विलक्षण वेग आला. त्या पागल करणाऱ्या गतीबरोबर तो गुरफटत गेला. जाणीव होती फक्त अेकाच गोष्टीची भयानक वेग......विलक्षण गती...... त्याला हळूहळू जाणवायला लागलं तेव्हा त्याला गाढ झोपेतून ती अुठवत होती. अपुरा प्रकाश त्या गुहेत पसरला होता. तिच्या शरिरातून चांदण फुटत होतं. आणि कुंतलावर घन गर्द रात विसावली होती डोळ्यात थकलेली रात्र. अेकमेकांच्या नग्न शरिराकडे त्यांनी अेखाद्या वस्तूवर सहज नजर पडावी तसं पाहिलं अन् तेग हेबाहेरच्या अुद्यानात आले......तो आदम होता अन ती ईव्ह ! अुद्यानातली गंमत पहाता पहाता ती थांबली. झाडावरचं अेक फळ तोडून त्याला खायला दिलं अन् अुरलेलं अुष्ट फळ तिनं खाल्लं......त्याचे डोळे जड झाले. डोक्यांत सुखद वेदनेचे मंद ठोके पडू लागले. अन् तिच्या नग्नतेत लपलेल्या सौंदर्याला जाग आली. आयुष्यात पहिल्यांदा तिच्या काळ्याभोर डोळ्यातली रात लाजली. कळीत निजलेल्या सुगंधाच्या लडी फुटूं लागल्या. तिच्या शरिरावर त्यानं आपलं शरीर झोकून दिलं अन् त्या कोऱ्या सुगंधात तो होरपळून निघाला......

चार भिंतींच्या त्या खोलीत वर्ग सुरु होता. त्यानं इकडे तिकडे अुगीच पाहिलं. सर्वांच्या माना खाली होत्या ...सारंच स्वप्नवत् ! त्यानं समोर पाहिलं. केसात गुंफलेल्या लाल गुलाबाच्या फुलांशी तिच्या बोटांनी अुगीचच चाळवाचाळव केली. त्या पाकळ्यावर मोरपिसांच्या मुलायमतेनं त्याची बोटं अल्लद फिरु लागली.......मध्येच गुलाबाचा काटा त्याच्या करंगळीत रुतला, झटकन् हात मागे घेअून बघितलं तर करंगळीवर रक्ताचा टपोरा लाल थेंब स्वतःचा तोल संभाळत होता......

त्याच्या हातात मद्याचा जाम होता. त्याच्या तळाशी लालभडक द्रव हेलकावे घेत होता. नाइल नदीच्या वाळवंटातला रंगीबेरंगी कापडाचा तंबू. त्या अरब जमीनीचा तो शेख होता. सुवर्णतारेची कलाबतू असलेल्या लोडाला टेकून बसला होता. जवळच्या पिरॅमिडची वाळवंटावर सुस्त पडलेली सावली त्याला तंबूच्या अुघड्या दारातून दिसली. वाटेत येणाऱ्या लहान लहान रांना बाजूला सारून नाइल वहात होती. कांही व्यापाऱ्यांचा काफिला जवळूनच जात असावा. मधूनच 'हात् ! हात् !' अैकू येत होतं. नाइलच्या धुंद हसण्याचे स्वर हवेवर तरंगत आले अन् तंबूतल्या वाद्यांच्या तारा ते मुशाफिर छेडू लागले. त्या झंकाराबरोबर अेक इजिप्शियन युवती हातात मद्याची सुरई घेअून आली. त्याला वाटलं, नाइलची राणी आपल्याला अभिवादन करते आहे, नाइलची राणी ! नाइलची सम्राज्ञी ! त्याच्या पेल्यात मद्य ओतताना नाइलची राणी हसली तिचे नाजुक ओठ किंचित विलग झाले अन् दातातून कोवळी किरणं फुलली. जणू धातूच्या सुरईवरली कलावस्तू चमचमली; सुरईवरून मंद प्रकाशाच्या चांदण्या धावल्या. हालचालीमुळे तिच्या खमीसाला वक्षाखाली लावलेल्या चांदीच्या टिकल्या टिमटिमल्या. ... टिम् झिल... टिम् झिल, टिल्, झिम, ... तिच्या देहाभोवती तरळणाऱ्या सुगंधाच्या वलयानं नळीची फुंकर घातली अन् त्याच्या मनाची नील रेघ थरथरली.. राणीच्या पैंजणांनी ताल धरला. अेका अनोळखी लयीत

राणीचा देह झोके घेअू लागला. हळूहळू पावलांनी आपली गती वाढवली. कमरेखालच्या वस्त्रांना गती-मिळाली. तिच्या तळपणाऱ्या गौरकाय मांड्या उघड्या पडत होत्या. सर्रकन् वस्त्राआड जात होत्या. त्या अेक-दोन क्षणातच तिच्या मांडीवरला तीळ टिपल्यामुळे शेखची नजर शहारली. धूपदानातून निघणारी प्रत्येक सुगंधी लड नाजूक आविष्कारात वर सरसरत होती. धातूच्या मढविलेल्या दीपदानावर लालपिवळी ज्योत थरथरली. तो पहात होता धुंद झालेली नाईलची राणी त्याला लवलवती नागीण वाटली. . . . टिम् टिम् टिम् टि डिडिम् टिम्... बेहोष होअून नालइची राणी त्या स्वरांवरून तरंगत आली. तिचे विजेचे हात त्याच्या गच्याळत गुंफले गेले. त्याच्या ओठातल्या आगीवर तिच्या ओठांनी झडप घातली. तिच्या श्वासातला सुगंध त्याच्या मस्तकात भिनला. त्याच्या आतुर मनाला वाटलं, तिला तिथून दूरदूर पळवून न्यावं...... समोर वाळवंटातले पिरॅमिड स्तब्ध अुभे होते. जवळूनच नाइलचं रुप्याचं पाणी वहात होतं. तो तिला पळवून नेत होता. नाइलच्या काठाशी त्यानं तिला अुंटावरून अुतरवलं. तिच्या खमीसाला लटकलेले रुप्याचे तुकडे टिमटिमले. आवेगात आपल्या मिठीत त्यानं तिला घुमटून टाकलं. तेव्हा सर्व सामर्थ्यपणाला लावून तिनं आपली सुटका करून घेतली अन् नाइलच्या पाण्याकडे ती धावत सुटली. तो पागलासारखा तिच्यामागे धावत सुटला. तिच्या पावलांना नालइच्या नीलघन पाण्याचा स्पर्श झाल्यावरोवर तिचा चमचमणारा देह पाण्यात वितळून गेला. अन् तिची वस्त्रं हवेच्या झोतावर तरंगत येअून त्याच्या अंगाभोवती लपेटली गेली. त्या वस्त्रांना लागलेला तिच्या देहाचा गंध त्याच्या शरिराला बसला. तो तीव्रतरल गंध त्याचा गळा आवळत होता....

तास संपला होता. प्राध्यापकांच्या मागोमाग मुलंमुलीही जायला अुठले. त्याच्या समोरच्या बाकावर ती बसली होती. अुठतांना तिच्या नितंबांची जीवघेणी हालचाल झाली. अुजळत्या काळोखाला अेक जाड प्रकाशशलाका आरपार छेदून गेली. . सुरईवरली कला-बतू चमकली ... बुरखा काढून अर्थात झेप घेतली ... नग्न रुपेरी देहाच्या प्रतिबिंबाचा चमचमाट नजर आंधळी करीत होता. ... वेग, गती ... विलक्षण गती... रुतलेला काटा ... तंबूतल्या दीपदानावरची लाल-पिवळीं ज्योत तडफडली. टिडिम् टिडिम् टिडिडिम् टिडिडिम् टिडिम् टिडिम्

ती वर्गाबाहेर जात होती अन् जन्म घ्यायला अधीर झालेल्या सुगंधाच्या समुद्रात तो थरथरत होता.

* * *

सुख

वसंत गिरटकर

ही काय वागण्याची रीत झाली ! विपरीतच. पायाची पायपीट करीत मी येतो. काम असलं तरो, नसलं तरी ! पण कामाचा वहाणा करून. म्हणतात ना— मिस वालाचं न कवतिक बोलाचं ! बोलायच्या कवतिकासाठी हे असतं, हे तुला माहीत नाही, असं म्हणता येईल का ? मी तुझ्यासाठी जीव टाकावा, ज़िवाला जीव लावावा.... आजवर तू वागलीस—— माझी तक्रार नव्हती. कशी असणार ? कुणी असलं— मी तुला माझ्याशी का हसली नाही, असं म्हणील ? मला तितकंही का कळणार नाही ?....पण आज तू रिकामीच होतीस ना ? मग मी तुला पाणी मागितलं —तहान नव्हतीच म्हणा. नि तू म्हणालीस— "नानीबाई, पाणी द्या त्यांना."

मी काय नानीबाईंच्या हातचं पाणी प्यायला आलो होतो ! गावातल्या विहिरी काही सुकल्या नव्हत्या ! गाव उजाड झालेलं नव्हतं ! पाणीच प्यायचं असतं तर कुठंही पिता आलं असतं. त्यासाठो तुझंच घर शोधायची काही गरज ?....पण तू तितकंही सुख आज दिलं नाहीस ! जराशी उठून एक पेलाभर पाणी द्यायचं होतंस. माझी अपेक्षा दुसरी नव्हतीच ! त्या तुझ्या हातच्या एका पेलाभर पाण्यानं माझा कलिजा गारीगार झाला असता. माझ्या पावलांना पंख फुटले असते, त्यात नवचैतन्य निर्माण झालं असतं. माझी पावलं झरझर पडली असती सिगारेटचे दोन झुरके जोरात मारले असते. तिरपी नजर करून आकाशाचा कंगोरा न्याहाळला असता. बुटाच्या ठोकरीनं वाटेवरचे गोटे दूर केले असते. बोटांची टिचकी वाजवली असती. ओठातली शीळ भिरभिरली असती. पण...

माणसानं एकतर लोभ लावू नये. नि लावलाच तर तो तोडू नये. कुणावा केसानं गळा कापू नये. विहिरीत ढकलून त्याची गंमत पाहू नये ..

लोभ तू लावलास, मी नव्हे ! तू मला लोभ लावशील, तुझी माझी कधी काळी भेट होईल, असं वाटलंही नाही. तुझ्यासाठी माझ्या मनाचा आषाढ झाकोळून येईल, माझ्या डोळ्यातला श्रावण कधी काळी वरसेल अशी कल्पनाही नव्हती. साखरझोपेत जरी हे स्वप्न मला पडलं असतं तरी मी त्यावर विश्वासलो नसतो. पळत्याच्या पाठीमागे लागलो नसतो. माझ्या स्वभावात तो गुण नाहीच...

दारात हिरवा मांडव होता. जांभ अजून वाळलो नव्हती. नारायणाची कथा झाली होती, नव्हती, हे माहीत नव्हतं. तेव्हा तू माझ्या दृष्टीला पडलीस. पायात तोउच्यांचा जोड होता. नाकात नथेचा मुखरा होता. गळचात एकदाणी होती. कानात मोत्यांच्या कुडचा होत्या. अंगाची हळद अजून फिटली नव्हती. तुझ्या तांबुस गौरवर्णांची झळाळ तीतूनहो दिसत होती. तुझं यौवन नुसतं उसासत होतं. ब्लाऊझचा बेत दिवसागणिक वदलावा लागणार होता....

इतकं देखणेपण यापूर्वी मी कुठं पाहिलं नव्हतं. पाहण्यात आलं असेल पण स्मरत नसावं ! काही दिवस ही कोजागिरीची पुनव मनात सामावलो. चांदण्या

रात्रीतलं हे स्वप्न जागेपणी दिसत राहिलं ! – तुझ्या घराहून जाताना येताना . . . परंतु तुझं नख दृष्टोला पडलं नाही. नि माझ्या मनातलं हे दिवा-स्वप्न मनातच विरून गेलं.

निवडणुकीचे दिवस आले. धावपळ चालू झाली जीपगाड्या पळू लागल्या. पायाला टकळी लागली. धोतरं गोट्यावर सुटेनाशी झाली. डोळे झोपेने पेंगू लागले. त्यांची लाली वाढली. वाढती झाली. वाढत राहिली . .

दुपार टळून गेली होती, गावातली माणसं कामोकामी गेली होती. गावात एक प्रकारची उदास शांतता नांदायला आली होती. खाऊन पिऊन सुखी असणारी क्वचित् माणसं नी त्यांच्या घरच्या बायाच काय त्या घरी ! आणि पोरंसोरं आमची जीप सरपंचांच्या घरापुढं थांबली.

"आपण बसा. मी बघतो आहे का कुणी ते."

यावर बाबासाहेबांनी होकारार्थी मान हलवली. नि ते लोडाशी लेटले. त्यांच्या डोळ्यांना रग आली होती. ते अर्धोन्मिलित झाले होते

"चहाच घेऊन जा ना" सरपंचांनी माझ्याकडे वळून विचारले.

"येतो हं मी लवकर. उशीरच झाल्यास आटपून घ्या. तशी काही आवश्यकता नाही." मी हसतच उत्तरलो.

गावात माणसं नव्हतीच. जगतापांच्या घरावरून गेलो. आठवण झाली म्हणून हाक मारली–

"जयवंतराव आहेत घरी ?" आवाज आला नाही म्हणून किंचित पुढे झालो. सहज म्हणून ओणवून पाहिले. आणि मी स्तिमित झालो– कोजागिरीची पुनव सन्मुख होती ! चांदण्या रात्रीतलं ते संगमर्मरी स्वप्नशिल्प साकार झालं होतं. हरपलेलं श्रेय सापडलं होतं. मी गोंधळलो पाहातच राहिलो नी भानावर येत म्हणालो–

"जयवंतराव नाहीत घरी ?"

"नाहीत. का ?"

"नाही. काही काम होतं"

" ? "

"पाणी देता प्यायला ?"

"हो हो. देते ना. या ना. बसा."

मी बंगईवर बसलो. पाणी प्यालो. ते पाणी गार नी गोड वाटलं.

"कुठे गेलेत, जयवंतराव ?"

"कुठे जाणार ? गेले असतील शेतात विहिरीचं खोदकाम चालू आहे."

"अस्स होय."

"चाललात ? पान घ्या."

"नाही. मी पान खात नसतो."

"सुपारी ?"

नकार देणं जिवावर आलं. मी पुन्हा बंगईला वूड टेकवलं. नि तुझ्याकडे पहातच राहिलो. तुझे उन्नत उरोज. उफाड्याचं वैभव. गालावरचा निळा–जांभळा तीळ

तू मला सुपारी दिलीस. निमचिकणी. अगदी हातात ठेवलीस. हाताला हात लावून . . . मी वर बघितलं. तू हसलीस. गालातच. आणि मी चेकाळून गेलो. तुझ्या त्या हसण्यानं माझ्या मनात प्राजक्तीचा सडा पडला. शत शत चंद्रांचं तेज तुझ्या मर्मर हास्यातून विलसलं.

माझ्या मनातून पुसून टाकलेलं ते दिव्य-स्वप्न दृष्टीपुढे तरळू लागलं. माझ्या मनाचा पतंग तुझ्या रूपाच्या ज्योतीवर झडप घेऊ लागला. मनाची मासोळी पाण्याशिवाय तडफडू लागली. तुझ्या हातची निमचिकणी सुपारी आठवू लागली. तोंडाला पाणी सोडू लागली. तुझ्या हातच्या पाण्याची लज्जत् पुनः पुन्हा चाखावी, तुझा एखादाच का होईना पण बोल ऐकावा, तुझ्या नेत्राचा कटाक्ष अंगावर घ्यावा. त्यानं पोळून निघावं; आणि नंतर तुझ्या हास्याच्या दूधधारेनं न्हाऊन निघाव असं सारखं वाटू लागलं –– आणि म्हणूनच कारण असो नसो, मी तुझ्या दारावरून मुद्दामच जाऊ लागलो सुपारी खाऊ लागलो. एक मोटार चुकवून पुढचीने जाऊ लागलो. . .

त्या दिवशी इकडे लख्ख ऊन पडलं होतं. तरी उगवतीच्या बाजूला काळचाकुट्ट दुभत्या ढगांच्या उतरंडी रचल्या जात होत्या. दिशा धुंदकारल्या होत्या.

वातावरण झाकोळून येत असल्याचं दिसत होतं. थेट ईशान्येच्या बाजूला विजा चमकारे मारीत होत्या. आणि ढगांचा खळखळाट येत होता. ते मोकळेपणी गर्जत नव्हते. मनात गुड्डा होता. हा गुड्डा कशाचा असतो हे जाणकार माणूस ओळखतो.

मोटार लेट झाली होती. स्टॅंडवर पाय ठेवताच मी विचार केला होता– "आज चांगलीच झाकट पडणार !" आणि म्हणूनच मी मुळीच वेळ न दवडता स्टॅंडवरून पाय उचलला. सातवघळी मागे टाकली. चोर आंब्यापाशी आलो. आभाळ चांगलंच वर चढत होतं. विजेचा चाबूक उडतच होता. खळखळाट होतच होता. माझ्या मनाचा धीर सुटला. पायाला पुन्हा वेग दिला. वाटलं– आज पाऊस तर येणारच, पण तो नीरा नाही. वाराघुंद, गारपीट घेऊनच ! अन् त्यात जर असं मध्यात सापडलं तर– ती कल्पनाच न केलेली बरी ! झाडाखाली उभं रहावं–– नको ! कारण विजेचा जोर झाडावरच विशेष ! बरं न राहावं तर... गारपीट. इथे मधात ना झोपडी, ना झापडी ! आपलं गाव तर नाहीच पण––

मन विचारात बुडालं नी पाय तेवढे चालत राहिले. चिकणी एका हाकेच्या अंतरावर होती. तेवढ्यात कानशिलावर पावसाचा एक टपोरा थेंब ताडकन आदळला. मी उगवतीला पाहिलं– पावसाची अपारदर्शक भिंत सरकत होती !

मग मी धावतच सुटलो. जिवाचं नाव काही तरी ठेवून .

बाहेर काजळासारखा काळाकुट्ट काळोख पडला होता. डोळ्यात बोट कुचकलं तरी दिसत नव्हतं. नुकत्याच पडून गेलेल्या पावसाचा व गारपिटाचा गारवा वातावरणात भरून गेला होता. तू घालून दिलेल्या अंथरुणा–पांघरुणाच्या उबेत मी पहुडलो होतो. सिगारेटचे पफ् घेत होतो. जेवण चापून झालं होतं. माझ्या आवडीच मसाल्याचं सार तू आग्रह करकरून पाडलं होतंस. आणि घरी कुणीच नव्हतं. जयवंतराव नि नानीबाई पाहुणपणा गेली होती. त्या दिवशी आपण दोघंच होतो.

वातावरणात असह्य गारठा होता. दुलईची ऊब कमी पडत होती. आणि त्या एकांतात ती आणखीच कमी भासत होती. हुडहुडी भरायला लागली होती. तू माझ्या अंगावर आणखी एक लेप टाकलास. पण–– पण मला हीव घरवत नव्हतं.

'इतकं हीव वाटून राहिलं ?" तू पुसलंस.

"हो ना."

"आता आणखी घालू का अंगावर ?" तुझ्या स्वरात मृदुता होती. "थंडी वाजून––"

"हा हिवताप वेगळाच असतो." अगतिकता.

"मग ?" तुझ्या स्वरात काळजीचा पदर लोळतो.

"या गातावर बस. म्हणजे––"

तू गातावर बसलीस. आढेवेढे न घेता. काहीही उजर न करता, संकोच न बाळगता. आज्ञाधारक मुलासारखी ! किंवा तुझामाझा फार फार दिवसांचा जसा काही घरबंध होता. तू बसलीस. माझ्या अंगावर रेललीस. आणि ज्या क्षणाची मनोमन वाट बघत होतो, ज्या उणिवेनं आपल्या जीवनात काही तरी न्यून राहिलं असतं, ती उणीव भरून काढणारा, न्यून ते पुरते करणारा तो दिव्य क्षण आपण पकडला !

आणि नंतर असा क्षण आलाच नाही. परंतु मला त्याची खंत वाटत नाही नी वाटलीही नाही ! हुरहूर नाही. तुझ्या हातच्या पेलाभर पाण्यात, त्या सुपारीच्या खांडात, तुझ्या डोळ्यात मला अमृताचा कुंभ गवसे. या क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीत मला त्या दिव्य क्षणाची अनुभूति येई. त्या सुखाच्या सागरात, तुझ्या नेत्रांच्या नावेत बसून— मी ती नाव वल्हवीत राही. कित्येक दिवसपर्यंत डुंबत राही. गात राही. आपल्याच मस्तीत . . . आपल्याच बेहोशीत

पण माझं हे सुख आज तू हिरावून घेतलंस. हिसकावून घेतलंस . . . तुला कल्पना असेल नसेल कुणास ठाऊक ! जाणून बुजून तू असं केलंस असं कसं बरं म्हणू मी तुला ?—

★★★

वेड्या राजपुत्राची गोष्ट

प्रल्हाद पांढारकर

संध्याकाळचे साडे-पाच वाजलेले असतात.

घरासमोरच्या रस्त्यावरची शाळकरी पोरांची किलबिल बंद झालेली असते. निळ्या चड्डीतली, पांढऱ्या सदऱ्यांतली पोरं पाठीवर दप्तरं टाकून नुकतीच माझ्या दारावरून आपापल्या घरी परतलेली असतात. माझा जीव कातर होतो.

संजय अजून कसा आला नाही !

मी रस्त्यावर जाऊन उभी राहते. दूरवर नजर लावते. संजय दिसतच नाही. जीव कसा गलबलून जातो. फक्त आजच संजयला शाळेत एकटं जावं लागतं आणि आता एकटंच परतावं लागणार असतं तर मनाची ही अवस्था 'हे' दौऱ्यावर गेलेले असतात नि राजन्– माझा मोठा मुलगा– मामाच्या गावी गेलेला असतो. म्हणून संजयला आज एकटंच शाळेत जावं लागलेलं असतं.

रस्त्यावरच्या दूरच्या वळणावर संजय अधिऱ्या डोळ्यांना दिसतो. हायसं वाटतं. दोन्ही अंगाचा भार कुबड्यांवर देऊन डावा पाय फरफटत तो हळूहळू येत असतो.

चालताना त्याला किती त्रास होत असेल ! शाळेतली पोरंही याला 'लंगडा, लंगडा' म्हणून चिडवतात. हैराण करतात. त्यांच्याकडे बघताना हा कसा केविलवाणा दिसत असेल ?

माझे डोळे एकदम तरारून येतात. डोळ्यातल्या पाण्यामुळे संजय धूसर, अस्पष्ट दिसू लागतो. काजळी धरलेल्या काचेतून बघितल्यासारखं वाटतं. मी पटकन डोळे कोरडे करते. त्याच्याकडे एकटक बघू लागते.

संजय माझ्याजवळ येतो. अजून मी रस्त्यावरच. आम्हा दोघांतलं अंतर नाहीसं होतं तसा तो कुबड्या सोडून देतो नि माझ्या गळ्यांत दोन्ही हात टाकीत मला मिठी मारतो. माझ्या गालावर आपले रेशमी ओठ टेकतो. गालावरून मोरपीस फिरल्यासारखं वाटतं.

मी त्याच्या कुबड्या उचलते. त्याला हाताशी धरून घरात आणते.

थोड्या वेळानं मी देवासमोर दिवा लावते. देवाला हात जोडते. डोळे मिटून. संजय माझ्याजवळच असतो. त्यानेही आता हात जोडलेले असणार हे मला माहीत असतं.

"बाबा कधी येणार आहेत ग ?" तो मध्येच विचारतो.

"उद्या." मी डोळे उघडून म्हणते.

"आणि दादा ?"

"अरे तो तर कालच गेला ना ? येईल चार-पाच दिवसांनी."

"मला नाही नेलं हं दादानं मामाच्या गावाला. फिरायला जातो म्हणाला मला आणि गेला तसाच निघून."

आता दादाबरोबर हा गेला असता तर माझ्या एवढी याची कुणी काळजी घेतली असती ? याच्याबरोबर मीच हवी ना ?

आता सगळं घर विजेच्या दिव्यांच्या प्रकाशांत झगमगून गेलेलं असतं

मी स्वैंपाकाला लागते आणि संजय शाळेतल्या गोष्टी मला सांगत बसतो.

आमचं जेवणखाण, आवरासावर झाल्यानंतर मी संजयला जवळ घेऊन झोपते.

"आई एक गोष्ट सांग ना ग !" थोड्या वेळांत संजय म्हणतो.

"रोजरोज कसली गोष्ट सांगायची रे ! अं ?"

"सांग ना ऽ "

"बरं बरं, सांगते बाबा."

"पण खरीखरी गोष्ट सांग हं ! नाही तर पुष्कळ वेळा तू आपल्या मनाचीच गोष्ट सांगतेस."

"नाही रे ! खरीच गोष्ट सांगते. एक राजकन्या आणि सात राक्षसांची गोष्ट सांगू ?"

"ती तर जुनीच आहे."

"मग आवडती-नावडतीची सांगू !"

"नको ! ती तर परवाच सांगितलीस तू. एवढंही कसं लक्षांत राहत नाही ग तुझ्या ?"

"बरं. आता राजपुत्राचीच गोष्ट सांगते."

"खऱ्या राजपुत्राची गोष्ट ना ?"

"नाही तर काय ! तू नि मी दोघंही खरी खरी आहोत ना ! तसाच हा राजपुत्रही खरा आहे अगदी. ऐक

एक होता राजपुत्र. सुंदर नि ऐटदार"

"आपल्या दादासारखा का ग ?"

"हो. आणि मध्येमध्ये बोलायचं नाही हे कितीदा सांगायचं रे तुला ! नुसतं 'हं' म्हणायचं."

"बरं ? हं."

"तर एक राजपुत्र होता. सुंदर. ऐटदार. एकदा काय झालं ! त्याचं आकाशातल्या एका चांदणीवरच मन बसलं. त्याला वाटलं, आपण ह्या चांदणीशीच लग्न करायचं. रोज रात्री तो त्या चांदणीकडे बघायचा ती चांदणीही डोळे मिचकवायची. पण त्या चांदणीजवळ जायचं कसं ? तिला हे सांगायचं कसं ? म्हणून राजपुत्र काळजी करू लागला. दिवसेंदिवस रोड होत चालला. राजाला वाटलं, राजपुत्राला कसली चिंता लागली ? राणीला वाटलं, राजपुत्राला कुणाची दृष्ट लागली ? मोठमोठ्या वैद्यांना कांही कळेना. मांत्रिकांना कांही कळेना.

"...एक दिवस काय झालं ! राजपुत्राला वाटलं' त्या चांदणीलाच आपल्याकडे बोलवायचं. तो रात्र होण्याची वाट पाहू लागला. रात्र झाली. ती चांदणी राजपुत्राला दिसली. राजपुत्र हात उंच करून म्हणाला, 'चांदणी ये ! आपण लग्न करू. सुखांत राहू. मी तुला त्रास देणार नाही. तुझ्यावर रागावणार नाही.'

"... ती चांदणी हसली. फुलली. तिनं गमतीनं डोळे मिचकावले, नि एकदम राजपुत्राकडे झेप घेतली. राजपुत्राला इतका आनंद झाला की त्यानं तिला पकडण्यासाठी हात वर केला नि पटकन् तिला धरलं. पण मूठ उघडून पाहिलं तो काय ! चांदणीचा लहानसा दगड झाला होता. राजपुत्राला इतकं वाईट वाटलं की तो रडू लागला. त्यानं अन्न सोडलं. पाणी सोडलं. रोज रात्रीं हाती चांदणीचा दगड घेऊन राजपुत्र रडत बसायचा."

"तो राजपुत्र वेडा होता का ग ?" संजय मध्येच विचारतो.

"वेडा ? का रे बाबा ?"

"नाही तर काय ? त्या चांदणीचा दगड झाला एवढ्यासाठी कशाला रडायचं ! आकाशात दुसऱ्या चांदण्या होत्या ना ?"

"होत्या रे बाबा ! पण राजपुत्राचं त्याच चांदणीवर खरं खरं मन बसलं होतं ना ?"

"जा, तू सुद्धा राजपुत्रासारखीच वेडी आहेस." असं म्हणत संजय कूस बदलतो आणि माझ्याकडे पाठ करून झोपी जातो.

मीसुद्धा राजपुत्रासारखी वेडी ? वेडी नाही तर काय ? म्हणूनच तर संजयला एवढं जपते मी.

मला झोपच येत नाही. माझे डोळे केव्हा भरून येतात ते कळत देखील नाही. मी तशीच पडून राहते. संजयच्या पांगळ्या पायावरून हात फिरवीत राहते. आणि मग डोळ्यातून ओघळणारं पाणी बराच वेळ उशीवर टपटपत राहतं.

★●★

शोषिता

म. के. देशपांडे

महावळेश्वरला 'बॉम्बे पॉइंट' वर सूर्यास्त बघत मी उभा होतो. पश्चिमेकडे सूर्याचा फिकट तांबडा गोळा पसरट आकार घेत क्षितिजाच्या सांदीत हळू हळू दिसेनासा होत होता. सूर्यबिंबाच्या खाली अवकाशाचा केवढातरी तुकडा घूसरलेला होता. तिकडे माझी नजर खिळली होती. सूर्याच्या प्रकाशाने दीप्तीमान न होणाऱ्या अवकाशाच्या कुशीत काय दडलेले असावे, याचा विचार मी करीत असतानाच कसल्या तरी कोलाहलानं मी मानावर आलो.

सूर्यबिंब पार बुडालं होतं आणि "बॉम्बे पॉइंट" वरील सूर्यास्ताच्या नाटकाचा अखेरचा अंक आता समाप्त झाल्यामुळे तो देखावा पाहण्यास जमलेले मुंबईचे सारे गुलहौशी सुटकेचा निःश्वास टाकून परतण्यास अधीर झाले होते.

मी मान फिरवून मागे पाहिलं आणि एकदम चमकलो. थोड्याच अंतरावर स्त्रीपुरुषांच्या घोळक्यात लिंबू रंगाच्या आपल्या नेहमीच्या आवडत्या पातळात मंदाकिनीसारखे मला कोणीतरी दिसले. मंदाकिनी गुप्ते ! दहा वर्षापूर्वीची मंदा माझ्या डोळ्यासमोर तरळू लागली. तसबिरीची चौकट जुनी झाली तरी त्यातील चित्र तेच होते.

पण मंदा इकडे कुठं येणार ? मी झटकन नजर वळवली आणि परत सूर्यास्त झाला होता त्या क्षितिजाच्या तुकड्याचा भेद घेऊ लागलो. आकाश निरभ्र होते. कोठेही कसलीही हालचाल नव्हती. दूरवरचा प्रतापगडचा पसरट विस्तार हळूहळू काळोखात बुडत होता. माझ्या सभोवतीची वर्दळ हळूहळू कमी होऊ लागली. तितक्यात माझ्या अगदी निकट कोणीतरी येऊन उभं असल्याचा मला भास झाला. कसल्यातरी परिचित सेंटचा शिडकाव सभोवतालच्या वातावरणात झाला. परिचित श्वासोच्छवासांच्या स्पंदनाचा हळुवार स्पर्श मला होऊ लागला. तुम्ही इकडे कोणीकडे ? आणि तू कशी इकडे मंदा ?

या दोन प्रश्नांच्या उच्चाराबरोबर कालाचा लंबक स्थिर झाला होता. त्या प्रश्नाच्या उत्तराची, त्यातील तपशीलाची कुणालाच उत्सुकता नव्हती. तशी ती असती तर हे प्रश्नच विचारले गेले नसते. साऱ्या गहन प्रश्नांची उत्तरे माहित असणाऱ्या गुरूने आपद्धर्म म्हणून शिष्याला उगाचच प्रश्न विचारावेत, तसे हे प्रश्न होते.

मी मंदाकडे पाहिलं आणि जागेवरून उठून चालू लागलो. सावलीसारखी तीही माझ्यामागे येत होती. माणसांची वर्दळ आता थांबली होती आणि निसर्गाची वाढली होती. वाऱ्याच्या लोटानं झाडे फुत्कारत होती. पक्ष्यांचे आवाज रेडिओवरील कर्कश समूहगीतासारखे कान भेदून जात होते.

आम्ही वाट चालत होतो, ती मात्र उलटी. दहा वर्षापूर्वीच्या भूतकालाचा आलेख चाचपडत आम्ही चालत होतो. भोवतालचा काळोख आता कमी कमी होऊन आमची पाऊलवाट प्रकाशाने उजळली होती. मी मागे पाहिलं मंदा कुठे दिसेना. माझी सावली माझा पाठलाग करीत होती. त्या सावलीला आता मंदाच्या शरीरबंधाचा आकार येऊ लागला. परिचित मृदु गंधाचा शिडकाव तीत होऊ लागला, वीज चमकावी तसं अंतरीचं द्वार उजळून निघालं आणि स्मृतिकोषातही सारी कपाटं भराभर उघडली जाऊन नजरेसमोर उभी राहिली

दहा वर्षांपूर्वी माझी अन् मंदाकिनी गुप्तेची प्रथम ओळख झाली ती 'दिनशा अँड दिनशा' या सॉलिसिटर फर्ममध्ये. चांगली चाललेली वकिली अर्ध्यावर सोडून एका बडया घेंडाच्या ओळखीनं मी त्या फर्ममध्ये नोकरीला लागलो. कामावर रूजू होताच प्रथम माझी ओळख करून देण्यात आली ती मंदाकिनी गुप्तेशी. ती माझी स्टेनो-पर्सनल असिस्टंट होती. गव्हाळ रंगाची, थोडा लांबट चेहरा असलेली व डोक्यावर आधुनिक पद्धतीचा केसांचा भारा बांधलेली मंदाकिनी मला विशेष आकर्षक वाटली नाही. तिच्या एकंदर पोषाखाशी तिची केशरचना अगदी विसंगत दिसत होती. वयानंही ती जरा अधिकच म्हणजे तिशीकडे झुकलेली वाटत होती. स्टेनोग्राफर मुलीत आढळणारा पोषाखी नखरेलपणा तिच्यात बिलकुल दिसत नव्हता.

एक महिन्यानंतरची गोष्ट. मंदाकिनीचं ऑफिसातील अस्तित्व मी आता गृहित धरून चाललो होतो. म्हणजे माझ्या टेबलावर रंगीत पेपरवेट अथवा अॅशट्रे असावा इतपतच मला तिच्या अस्तित्वाची जाणीव होत होती. पण त्या दिवशी डिक्टेशन घेण्यास ती माझ्या पुढयात टेबलाशी येऊन बसली तेव्हा तिच्या चेहऱ्याकडे पाहताच मी एकदम चमकलो. डोळयावर चमत्कारिक सूज आली होती. कपाळाची शीर अगदी ताठ झाली होती. आणि तिच्या शरीराच्या सर्वांत आकर्षक असलेला अवयव असे तिचे ओठद्वय मुडपल्यामुळे कसेसेच दिसत होते. तिचा तो चमत्कारिक चेहरा पाहून मी डिक्टेशन न देता तिच्याकडे नुसता बावरल्यासारखाच बघत राहिलो. आम्ही दोघे असे स्तब्ध किती वेळ बसलो होतो कोण जाणे पण तेवढयात मंदाकिनी म्हणाली,

"सर डिक्टेशन देता का ?"

तरीही मी काही बोललो नाही. तिच्या चेहऱ्यावरील दृष्टी ढळू न देता मी व्यग्र चित्तानं तिच्याकडे बघतच राहिलो. संथ जलाशयात मध्येच बुडबुडा उठावा व त्याभोवती निर्माण झालेल्या वर्तुळात आपली नजर विद्ध होऊन जावी, तसं काहीसं माझं झालं. मंदाकीनीकडे मी बघत होतो. पण दृष्टीसमोर माझी ताई तरळत होती. जवाएवढया सुखाच्या आशेनं ती जन्मभर डोंगराएवढया दुःखाशी झगडत राहिली. आणि सहा महिन्यापूर्वीच दारिद्रयाच्या क्षयानं ती मृत्युमुखी पडली. भावावर तिची केवढी मदार ! माझ्या शिक्षणासाठी तिनं आपलं शिक्षण अर्ध्यावर सोडलं. माझं शिक्षण निर्वेध व्हावं म्हणून तिनं नोकरी पत्करली. आपला भाऊ डोळयादेखत कर्तबगार झालेला तिनं पाहिला. परंपरागत दारिद्रयाचा वसा झुगारुन देऊन त्यानं पैशाची झूल अंगावर चढवलेली तिनं पाहिली. एका श्रीमंताच्या मुलीशी त्याचं मोठया थाटामाटानं लग्न झाल्याचं तिनं हेचि देही हेचि डोळा पाहिले. हळूहळू आपल्या भावाच्या संसाराचं वर्तुळ आकुंचित होत होत स्वतःच्या बायकोमुलांच्या भोवती केंद्रित झालेलं तिनं पाहिलं. ती बिचारी त्या वर्तुळाबाहेर लांब निश्चल उभी राहून आपल्या लाडक्या भावावर प्रेमाची बरसात करीत होती. राखीची लहर फिरावी तसा तिचा भाऊ तिच्या खोलीवर डोकवायचा अन बहिणीच्या हातावर शंभराची एखादी नोट ठेवायचा. तिच्या डोळयातून अशा वेळी अश्रुधारा वाहू लागत

क्षयानं ती गेल्यावर एकदा तिच्या खोलीवर गेलो होतो. मी दिलेल्या तीन चार शंभराच्या नोटा आवडत्या एकनाथी भागवतात जपून ठेवलेल्या मला आढळल्या.

पापणीच्या कडा ओलसर झाल्या म्हणून खिशातला रुमाल मी चाचपू लागलो. मंदाचे मजकडे अगदी बारीक लक्ष असाव. ती एकदम म्हणाली;

"तुम्हाला बरं नाही का ? बरं नसेल तर आज काम करू नका."

मी तिच्याकडे निरखून पाहिलं. कसलाही विशिष्ट भाव तिच्या चेहऱ्यावर नव्हता. फक्त तिचे दुमडलेले ओठ आता किंचित विलग झालं होते. चेहऱ्याच्या स्नायूंवरील ताणही कमी झालेला दिसत होता. किंचित हसण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली,

"तुमच्याकरिता कॉफी आणायला शिपायाला पाठवू का?"

"नको."

"बरय्" येवढं बोलून मंदा जागेवरून उठली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहिलं. सर्वसाधारण मुलींच्या मानानं तिची उंची चांगली होती. तिची चालण्याची ढबही ऐटबाज होती. तिनं केस डोक्यावर ऊंच बांधलं होते म्हणून तिच्या मुक्त भाराचा अंदाज येत नव्हता असं नाही. मोकळा सोडला असता तर तिचा केशकलाप तिच्या कटिबंधाला सहज चाटून गेला असता. केबिनच्या दाराशी ती पोहोचली असतानाच मी तिला म्हटलं,

"मिस गुप्ते, तुमची हरकत नसेल तर आपण बाहेर कुठेतरी कॉफी घेऊ या."

तिनं मागं वळून पाहिलं. भयभीत हरिणीसारखी मला तिची नजर वाटली. पण माझ्याकडे निरखून पाहिल्यावर तिच्या चेहऱ्यावरील भाव पालटले. तिनं मानेनं होकार दिला आणि थोड्याच वेळात आम्ही माझ्या गाडीत बसलो.

हॉटेलात बसून निवांतपणे एकत्र कॉफी प्याल्या-नंतर आमच्यात बराच मोकळेपणा आला. दुःखाची कणव आम्हाला अधिक जवळ आणीत होती. तरीही मंदाच्या वागण्यात सावधगिरी व अलिप्तता होती. जीवनातील दारूण अनुभवामुळे मनाला विषण्णता यावी व वागण्यात यांत्रिकता यावी, तसं मला तिचं वागणं वाटलं. माझ्या ताईविषयी मी तिजजवळ बोललो. माझ्या बायकोबद्दलही बोललो. शालिनी-सारखी सुगुण, सुस्वभावी व आपल्या नवऱ्यावर मनस्वी प्रेम करणारी पत्नी मिळाल्याबद्दल मी स्वतःला सुदैवी समजतो हेही मी तिला सांगितलं.

मंदस्मित करीत ती म्हणाली होती "तुमच्या मिसेसना एकदा पाहिलंच पाहिजे मला." त्यानंतर मंदा आमच्या घरी येऊन गेली. तिचं शालिनी-विषयी काय मत झालं हे समजण्यास मार्ग नव्हता. परंतु पुन्हा आमच्या घरी येण्याविषयी तिनं कधी उत्सुकता दाखविली नाही. माझ्या सहा वर्षाच्या मुलाला — शशांकला — मंदामावशी फार आवडली. अधून मधून तो तिची आठवण काढायचा. मंदाही मधूनमधून त्याच्याकरिता चॉकलेट अगर बिस्किटाच्या भेटी पाठवायची. मी एकदा गमतीनं तिला म्हटलं सुद्धा

"या भेटी शशांकसाठी आहेत का त्याच्या वडिला साठी ?" मंदा काही न बोलता फक्त हसत असे.

"आज तुम्हाला विशेष काम दिसत नाही. ऑफिसातून लवकर निघून सिनेमा बघायचा का आज ?"

मी जराशा विस्मयानं मंदाकडे पाहिलं. माझ्या-बरोबर एकटी मंदा आजवर कधी आली नव्हती. आयुष्यात बऱ्याच मुलीशी मी खेळलो होतो. त्यावरून काही आडाखेही मी बसविले होते. जी मुलगी एकांतात तुमच्याबरोबर सिनेमाला येऊ शकते ती नंतर थोड्याच दिवसात तुमच्याबरोबर एकांतात झोपण्याचीही तयारी दाखवू शकते. मंदाविषयीच्या माझ्या कल्पना वेगळ्या होत्या. म्हणूनच थोडंसं आश्चर्यानं मी तिज-कडे पाहिलं अन् म्हटलं, "आज अचानक लहर फिरली तुझी. खरं विचारशील तर मला आज अगदी कंटाळा आला आहे."

अकस्मात आकाशात ढग दाटून यावेत अन् वातावरणात काळोख दाटावा तसा तिचा चेहरा एक-दम पडला. आता तिला रडू फुटणार असं मला वाटू लागलं.

" बरं जाऊ या आज पिक्चरला. "

थोड्याच वेळात टेबलावरील कागदपत्र आवरून मी केबिनबाहेर पडलो. मी खाली गाडीशी पोहचल्या-नंतर दहा अकरा मिनिटांनी मंदा आली. ऑफिसातल्या कोणालाही संशय येऊ नये म्हणून मुद्दामच आम्ही एकदम बरोबर बाहेर पडायचं टाळत असू. मंदा गाडीत बसल्याबरोबर मी गाडी वेगात सोडली ......

सिनेमा पाहताना अंधारात आम्ही एकमेकाला खेटून बसलो होतो. तरी मनानं आम्ही अनेक योजनं दूर आहोत, असं वाटत होतं. सिनेमाकडे माझं बिल-कुल लक्ष नव्हतं. मी सारा वेळ माझ्या शेजारी बसलेल्या विचित्र मुलीचाच विचार करीत होतो. मी मोकळेपणानं माझ्या खाजगी जीवनातील अनेक गोष्टी तिला सांगितल्या. माझ्या ताईनं मजसाठी केलेला स्वार्थत्याग, आणि माझ्या बायकोनं मजवरील प्रेमामुळे दाखविलेली स्वार्थलंपटता या एकाच नाण्याचा दोन

बाजू होत्या. दोहोंचाही स्थायीभाव प्रेम हाच होता. पण त्यामुळे ताईला मजपासून फक्त दुःख सहन करावं लागलं. तर माझ्या बायकोच्या वाट्याला सुखाचा सागर आला. कशाची खंत बाळगायची अन् कशाचं समाधान मानायचं याबद्दल माझ्या मनात संभ्रम निर्माण व्हायचा. मंदाला मी हे सारं सांगितलं तरी ती काहीच बोलत नसे. ईश्वराघरच्या तराजूच्या न्यायात सुखदुःखाच असंच वाटप व्हायचं, अशी तिची धारणा असे. जगात असा कोणीही नाही की ज्याच्या प्रेमात स्वार्थ नाही. किंबहुना स्वार्थातूनच आसक्ती व आसक्तीतूनच प्रेमाची उत्पत्ती होते, असं ती नेहमी म्हणे. हे सारं गहन तत्वज्ञान ती जीवनाच्या कुठल्या अनुभवाच्या पाटीवर गिरविण्यास शिकली हेच मला समजत नसे कारण तिच्या जीवनाचा सारा पट मला अजून अज्ञातच होता

मला थिएटरात बसणं असह्य झालं. मी मंदाच्या खांद्याला स्पर्श करुन म्हटलं, "आपण थिएटरच्या बाहेर पडू या का ?" माझ्या मागोमाग तीही उठली आणि आम्ही थिएटरच्या बाहेर मोकळ्या-वर आलो. गाडीत बसल्यावर तिची मूक संमति गृहीत धरून मी गाडी समुद्रकिनाऱ्यावर वळविली.

नरीमन पॉईन्टवर त्यावेळी बिलकुल वर्दळ नव्हती. लोकांची तुरळक ये जा चालू होती. बाकावर बसता बसता मी मंदाला म्हटलं.'

"अर्ध्यातून सिनेमातून उठवलं म्हणून रागावलीस की काय ?"

"छेः कोणावर रागावण्याची माझी शक्ती मी केव्हाच गमावून बसले आहे." ही मुलगी मध्येच असं एखाद वाक्य बोलते की ज्यायोगे जीवनातली प्रगाढ अनुभूतीची लाट ढवळून वर पृष्ठभागावर यावी. मंदाच्या दुःखी जीवनाची मला थोडीशी कल्पना होती. तिची आई लहानपणीच वारली होती, तिच्याहून वडील दोघा बहिणीची लग्ने झाली होती अन् आता खालच्या बहिणीचंही ठरत होतं. तिचा एकुलता एक भाऊ अर्धवट असल्यामुळे घरीच बसून होता. वडि-लांचा स्वभाव अतिशय तापट व संशयी होता. या साऱ्या गोष्टी तिच्याकडून मला कळल्या होत्या. पण अनेकांच्या घरी याहूनही वाईट परिस्थिती असल्याचं मी पाहिलं होतं. आणि अशा परिस्थितीतही आनंदी वृत्तीनं वागणारी त्या घरची मुलंही मी पाहिली होती. मग मंदानंच एवढं उदास, निरुत्साही जिणं का जगावं ? आणि अशातच मोठं धाडस करुन मजबरोबर एकट सिनेमाला येण्याचं दिव्य का करावं ?

मी मंदाकडे पाहिलं. माझ्या मनातील विचार तिला समजले की नाही हे जाणायला मी काही मनः कवडा नव्हतो. पण माझ्या सहवासात ती फुलत होती, सुखी होत होती, तिची विपण्णता हळूहळू दूर होत होती. आणि तिच्या जीवनावरची काजळी झडत होती. याची जाणीव तिच्याकडे पाहताच मला झाली. तिच्याबद्दल मला अनेकवार अनुकंपा वाटू लागली. मी आवेगाने तिचा हात माझ्या हातात घेत म्हणालो,

"मंदा तू मला खूप आवडतेस...."

तिने मजकडे वळून पाहिलं, माझ्या दृष्टीला दृष्टी भिडवून ती किंचित हसली. तिचं हास्य इतकं लाघवी व आकर्षक होतं यांची जाणीव आज प्रथमच मला झाली. मी आणखीन तिच्याजवळ सरकलो व तिला बाहुपाशात घेण्याच्या प्रयत्नात लागलो.

तिनं हळूच माझी मिठी सोडवली व माझा हात थोपटीत ती पुटपुटली— "मी आज खूप सुखी आहे. खूप सुखी आहे. आनंदाचा हा क्षण असाच टिकू दे."

"पण मंदा मला तुला आनंदित झालेलं बघायचं आहे. माझ्या स्पर्शानं तुला दुःख होतय का ?"

"अस काही बोलू नका, माझी तुमच्यावर खूप भक्ती आहे. भक्तानं देवावर नुसती फुलं वाहायची असतात. माझ्या भक्तीचा अवमान होईल, असं काही ही मला करायला लावू नका."

माझ्या डोळ्यासमोरील मोहाची धुंदी खडकन् उतरली. मी चकित होऊन तिजकडे पाहत राहिलो. अशा अनेक पोरींना मी अगदी सहजगत्या बाहुपाशात घेतलं होत आणि माझ्या अंकित केल होतं. पण मंदाच्या बाबतीतला हा अनुभव अगदी नवीन होता. माझे सारे आडाखे चुकले होते. मंदावर मी खरोखरीच

प्रेम करू लागलो होतो असं मला वाटतं. पण माझा पुरुषार्थ डिवचला गेला होता. अप्राप्य म्हणून मंदाच्या आसक्तीची मला आणखीनच ओढ लागून राहिली.

थोडयाच वेळानं आम्ही तेथून उठलो, आणि घरी गेलो.

ऑफिसात मी पोहोचलो तो टेबलावर मंदाची चिठ्ठी पडली होती, ' जसे असाल तसे या. मी तुमची वाट पाहात आहे. . . . ''

मी तसाच परत जिना उतरून खाली गेलो व मोटारीत बसलो मंदाच्या घरापाशी पोहोचलो तेव्हा तिथं काहीतरी चमत्कारिक घडलं असावं असं वाटू लागलं. मी घरात शिरलो तेव्हा बाहेरच्या व्हरांडयात मंदाचे मेव्हणे भेटले.

"हृदयविकाराचा झटका येऊन आज सकाळीच मंदाताईचे वडील गेले.''

मी शून्य होऊन त्यांचेकडे पाहातच राहिलो मंदाचे वडील वारले. कसेही झाले तरी ते तिचे वडील होते. मंदाच्या शिरावरील कृपाछत्र आज नाहीसं झालं होतं. मंदाची काय मनःस्थिती झाली असेल ?

मी आतल्या खोलीत गेलो. एका कोपऱ्यात मंदाच्या वडिलांचा देह वस्त्रानं आच्छादिलेला पहुडला होता. जवळच एकटी गुडघ्यात डोकं खुपसून मंदा बसली होती मी जवळ जाऊन हळूच तिला म्हणालो,

'मंदा मी आलो आहे.''

मंदानं मान वर करून पाहिलं. तिच्या चेहऱ्यावरची जीवनाची कळा जणू नाहीशी झाली होती. तिच्या वडिलांच्या चेहऱ्यावरची प्रेतकळा तिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाली होती. जिवंतपणी मरणकाळच्या वेदना सहन करण्याचा जणू मंदानं वसा उचललेला होता की काय कोण जाणे ?

मला जवळच्या खुर्चीवर बसण्यास खुणावून मंदा म्हणाली, "बाबा गेले तेव्हा मी एकटी त्यांच्याजवळ होते. त्यांचा प्राण केव्हा गेला समजलं सुद्धा नाही. घरात कुणीसुद्धा नव्हतं तेव्हापासून मी वाट पाहते आहे. कुणीतरी येईल म्हणून. अखेर शेजारच्या वासुदेवाला चिठ्ठी घेऊन ऑफिसात पाठविलं. अण्णासाहेब आता तुमच्या पुढेच आलेत ''

अण्णासाहेब म्हणजे तिचे मेव्हणे मला व्हरांडयात भेटले ते. मंदाचे सांत्वन करून मी बाहेर व्हरांडयात आलो. खिशातून पैसे काढून मी अण्णासाहेबांना दिले व म्हटलं,

"अण्णासाहेब, हे मंदाताईंनी पैसे दिलेत. दुःखाचा प्रसंग असला तरी सारी तयारी तर करायला पाहिजे. तुम्ही जाऊन सामान वगैरे आणा. मंदाच्या वडिलांचे जवळचे कोणी नातलग असल्यास त्यांनाही कळवा. ..''

थोडयाच वेळात त्या घरात माणसे जमू लागली. मंदाच्या वहिणी आल्या. त्यांचे नवरे आले. त्यांची मुलं आली, आणि मग इतकी रडारड सुरू झाली की कोणाला अधिक शोक झाला आहे हे दर्शविण्याची जणू चढाओढ लागली असावी असं वाटू लागलं.

त्या घरात आजपर्यंत एकजीव झालेली मंदा मात्र एकदम परक्यासारखी भासू लागली, तिच्या चेहऱ्यावर प्रेतकळा पसरली होती. परंतु गळयातून हुंदका बाहेर पडत नव्हता, की डोळयात अश्रु उभे राहत नव्हते. .

मी तर त्या घरात अगदीच परका होतो. मला एकदम उबगल्यासारखं झालें. मी तडक बाहेरचा रस्ता धरला व तेथून घरी गेलो. . . लोहचुंबकाच्या आकर्षणाने जवळ आलेली वस्तू चुंबकाचे आकर्षण दूर होताच दूर जाऊन पडावी, तसं काहीसं माझं झालं.

मोटार भरधाव सोडून मी दूरवर समुद्र किनाऱ्यावर जाऊन बसलो. ऊन तापलं होतं. किनाऱ्यावर चिटपाखरूसुद्धा नव्हतं, मी एकटाच वेडयासारखा समुद्राच्या उसळत्या लाटांकडे पाहत उन्हात चमचमणारे पाणी पहात तिथं किती वेळ उभा होतो कोण जाणे

दोन दिवसानंतर मंदा मला संध्याकाळी तिच्या घरासमोरच भेटलो. मी गाडी थांबवली व तिला खुणावलं.

"तुझ्याकडेच चालली होतो मी". मंदा कांही न बोलता मोटारीत येऊन माझ्या शेजारी बसली व मला म्हणाली,

"तुमच्यावरोबर खूप खूप बोलायचं आहे मला, कुठेतरी घेऊन चला मला की जिथं कुणीही परका मनुष्य नसेल..."

मी विस्मयानं मंदाकडे पाहिलं व तसाच स्टीअरिंग व्हीलवर हात ठेवून स्तब्ध बसलो. "चला ना. गाडी चालू करता ना..."

मी माझ्या तंद्रीतून खडबडून जागा झालो गाडी सुरू करून मी वेग वाढवू लागलो. पण जायचं कुठं ? एकदम मला आठवण झाली. वरळी सी फेसवर माझ्या एका मित्राचा फ्लॅट होता. नुकताच तो व त्याची बायको काश्मीरला गेली होती फ्लॅटवर अधूनमधून लक्ष ठेवावे म्हणून त्याच्या किल्ल्या त्यानं मजजवळ देऊन ठेवल्या होत्या. कोटाच्या खिशात किल्ल्या आहेत का ते मी चाचपून पाहिलं आणि वरळीच्या दिशेनं गाडी सोडली

वरळीला माझ्या मित्राच्या फ्लॅटमध्ये शिरल्यावर आतून मी दार लावून घेतलं, तोच मंदा एकदम हमसा-हमसी रडू लागली. भगीरथानं अडवलेला पाण्याचा स्त्रोत जणू बांध फुटल्यासारखा आता दुःखवेगानं तिच्या नेत्रातून वाहू लागला होता. मी तिला जवळ घेऊन हळूहळू थापटू लागलो. जवळच्याच प्रशस्त सोफ्यावर मी तिला अलगद बसविलं. तिनं माझ्या गळयाला घट्ट मिठी मारली व माझ्या छातीवर आपलं मस्तक विसावलं.

थोडया वेळानं तिच दुःख कमी झालं. दुःखाचे कढ अजून पूर्णपणे निवालेले नव्हते. पण त्याचा चटका जरा कमी झाला होता. स्वतःशीच पुटपुटत बोलावं तसं ती बोलत होती.

"बाबा गेल्यावर त्या घरात राहण्याची माझी आता रत्तीभर इच्छा नाही. दोनच दिवसात लागलीच माझ्या वहिणी त्या घरावर आपला मालकी हक्क सांगू लागल्या आणि आणि..."

"आणखी काय ?"

धाकटया वहिणी म्हणतात, तू लग्नाशिवाय राहिलीस म्हणून लोकांना नाही नाही त्या शंका येतात. आमचं त्यामुळे लग्न होत नाही..."

"मंदा......"

"होय, खरं तेच सांगते आहे मी तुम्हाला. आजकाल मी तुमच्यावरोबर हिंडते फिरते हे कुणालाच आवडत नाही. बाबांच्या कानावर सुद्धा कुणीतरी ही गोष्ट घातली. मरणाचे आघलेच दिवशी ते मला खूप बोलले होते. तू म्हणजे या घराला दिलेला शाप आहे. असंसुद्धा रागाच्या भरात ते म्हणाले......खरोखरीच का शापित आहे मी......"

"मंदा, मंदा असं काय करतेस ? कोणी रागाच्या भरात बोललं तर ते काय खर असतं ?"

"नाही हो; माझ्या बाबतीत हे सारं खरं आहे. आई गेली तेव्हापासून मी या घरात शापित होऊन अहिल्येच्या शिळेवत् जिणं जगत आहे. मी बारा वर्षाची होते तेव्हापासून मला बाबांच्या जीवनाची एक वेगळीच झाक समजली. त्यांचा एका बाईशी संबंध होता आणि त्या दुःखानं पिचून आईचा जीव गेला असे समजले तेव्हा डोक्यावर आकाशीची कुऱ्हाड कोसळली तसं वाटलं. वेलीनं मोठया आशेनं वृक्षाचा आधार घ्यावा पण तो वृक्षच मुळातून किडका निघावा तसं काहीसं माझ्या जीवनाचं झालं. कोणाचा कसलाही आधार, मायेचा ओलावा आणि हृदयाची ओढ नसल्यामुळे वाऱ्यानं थरथरावं तसं माझं मन झालं. कोणाच्या डोळ्यात रोषाची किंचित छटा दिसली तरी माझं मन कोपायला लागे. कोणाच्या चेहऱ्यावरील किंचित विषाद दिसला तरी माझं हृदय धास्तावत असे माझ्या जीवनावर ही अशी निराशेची, विषादाची, भीतीची काळी कुट्ट छाया पडली अन् त्या सावटात माझं जीवन आणखीनच आकुंचित पावत होतं . . .

"तेवढयात तुम्ही भेटलात. तुमच्या आधी जे साहेब होते तेही चांगले होते. पण त्यांची नजर पुरुषी होती. उघड उघड नाही तरी हिंस्त्र होती

पाशवी इच्छेची वासना बाळगून होती. माझ्या संकोची अन् भित्रट स्वभावाला कंटाळून त्यांनी माझा नाद सोडला. तुम्ही माझ्या जीवनात आला, तेव्हा माझं जीवन फुलेल असं वाटू लागलं, पण तुमचं लग्न झालेलं होतं. तुमची शालीन पत्नी, तुमचा देखणा मुलगा, या तुमच्या सुखीं संसारावर माझी कृष्णछाया पडायला नको होती. म्हणून मी तुमच्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न करीत होते . . . पण तो असफल झाला. स्त्रीकडे पाहण्याची पुरुषांची पारंपरिक दृष्टी असते. ती दूर ठेवून बरोबरीची मैत्रीण म्हणून तुम्ही मला वागवू लागलात तेव्हा माझं मन फुलून उठलं. आधाशी जीवनात सुखाचं ताट समोर यावं तसं. मला तुमचा सहवास अधिकाधिक लुटावा, असं वाटू लागलं. पण जीवनाच्या अत्युच्च क्षणी मी तुमच्यापासून दांभिकपणे अलिप्ततेने दूर झाले. तुम्ही माझ्यावर खूप रागावला असाल याविषयी माझी खात्री आहे. आज सारी बंधनं झुगारून देऊन मी तुम्हाला पूर्णपणे मुक्त करणार आहे "

मंदा बोलत होती अन् माझं मन एका करुण विषण्णतेनं भरून जात होतं. सर्वांनी जिचं फक्त शोषणच करावं अशी ही शोषिता. तिला स्वतःचं असं काही जीवन अस्तित्व नाही का ? बायको मेल्यानंतर घर सांभाळणारी बाई म्हणून मंदाकडे तिच्या वडिलांनी दिलेली भूमिका, वडील वहिणीच्या बाळंतपणापासून तो त्यांच्या मुलांच्या संगोपनापर्यंत मंदानं केलेली धडपड आणि त्यामुळे ऐन तरुण वयातच तिच्यावर लावली गेलेली वडिलकीची भूमिका आणि आपल्या लग्नाच्या आड येते म्हणून आपल्या मार्गातून दूर व्हावं अशी अपेक्षा वाटणाऱ्या तिच्या कनिष्ठ वहिणीच्या भावनेतून तिच्यावर लादली गेलेली वैफल्याची भूमिका

या साऱ्यातून तिच्या जीवनाच्या रस शोषला गेला. आणि तिच्या वाट्याला आले फक्त निःसार, निःसार जीवनाचं चिपाड्.

अशी ही भोळीबावडी मुलगी आज आपल्या सर्वस्वाचे मला दान करण्यास सज्ज झाली आहे माझा पुरुषी स्वार्थ एव्हाना तिच्या दैदीप्यमान जीवनाच्या दर्शनाने गळून पडला होता. माझ्या स्वार्थी भावनेची व लालसेची माझी मलाच लाज वाटू लागली.

माझ्या भोवतालची मंदाची मिठी हलक्या हाताने सोडवून मी तिला कुरवाळल्यासारखं केलं. स्वतःच्या तेजस्वी शीलदर्शनासाठी सीतेनं भूमिगत होण्याचं दिव्य केलं, त्याची मला मंदाकडे पाहून आठवण झाली, एका संकुचित कवचात राहून व्यवहारी जगाच्या लक्ष्मण-रेषेत अभावात्मक, नकारात्मक जिणं जगणाऱ्या मंदाच्या जीवनाचे दुःख किती भेदक आहे याची आज मला कल्पना आली. समाजाच्या वेलीवर लागलेलं मंदासारखं निष्पाप फूल तसेच टवटवीत राहावे, निष्कलंक रहावं म्हणून जीवनातील साऱ्या सुखांचा तिला त्याग करावा लागावा व अखेर ते फूल कोमेजलेलंच राहावं ही तिच्या जीवनाची केवढी मोठी शोकांतिका !

माझ्या मनात एकच आकान्त उसळला. मी मंदाचा चेहरा माझ्या हाताच्या ओंजळीत घेतला व म्हटले, 'मंदा ! तू फार फार सहन केलं आहेस आजवर. आयुष्यात आता तरी तू सुखी व्हावंस अशीच माझी इच्छा आहे पण त्यासाठी तुला एवढा मोठा त्याग करण्याची आवश्यकता आहे असं मला वाटत नाही. . . ते न करताही तू सुखी होशील. माझा पूर्ण विश्वास आहे मंदा तुझ्या कर्तृत्वावर . . ."

मंदाचे डोळे एकदम पाण्यानं भरून आले. ती सोफ्यावरून उठली. अंगावरचे कपडे व केस नीटनेटके केले. जवळच्या वॉशबेसिनमध्ये तोंडावर पाण्याचा शिपकारा मारला व पुन्हा मजजवळ येऊन बसली.

थोड्या वेळानं आम्ही वरळीच्या त्या फ्लॅटमधून बाहेर पडलो व मंदाच्या घरी जाऊन मंदाला मी सोडलं.

त्यानंतर दोन तीन महिन्यांनीच मी ती नोकरी सोडली व मुंबईही सोडली मंदाचा व माझा पत्र-व्यवहार होण्याची फारशी शक्यता नव्हतीच. मी माझा पत्ता तिला दिलाच नव्हता मुळी.

दोन वर्षानंतर 'दिनशॉ अँड दिनशॉ' मध्ये काम करणारे एक गृहस्थ भेटले, त्यानी सांगितले की, मंदाकिनी गुप्ते सहा सात महिन्यापूर्वी क्षयाच्या विकाराने वारली. मला ते ऐकून जबरदस्त धक्का बसला. आज दहा वर्षं झाली मंदाच्या आणि माझ्या मैत्रीला. पण अजूनही वाटते की, मंदाच्या एकाकी जीवनाची वेल निर्दयपणे तोडणारा व तिचा जीवनरस शोषणारा तिच्या जीवनातला अखेरचा दांभिक पुरुष मी तर नाहीं ना ठरलो ?.

●★●

वनवासवाडी

लेखक :–मधु पवार

सातारा सोडून वाई देशाला जाणाऱ्या डांबरी सडकेनं पांच एक मैल गेलं की लिंब खिंड लागतं. या खिंडीच्या माथ्यावरून उजव्या अंगाला म्हटली तर पायवाट, म्हटली तर गाडीवाट लागते. चार दोन वळणं घेऊन, दोन-तीन वगळीतून खालीवर होऊन ती वाट वनवासवाडीला जाऊन भिडली आहे.

धा पंधरा कच्च्या इटेची घरं, धा पंधरा धाव्याच्या झोपड्या, प्रत्येक घरापुढं गुरांसाठी दगडी टचोळयांच गडाडं रचून केलेली वाडगी न शेजारी गवताची गंजवजा बुचाडं. अशी ही म्हटलं तर रानांतील वस्ती आहे, म्हटलं तर वाडी आहे.

एरवी कितीहि लहान गाव असलं, तरी त्यात वरली आळीं, खायली आळी आणि जरा मोठं गांव असलं, तर मधली आळी हमखास असते.

पण वनवासवाडीत असली आळीची भानगडच नाही. दुपारच्या पाण्यात म्हशींचा कळप पाण्याच्या ढवात मन मानल तसा वसतो, तशागत वनवास-वाडीतील घरं दाही दिशांला तोंडं करून वसली आहेत,

त्यातहि एक घर सगळयांपासन जरा तुटाक, वाडीकडं पाठ करून, उगवतीला तोंड करून उभं आहे. पोरांच्या घोळक्यांतून भांडून, रुसून बाजूला बसलेल्या पोरागत एकटंच उभं आहे. तिथं आबानाना न् त्यांची बारकी नात कृष्णाबाई राहतात.

वाडीपासून दोन हाकेच्या अंतरावर कृष्णा-काठाला लिंब गाव आहे. आजूबाजूच्या साळवण, रामोशीवाडा अशा वस्त्या मिळून दहाबारा हजार लोकसंख्या आहे. सहाजिकच पंधरा मेंबरांची मोठी ग्रामपंचायत पण तिथं आहे.

आता वनवासवाडी कांही लिंबगावाखाली नाही खरं. परंतु कुणाच्या तरी जागरूकपणामुळं वाडीलाही एक 'शीट' मिळाली आहे.

असा आयता घास तोंडात घालूनहि वाडीला त्याची फिकीर नाहीं. 'आयला उगीच ताप नको !' म्हणून कुणीच पंच व्हायला तयार नाही. परिणामी वाडीची जागा वरीच वर्षे रिकामीच आहे.

अशीच कुणी तरी खटपट करून पंचायतीच्या दिव्याचा खांब वाडीत उभा केला. वर्षं सहा महिने दिवा लागत होता. मग काय झालं कुणास ठावूक, दिवा पेटायचा बंद झाला.

आबानाना कुणा कुणाला म्हणाले, "आरं मर्दानु कुणी तरी पंचायतीत जाऊन सांगा . . ."

तर 'आयला, तितं जाऊन कुनी जिकीर करावी' असं सगळेच एकामेयला म्हणू लागले.

शेवटी वरच्या काचेच्या डबड्यानं मान टाकली व खांब पार कलला. रामोशी वस्तीवरले पक्के रोवलेले खांब अधून मधून चोरीला जायचे, फिरुन नवे लावले जायचे. वनवासवाडीतल्या एवढ्या लचालचा हाल-णाऱ्या खांबाला बरीक कुणी हात लावला नाही. हो ना करता त्यानं पार जिमिनीवर लोटांगण घातलं. वरच्या डबड्याच्या काचा फुटल्या, त्या आबानानांनी मुकाटयानं गोळा करून लांब नेऊन टाकल्या.

वनवासवाडीत शिरलं की दोन गोष्टी ठळकपणे नजरेत भरतात. जिकडं तिकडं माजलेली ढोपरभर धूळ आणि त्या धुळीत लपलेले, अनेक वर्षांच्या उन्हा-पावसानं रापलेले दगडाचे टोळे. माणूस सावं जरी चाललं तरी बकाबका गुलाल उधळतो न् नाकातोंडात त्याचा खकाणा जातो. आणि त्या धुळींत बुडलेल्या दगडी टोळयांना हमखास चार–दोन तरी ठेचा लागतात.

बाकी सगळा माळ इथून तिथून मुरमानं झाक-लेला असताना वाडीतच एवढी धूळ का, याच नवख्या माणसाला भारीच आक्रित वाटतं.

पावसाळयात तर आणखी दैना होते. साधं जरी बुरंगाट पडलं तरी घेवड्याच्या माडग्यागत सगळीकड चिखलच चिखल होतो. चालणाऱ्यांच्या मांडीपर्यंत बचाबच चिपळधा उडतात.

सातान्यांत दुधं घालून परतलेल्या गडयांला न् गुरं वाडग्यांत कोंडणान्या पोरांला कधी कधी आबानाना म्हणतात,

"ए पोरांनु ! चला चार घम्याली वाळू मुरुम हृया रस्त्यावर आणून टाकू, मंजी जरा सुकवा मारल."

तर तंबाखुचे तोबरे भरून हात झाडत ते म्हणतात, "मुरुम ? आन् चार चार घम्याली ? आबानाना, आवो हृयो चिकुल काय आज कालचा होय व्हय ?"

मग आबानाना कसनुसं तोंड करून हसतात न् तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटत, मुंडी हलवत, चिखल तुडवत निघून जातात. पायखुट घातल्यागत मोठयाच कष्टानं पाय ओढत घरी जातात.

'हृयो चिकुल आजकालचा न्हाइ' या वाक्याला वनवासवाडीच्या दृष्टीनं एक महान ऐतिहासिक अर्थ आहे.

काय म्हणे एकदा रामचंद्र, लक्ष्मण व सीता वनवासाला जाताना वाटेत ही वनवासवाडी आहे तिथं विसाव्याला थांबले. त्यांनी आपली पायधूळ इथं झाडली, त्यामुळं भोवतालचा माळ मुरमाड असला, तरी इथं धुळीचा सुकाळ झाला आहे. आणि दगडी टोळयांची कथा तर याच्याहि पुढची आहे.

राम, लक्ष्मण, सीता असे थकून भागून तिथं बसले; तर त्यांतल्या सीतेचा जीव तहानेनं व्याकुळ झाला. तिनं एका गावकऱ्याला पाणी आणायला सांगितलं, पण त्यानं उठायच्या आळसानं घरात पाणीच नाही म्हणून सांगितलं. तशी लक्ष्मणाला भिरड आली आणि तो रागाच्या तरासात बोलून गेला, "कितीरं ऐदी हायेस ! आक्षी दगडच. प्रत्यक्ष प्रभु रामचंद्राशी लबाडो ? तुम्हो सगळी उद्या दिवस उगवायच्या आत दगुड होऊन पडाल !"

अशी ही वनवासवाडीतल्या दगडांची न् धुळीची कहाणी आहे आणि म्हणून या गावाचं नांवदेखील वनवासवाडी पडलं आहे.

आता राम-लक्ष्मणाची गोष्ट खरी असेल किंवा नसेल, पण चालू घडीला वनवासवाडीची अवस्था तरी त्या दगडी टोळयांगतच आहे.

वर्षानुवर्ष धुळीत लोळत पडलेल्या त्या दगडी टोळयांगत वनवासवाडी दारिद्रय व दैन्याच्या धुळींत पडून आहे. उन्हं वर आली की तेवढयापुरतं तापायचं. रात झाली की पहिल्यागत गपगार.

रोजच्या रोज तरी वाडीत असंच चालतं. चंदन-वंदनाच्या डोंगरामागून सवाष्णीच्या कुंकवागत लाल-भडक सूर्य वर येतो व कृष्णा नदीपासून थेट मेरू लिंगापर्यंतचं खोरं त्याच्या तांबूस पिवळया, गोजिर-वाण्या उन्हानं न्हाऊन निघतं. हजारो रानपाखरांचे थवे रानामाळात, डोंगरमाथ्यावर भिरीऽऽरी उडू लागतात. हिरव्याझार झाडीत लपलेल्या सायगाव, खर्शी, अनेवाडी, लिंब गावांतून संथपणानं निळा-जांभळा धूर वर येऊं लागतो. शिवारातून शाळवाच्या राखणदारांच्या व मळयांतून मोटकऱ्यांच्या ललकाऱ्याचा आवाज घुमू लागतो. असं सगळं खोरं जागं होतं.

परंतु वनवासवाडी अजून वाटेवरल्या फुफुटया इतकीच गार असते. न्हाई म्हणायला आबानाना व त्याची नात कृष्णाबाई तेवढे उठलेले असतात.

कृष्णाबाईची दारात सडा-रांगोळी चाललेली असते व आबानानांची इठ्ठलाची पूजा, आरती सुरू असते.

चांगला चार हात दिवस वरती आल्यावर वन-वासवाडी एकदा हृया कुशीवरून त्या कुशीवर अन् त्या कुशीवरनं हृया कुशीवर अशी चारदोनदा घोळल्यावर उठून बसते. मग उठल्या उठल्या बायका चरव्या घेऊन धारा काढायला वाडग्यात शिरतात आणि गडी तळ-हातावर मिश्री घेऊन जागोजाग उन्हं धरून बसतात.

आबानाना पाण्याची चकचकीत कळशी घेऊन जाता जाता एखाद्या घोळक्यापाशी थांबतात न् म्हणतात,

"आरं मर्दानु, हृये. . . . हृये धुळीतलं दगडसुदिक तापलं असल्याल आन् तुम्ही अजून . . . ."

पण आबानाना पुरतं बोलायच्या आत एखादा मिचमिच्या डोळयांनी त्यांच्याकडं बघत म्हणतो,

"आन् लवकर उठून कुठं गड जितायला जायचंय ? बायकांनो धारा काढल्या बिगार आम्ही काय करनार ? का मोकळया चरव्या घिऊनच सातारला पळत सुटावं, आं ?"

धारा पाणी होस्तवर दिवस चांगला कासराभर वर आलेला असतो. बायका चुलीच्या मागं लागतात.

न्याहऱ्या करून गुरांची पेंडी पाडतात व वापई चार चार-पाच पाच चरव्या शिकाळ्यात अडकवून सातारची वाट धरतात.

सकाळच्या पारी अशी जरा वनवासवाडी जिती झाल्यागत वाटते.

मग दुधाचे रतीब घालून गडी माघारी येतात. वचावचा ताकापाण्यासंगे भाकरी मुरगळतात आन् पोटात भर गेली की खरंच एखादा गड जिंकून आल्यागत जात्याला उसं देऊन डोळ्यांवर आडवा हात ठेवून ताणून देतात. आता पुन्हा दुसरा दिवस उजडस्तवर त्यांना रानामाळात किंवा दुसरा कसलाच उद्योग नसतो.

तशी कुणा कुणाची डोंगराच्या पायथ्याला चार-दोन गुंठ्यांची तुकडी आहेत, पण ताल तुंब्यावाचून त्यात म्हशीच्या अंगाएवढी वगळाटं पडली आहेत. मेहनत-मशागतीच्या अभावामुळं शेताचे बांध मर्यादा सोडून ऐन शेतात सरकू लागले आहेत. एकदा पेरलं की काढायलाच तिकडं जायचं—अशा परिस्थितीत त्यात येणार तरी काय? आरगडी गुडध्या इतक्या वाढतात. त्याला विट्टीएवढी कणसं येतात. भुईमुगाच्या ढाळ्याला चार-चार शेंगा लागल्या तरी रग्गड!

फक्त आबानानाचं तुकडं तेवढं आख्ख्या शिवारात उठून दिसतं. मुडदूस झालेल्या रोडक्या पोरांच्या घोळक्यांत बाळसेदार पोर उठून दिसावं तसं! त्यांच्या शेतात कुठं औषधाला सुद्धा हरळी, कुंदा दिसत नाही, की कपाळावर खोक पडल्यागत वगळाट दिसत नाही.

वनवासवाडीतले गडी असे ऐदी. मग असल्या नवऱ्यांच्या बायका कसल्या असणार? त्या तर महा ऐदी.

गुराच्या सकाळ-संध्याकाळ धारा न् दोन वेळचा स्वैपाक या पलीकडं त्यांना उद्योगच नाही. दुपारी ताऱ्ही पोरं पोटाशी घेऊन त्या पण घडी घटका ताणून देतात.

दुपारच्या वक्ताला अशी सगळी वनवासवाडी तापीला पडलेल्या मुड्या कुत्र्यागत निपचित पडलेली असते.

अशी ही वनवासवाडी केवळ दुधाच्या धंद्यावर कशीबशी तगलेली, कुठं नवीन उद्योग-नोकरी हुडकायचा त्रास नको की शेतातल्या कामाचा झिंजाडा नको.

पोराबाळांचा वाढता संसार या वाढत्या महागाईत केवळ दुधाच्या पैशान कसा भागणार? कशी तरी ओढाताड करून जगतात, अंगावर कधी धड कपडा नसतो न् तोंडावर काडीची रया पण नसते.

उन्हाळ्यात गवतं मुकली की गुरं दुधाला कमी पडतात. मग वनवासवाडीच्या वनवासात आणखी भर पडते. रिकाम्या पोटानं दुपारी धड झोपहि येत नाही. बाहेर ऊन पिसाळलेल्या कुत्र्यागत लह्या लह्या करतं. फुपुटा चुलीतल्या राखंगत तापतो. दगडी टोळे ठिकरीगत लाल होतात. असा आत-बाहेर सगळा उन्हाळाच.

अशा वेळी मग कुणाकुणाला राहवत नाही. संध्याकाळी शिळोप्याच्या वक्ताला अंगणात बसल्या बसल्या गडी एकामेकाला वैतागान म्हणू लागतात.

"आयला, शेरात मस्त विजलीचा चमचमाट झालाय. डोळंच दिपुन जात्याती. नकली काय न् असली काय त्ये काय बी कळत न्हाइ. कधी कधी पांढऱ्या सफेद कपड्यातलं, अमडत्रंब सुटल्यालं पुढारी येत्यात न् त्या लाइटीपरास झगमगीत बोलत्यात. आता काय कोयनंची इज लिव्वात बी येनार हाये म्हनं. कोट्ट्वाच्या तिथं धरानबी होनार हाये. जांबच्या माळाव साखरचा कारखाना होनार हायें. पण आपल्याला त्येचा काय उपेग?....रात येतीया ती नव्या नव्या काळज्या घिऊनच, हजार टाचण्या काळजाला टोचत्यात. काही खरं नाही आबानाना!"

अलीकडं अलीकड ही रड वनवासवाडीत वारंवार ऐकू येऊ लागली होती.

"ह्यो लक्षीमनाचा सरापच भवलाय वाडीला. राम लक्षीमन आपला वनवास आमच्या गावात ठेवून गेल्याती...." कुणी तरी भावडा जीव कळवळतो.

"आपुन आपलं चेटकिणीच्या घरी फुटक्या रांजणात पाणी भरणाऱ्या राजपुत्रागत पाणी भरत राह्याचं. रांजण काही भरणार नाही आन् टाळक्यावली घागरबी मरस्तवर सुटणार नाही!".....

"ह्या दळिद्रीपनाच्या उकीरड्यांत डुईनं डुया आम्ही गाडलुय. कोण मच्छिंदरनाथ येऊन आम्हाला वर काढील कुणास ठाऊक.... "

यावर आज वीस वर्षं आबानाना वाडीला न चुकता नेमानं सांगत आले आहेत आणि अजून सांगतात,

"आरं मर्दानु, कुठला मचिंदरनाथ न् कुठला राम घेऊन बसलाय. तुमचं तुमीच मचिंदरनाथ हाये, पन त्या मचिंदरनाथाला जसा बायांनी येढल्याव त्यो भुलला तसं तुम्हाला ह्या झोपनं न् ऐदीपनानं घेरलयं, आरं लेकरानु, राम जरी झाला तरी शिता पळवून न्हेल्याव तुमच्यागत हातपाय गाळून बसला असता तर रावण काय बुत्तीची दुरडी डोक्शाव घेऊन आपसुकच तिला परत पोचती करणार व्हता ?"

म्हातारा तळमळून बोलायचा. अंधाराच्या गाभाऱ्यात देवळांतल्या घंटीगत त्याचा आवाज घुमत राहायचा.

वनवासवाडी तेवढ्यापुरतं तोंड उघडं टाकून ऐकत राहायची, तापायची, पण रात सरून दिवस उगवला की वाडीचा पहिला रामठेका चालूच.

नाही म्हणायला एकदा वाडी तापली. चांगली वैशाखाच्या महिन्यात दगुड तापावा तशी तापली.

आबानाना रोज लिंबाला हेलपाटे घालायचा. तिथं कांहीबाही ऐकून यायचा न् वाडीच्या कानावर घालायचा. हे बरीक कधीच आयुष्यात न ऐकलेलं असं होतं. गड्यांच्या जोडीनं बायका न् बारकीसारकी पोरं पण झोपा चुकवून ताटकळत बसून ऐकायची. जीव लावून ऐकायची. .लढाई, विमानं.....चपट्या नाकाचं चिनी.. .हिमालय पर्वत. .जवाहरलाल नेहरू....सैन्य भरती.. .अर्पाशिगं....होय होय. साताऱ्याच्या पलिकडंच चार मैलावर असलेल्या अर्पाशिगे गावातून दोनशे सोलवाट पोरं एका महिन्यात भरती झाली. नांगराचा मुठ्या सोडून हातात बंदुका घेतल्या. वर्तमानपत्रात ठळक अक्षरात गावाचं नाव छापून आलं. सगळ्या जगभर वार्ता गेली. मग भर उन्हाळ्याच्या दिवसात वळवाचा पाऊस यावा तसा तो देवदूत, जव्हारलाल न्हेरू स्वतः अर्पाशिग्याला गेला. बायाबापड्यांनी त्याला ववाळला आणि एवढा आभाळागत खंबीर गडी, पण अर्पाशिग्याचं कौतुक करताना गहिवरला. टिपं गाळू लागला. .त्यो परत गेला न् मग रोज कशाकशानं भरलेल्या मोटारी गावा-कडं धावू लागल्या. सिमेंट, दगड, पत्रा. .अमुक न् तमुक. गावात दंड्या शाळा बांधली. दोन विहिरी, भैरूबाचं देवाळ, गावापर्यंत डांबरी सडक, कडेला सावलीसाठी झाडं आन् सगळ्यांत कळस म्हणजे शेतं नांगरायला ट्रॅक्टर, विहिरीवर विजंची इंजिनं न् सगळ्या गावात घरटी गुलूब.

असं काही ऐकलं न् वनवासवाडी भरमाटली. दुपारच्या वक्ताला पडल्या पडल्या नवरा-बायको एका-मेकाचा इचार काढू लागली.

मग एक दिवस आबानानांनी सगळ्यांना बोलावून वादविवाद केला न् सातारा गाठला. दोन दिवस मोडून परत आले ते भलत्याच खुशीत. जणु कुणाचं लगीन ठरवून आल्यागत.

होय, आबानाना वनवासवाडीचं लगीनच ठरवून आले होते. चार दिवसांनी मिलट्रीच्या भरतीसाठी मोठा साहेब स्वतः येणार होता. आबानानांनी वनवास-वाडीतल्या चाळीस पोरांची नावं लिहून दिली होती.

....पण का कुणास ठावूक, गवताच्या गंजीचा एकदम आगीडोंब उसळावा न् तितक्याच झपाट्यानं तो विझून गार पडावा, तशागत वनवासवाडी एवढी तापल्याली गार पडू लागली. नवरा-बायको दुपारच्या वक्ताला आता निराळाच विचार करू लागले.....एकुलत्या एक लेकाचे आईबाप पोराला मरणाच्या खाईत ढकलायला तयार होईनात. कुणाचा थोरला लेक औंदा लग्नाला आला होता न् हे त्यांच्या घरातलं पहिलंच कार्य होतं, तर कुणाचा पोरगा उद्याच्या उद्या भरती झाल्यावर म्हशींची सोडबांध, रतीबाचं करायला कुणीच नव्हतं. एकदम सगळाच मांडव वाऱ्याच्या अगाव पडणार होता.

पण हे सगळं आबानानाला कुणी आणि कसं बोलावं? सगळेच चोरट्या कुत्र्यागत गपगुमान राहिले.

उद्या भरतीसाठी साहेब येणार म्हणून आधल्या रात्री आबानाना घरोघर फिरून सगळ्यांना झाडलोट कशी करायची, तोरणं कमानी कशा बांधायच्या, सभा कशी भरवायची, त्यात कुणी कुणी काय काय बोलायचं हे सगळं बैजवार सांगत फिरले. सगळ्यांनी कान पाडून ऐकून घेतलं.

रात्रभर आबानानांच्या डोळ्याला डोळा लागला नाही. उद्याच्या कार्याचा त्यांच्या जिवाला नुसता घोर लागला होता आणि त्याचवेळी सगळी वनवासवाडी खुशाल घोरत पडली होती.

नेहमीप्रमाणे चंदनवंदनाच्या डोंगरामागून सूर्य-देव वर आला. आवानानांनी त्याला हात जोडले. आणि वळून वाडीकडं पाहिलं. . पन्नास वर्षं बघत आले, तशीच वनवासवाडी त्यांना दिसली. त शी घाईघाईनं ते दार वाजवीत हाका मारीत फिरू लागले, पण वाडीला कांही घाई दिसत नव्हती.

नेहमीप्रमाणेच दोन्ही कुशीवर चारदोन वेळा घोळून वाडी उठली व तळहातावर मिश्री घेऊन उन्हं धरून वसली.

आवानानांच्या पोटात लट्दिशी हललं. ते घोगऱ्या आवाज़ात ह्याला त्याला विचारु लागले, तर भलभलतीच उत्तरं ऐकू येऊ लागली. तेवढ्यातूनहि आवानाना समजूत घालूं लागले. शेवटी एकजण म्हणाला,

"आवानाना आम्ही तुमच्यागत वांझुटं न्हाई पोटचा गोळा असता मजी समाजलं आसतं. . . !"

मग वरीक म्हातारा हालला. त्याची पाक कंबारच खचली, मरणानं ओढल्यागत त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला.

घटकाभरानं मिलट्रीच्या हिरव्या रंगाच्या चार मोठमोठ्या गाड्या धुरोळा उडवीत, दगडी टोळचा-वरून चेंडुगत उशा घेत वाडीच्या तोंडाला येऊन थांबल्या.

वाडीनं दाराच्या फटी किलकिल्या करुन बघि-तलं. उंचपुरे, रुबाबदार खाकी कपडे घातलेले साहेब लोक हसत येत होते. आणखी जरा डोकी बाहेर काढून त्यांनी डोंगराकडं पाहिलं. डोंगरमाथा वलंडून पोरं व गुरं पार दिसेनाशी झाली होती.

तेवढ्यात समोरून आबानाना येताना दिसले. त्यांच्या एका हातात वारीकसं कपड्यांचं बोचकं न् दुसऱ्या हातात वारकरी निशाण होतं. पाठीमागं कृष्णावाई अंग चोरून उभी होती.

अधिकारी चालता चालता एकदम थबकले. आवानानांचा हा अवतार पाहून त्यांना काहीच अर्थ-बोध होईना.

आवानानांनी एकदा वाडीतल्या घरांच्या बंद दारांकडं भिरभिरत्या नजरेनं पाहिलं. मग आवेगान अधिकाऱ्यांच्या पायावर पडून ढसाढसा रडू लागले. हुंदके देत म्हणू लागले. . . "साहेब. . . . साहेब, मी तुमचा इसवासघात केला. तुमच्याजवळ बंदूक असली तर मला इथल्या इथं गोळी घाला. . ." आणि मग एकाएकी खालच्या दगडावर कपाळ बडवून घेऊ लागले. तशी कृष्णावाईनं हंबरडा फोडून म्हाताऱ्याला मिठी घातली.

अधिकाऱ्यांनी मोठ्या कष्टानं आवानानाला बसतं केलं. हळू हळू सगळा प्रकार त्यांना कळून चुकला, तसे ते मुकाट्यानं माघारी फिरले.

मोटारी आल्या तशा धूळ उडवीत परत गेल्या.

कृष्णाबाईच्या आधारानं आवानाना वेतानं उठले रक्तानं व धुळीनं त्यांचा चेहरा माखला होता.

बघता बघता पुन्हा एकदा म्हातारा उरी फुटल्यागत ढसढसुन रडत म्हणाला, "मर्दान् तुमच्या संगटं सोबतीनं ह्या वनवासवाडीन ऱ्हातांना मला कधीच वनवाशागत वाटलं न्हाई. . . आज वरीक मी खरंच. . . खरंच वनवाशी झालो. . . !"

मग एकदा आपल्या घराकडं बघितल्यागत करुन आवानाना कृष्णावाईच्या हाताला धरून सरळ चालू लागले. रस्त्यातील धूळ तुडवीत, दगडी टोळचांना ठेचकळत चालत राहिले. . . क्षितिजावर त्यांची मूर्ती लहान लहान होत वळणावर दिसेनाशी झाली.

आणि वनवासवाडी? रहदारीच्या रस्त्यात मधेच तापीला पडलेलं मुडं कुत्रं गाडी-घोडं आलं किंवा राजाचा रथ येऊन गेला तरी कानमुदिक इल-वीत नाही. अगदीच खेटून जर गाडीचं चाक जाऊ लागलं तर तेवढ्यापुरतं अंग चोरतं न् डोळे झाकून मातीत तसंच पडून राहतं; तशागत एवढं आक्रित घडून देखील वनवासवाडी जरांहि दाबचळली नाही.

मुड्या कुत्र्यागत गपगुमान पडून राहिली!

———

शास्त्रीय मराठी व्याकरणकार मोरो केशव दामले यांची जन्मशताब्दी

'शास्त्रीय मराठी व्याकरण' या ग्रंथाचे लेखक, सुप्रसिद्ध व्याकरणकार प्रि. मोरो केशव दामले यांची जन्मशताब्दी इंग्रजी तारखेप्रमाणे दि. ७ नोव्हेंबर व तिथीप्रमाणे दि १२ नोव्हेंबर १९६८ रोजी येते, या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या स्मृतीला सादर अभिवादन !

शंभर वर्षापूर्वी व्याकरणकार दामले जन्माला आले व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी बी. ए. पर्यंत शिक्षण पूर्ण करून दक्षिणा फेलोशिप मिळविली व नंतर एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण केली. नंतर दहा वर्षे उज्जयिनी येथे प्राध्यापकाचे काम केल्यावर ते नागपूर येथे नील सिटी हायस्कूलमध्ये सुपरिंटेंडंट म्हणून आले व १९१३ च्या मे महिन्यात नागपूर–पुणे प्रवासात रेल्वे अपघातात त्यांना व त्यांच्या पत्नीला अपघाती मृत्यु आला.

श्री. मोरो केशव दामले यांचे बंधू कवी केशवसुत हे-मराठी साहित्यात अधिक प्रसिद्ध असले तरी मोरो केशवांनी व्याकरणकार या नात्याने केलेली कामगिरीही अत्यंत मोलाची आहे. गंगाधरशास्त्री फडके, जांभेकर, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे तसेच, डॉ. विल्यम कॅरे, रे. स्टीव्हन्सन, कोशकार मोल्सवर्थ, मेजर कँडी आदींचे व्याकरणविषयक विचार पूर्णपणे तपासून घेऊन शास्त्रीय दृष्टिकोनातून मराठीचे व्याकरण सिद्ध करण्याचे महत्त्वाचे कार्य मोरो केशव दामले यांनीच प्रथम केले. त्यांच्या ग्रंथाची पहिली आवृत्ती १९११ साली प्रसिद्ध झाली व नंतरच्या सर्व व्याकरणकारांना तो आधारभूत ग्रंथ ठरला.

कै. दामले यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणाबाबत एक उल्लेखनीय बाब अशी की श्री. कामताप्रसाद यांनी लिहिलेल्या हिंदी भाषेच्या सर्वमान्य व्याकरणाची सिद्धता करताना त्यांनी दामले यांच्या व्याकरणाचा आराखडा समोर ठेवला होता व तसे प्रस्तावनेत नमूद केले.

अलिकडे अर्वाचीन भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून मराठी व्याकरणाचा पुनर्विचार सुरू झाला आहे. मराठीच्या लेखनाबाबत, लेखनपद्धतीबाबत व शुद्धलेखनाबाबतही निरनिराळे विचार मधूनमधून पुढे मांडले जात आहेत. परंतु अजूनही अभ्यासकांचे व संशोधकांचे या प्रश्नाकडे व पाश्चिमात्य देशात अर्वाचीन भाषाशास्त्राने केलेल्या प्रगतीकडे म्हणावे तसे लक्ष गेलेले नाही. कै. मोरो केशव दामले यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने या अभ्यासाला नवी प्रेरणा मिळाली तर तीच त्यांच्या कामगिरीचा खरा गौरव व तीच त्यांना खरी श्रद्धांजली !

संघवार्ता —

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय अभ्यासमंडळ

ग्रंथालय सप्ताहानिमित्त 'मराठी लघुकथेची वाटचाल' या नावाचे ग्रंथप्रदर्शन श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यासमंडळातर्फे दि. २५ ते २९ सप्टेंबर पर्यंत आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनात 'मनोरंजन मासिकाच्या कालखंडापासून तो करमणूक कालखंडापर्यंत व नंतर १९६८ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या लघुकथासंग्रहाचे प्रदर्शन मांडण्यात आले.

या प्रदर्शनात दुर्मिळ मासिके, पुस्तके ठेवण्यात आली होती.

नाटच इतिहास संशोधक श्री. के. टी. देशमुख यांचा वाढदिवस

नाटचइतिहास संशोधक श्री. के. टी. देशमुख (मुंबई) यांनी दि. ३० सप्टेंबर रोजी ५२ व्या वर्षात पदार्पण केल्यामुळे त्यांचे संस्थेतर्फे सकाळी १० वा. पुष्पहार घालून अभीष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी श्री. भाऊ समर्थ, श्री. मधुकर गुळवणी यांची भाषणे झाली.

कविवर्य कै. अण्णाजी बोबडे स्मृतिदिन

कविवर्य कै. अण्णाजी बोबडे यांचा स्मृतिदिन दि. १ ऑक्टो. ६८ रोजी सायं. ६–३० वा. साजरा करण्यात आला.

याप्रसंगी श्री. मा. नी. गलगलीकर यांचे भाषण झाले. यावेळी श्री. मधुकर गुलवणी, श्री. अ. ल. लिमये यांनीही कविवर्य बोबडे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. हमीद दलवाई यांची वि. सा. संघाला भेट

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. हमीद दलवाई यांनी रविवार दि. ६ ऑक्टो. ६८ रोजी सकाळी ८–३० वा. संस्थेला भेट दिली.

यावेळी 'साहित्यिकांशी चर्चा' असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सुरूवातीला प्रास्ताविक भाषण करून संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी दलवाई यांना पुष्पहार घातला. व संस्थेच्या कार्यांची माहिती विशद केली.

यानंतर साहित्यविषयक चर्चेला प्रारंभ झाला. या चर्चेचे वेळी नागपुरातील प्रथितयश व नवोदित साहित्यिक उपस्थित होते. कॉफीपानानंतर हा भेट–चर्चेचा कार्यक्रम संपला.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका